नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6

* वर्ष ५१ * अंक २३८ * * अकोला * शुक्रवार, दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ ८ पाने • किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

नागरिकत्व प्रकरणाची सुनावणी २६ मार्च

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २० :
काँग्रेस खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नागरिकत्वाबाबत दिल्ली उच्च न्यायालयाने केंद्र सरकारकडून उत्तर मागितले आहे. न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी २६ मार्च रोजी निश्चित केली आहे.

भाजप नेते सुब्रमण्यम स्वामी यांनी केंद्रीय गृह मंत्रालयाकडे तक्रार दाखल केली होती, ज्यामध्ये राहुल गांधी यांनी ब्रिटिश अधिकाऱ्यांना सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये स्वतःला ब्रिटिश नागरिक म्हणून घोषित केल्याचा आरोप करण्यात आला होता. एप्रिल २०१९ मध्ये गृह मंत्रालयाने राहुल गांधींना त्यांच्या नागरिकत्वाबाबत स्पष्टीकरण मागणारे पत्र पाठवले होते.

अग्राग्रलेख

खरीखरी..

मोदीजींची सरळ रेखा

गेल्या वर्षभरात ज्या ज्या राज्यांच्या निवडणुका घेतल्या गेल्या. त्या ठिकाणी पंतप्रधान मोदी यांनी एकमेव महाराष्ट्र वगळून सर्वत्र नवे चेहरे दिलेले आहेत. भारतीय जनता पक्षाचे हेच वैशिष्ट्य आहे. जे त्यांना इतरांपासून वेगळे बनवते. आपल्या देशातील अनेक पक्ष विशिष्ट व्यक्तीच्या नावाने ओळखले जातात. मग तो उत्तरेचा समाजवादी पक्ष असो किंवा दक्षिणेचा द्रमुक असो. दिल्लीचे मुख्यमंत्री म्हणून अरविंद केजरीवाल यांचे नाव पक्के होते. आतिशी फक्त रिकामी जागा भरण्यापुरत्या मुख्यमंत्री झालेल्या होत्या. दिल्लीला यापूर्वी भारतीय जनता पक्षाच्या सुषमा स्वराज, काँग्रेसच्या शीला दीक्षित, आम आदमी पक्षाच्या आतिशी या तीन महिला मुख्यमंत्री म्हणून लाभल्या. पैकी सलग पंधरा वर्ष मुख्यमंत्रीपद सांभाळणाऱ्या एकमेव शीला दीक्षितच होत्या. मोदी साहेबांच्या नेहमीच्या शैलीप्रमाणे कालपर्यंत गुप्त असलेल्या रेखा गुप्ता प्रकट झाल्या. त्या पहिल्यांदाच निवडून आलेल्या आहेत हे विशेष. भारतीय जनता पक्षाच्या महिला मोर्चाच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणून त्या भाजप वर्तुळात चांगल्याच परिचित होत्या. माजी मुख्यमंत्री साहेब सिंग वर्मा यांचे सुपुत्र प्रवेश वर्मा हे खरं तर सुरुवातीपासूनच मुख्यमंत्री पदाच्या रांगेत आघाडीवर होते. तरीही जे आघाडीवर असतील त्यांची निवड नक्की होईल, अशी पक्की खात्री कोणालाच नव्हती. त्याप्रमाणेच न झालेल्या मुख्यमंत्र्यांनी म्हणजेच प्रवेश वर्मा यांनी गुप्ता यांचे नाव सुचवले आणि त्या मुख्यमंत्री झाल्या. 27 वर्षापासून दिल्लीची सत्ता भारतीय जनता पक्षाच्या हाती नव्हती. संपूर्ण देशात भारतीय जनता पक्ष जिंकला. पण राजधानी दिल्ली केजरीवाल यांनी आपल्या मुठीत घट्ट पकडून ठेवली होती. गेल्या वर्षापासून केजरीवाल यांचा काटा कसा काढावा, याची आखणी करण्यात येत होती. आता केजरीवाल यांचा वारू धावण्याचे थांबले. संघाच्या अंतर्गत पातळीवरील अत्यंत महत्त्वाची कार्यकर्ती म्हणून रेखा गुप्ता यांच्या हाती सत्तेचा शीशमहल देण्यात आलेला आहे. आज रामलीला मैदानावर रेखाताईंना मुख्यमंत्री पदाचा साज चढवण्यात आला. 77 पैकी 48 जागा जिंकून भारतीय जनता पक्षाने दिलेल्या नवा चेहरा दिलेला आहे. प्रवेश वर्मा उपमुख्यमंत्री आहेत. इतर सहा मंत्र्यांनाही शपथ देण्यात आली. आता दिल्लीची महापालिका आम आदमी पक्षाच्या हातून कशी काढता येईल, याची तयारी करण्यास सुरुवात झालेली आहे. अरविंद केजरीवाल यांचा कार्यकाल केंद्र विरुद्ध राज्य यांच्यातील सत्ता संघर्षाचा कालावधी होता. अरविंद केजरीवाल यांनी स्वच्छ प्रशासनाचा नारा दिला होता. पहिल्या कार्यकाळात केजरीवालांनी जनतेला दिलेली आश्वासने त्यामध्ये आरोग्यसेवा, शिक्षण सुधारणा, मोफत वीज, मोफत पाणी वगैरे बऱ्यापैकी समाधानकारक सुरू होते. त्यानंतर मात्र केजरीवाल यांना दारू न पिताही फक्त दारूच्या वासानेच चीत करण्यात आले. आता भारतीय जनता पक्षाचे नायब राज्यपाल आणि भाजपचे सरकार त्या दोघांचेही मेतकूट दिल्लीच्या जनतेला लाभप्रद होईल. अशी अपेक्षा करायला हरकत नाही. रेखा गुप्ता पहिल्यांदाच आमदार झालेल्या असल्या. तरी त्यांनी राजकीय व्यवस्थेचा अनुभव चांगलाच अवलोकन केलेला आहे. मुख्यमंत्री पदावर विराजमान झाल्यावर आता त्यांना बरीच साफसफाई करावी लागेल. मोदीजींनी आश्वासन दिल्याप्रमाणे ज्या योजना सुरू आहेत. त्या बंद करण्यात येणार नाहीत आणि जी फुकटेगिरी आहे. त्यात प्रमाणापेक्षाही वाढ होणार आहे. मोदीजी ज्याला 'रेवड्या' म्हणतात. त्या पुढेही सुरू ठेवणे, दिल्लीतील निवडणूकी पूर्वीच्या वचनबद्धतेमुळे आवश्यक झालेले आहे. विधान सभेच्या निवडणुकीपूर्वी महाराष्ट्रात, जो जे वांछील तो ते लाहो अशा छापाच्या अनेक घोषणा करण्यात आल्या होत्या. सध्या मात्र महाराष्ट्रा सारख्या श्रीमंत राज्यालाही ती दिलेली वचने कशी पाळावी, याची ददात पडली आहे. महानगरी मुंबई श्रीमंत राज्य आहे असे म्हणतात. मुंबई अर्थनगरी आहे, सिनेनगरी आहे. त्यासह अनेक नगऱ्या या मुंबई महानगरीत आहेत. दिलेल्या घोषणा प्रत्यक्षात आणण्यासाठी काय-काय करावे लागते. त्याचा अनुभव सध्या आपले महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसजी घेतच आहेत. त्या मानाने दिल्ली हे छोटे राज्य आहे. पण दिल्लीची श्रीमंती मुंबईपेक्षा अजिबात कमी नाही. राजधानीच्या या शहराला नवे रूप देणे, जनतेला नवा विचार देणे. आम आदमी पक्षाबरोबर मुकाबला करणे, दिलेल्या घोषणेच्या योजना पूर्ण करणे असा चौफेर विकासाचा मार्ग आता पत्करावा लागणार आहे. दिल्ली देशाची राजधानी आहे. या राजधानीत चहूबाजूंनी शेजारच्या राज्यांचे अनेक तरुण दिल्लीत दाखल झालेले आहेत. याशिवाय दक्षिणेपासून महाराष्ट्रा पर्यंत, त्यांच्यासोबतच हिंदी भाषिक प्रदेशातून लाखो परिवार दिल्लीत निवास करीत आहेत. आता या दिल्लीला सर्वप्रांतीय, सर्वभाषीय आणि सर्वधर्मीय जनतेला आश्वासक सरकार मिळालेले दिसले पाहिजे. हीच दिल्लीकरांची एकमेव आकांक्षा आहे. मोदीजींनी सरळ रेखा आखून दिली आहे. त्यानुरूप नवीन मुख्यमंत्र्यांना सरकार चालवायचे आहे. दिल्लीच्या नवनिर्वाचित मुख्यमंत्री रेखाजींना आमच्या मनापासून भरभरून शुभेच्छा!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

कृषीमंत्री माणिकराव कोकाटेंना २ वर्षांचा कारावास

५० हजार रुपयांचा दंड

१९९५ च्या प्रकरणात शिक्षा; आमदारकीवर टांगती तलवार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २० :
राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू सुनील कोकाटे यांना २ वर्षांचा कारावास आणि ५० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

१९९५ मधील एका प्रकरणात त्यांना ही शिक्षा सुनावण्यात आली. कागदपत्रांची फेरफार आणि फसवणूक केल्याचा त्यांच्यावर आरोप करण्यात आला आहे. या शिक्षेमुळे माणिकराव कोकाटेंच्या आमदारकीवर टांगती तलवार आली आहे.

१९९५ मध्ये कागदपत्रांची फेरफार आणि फसवणुकीच्या आरोपांवरून हा निर्णय देण्यात आला आहे.

माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांनी १९९५ मध्ये माणिकराव कोकाटे यांच्या विरोधात सदनिकांच्या घोटाळ्यांसंदर्भात याचिका दाखल केली होती. आमच्याकडे घर नाही आणि आमचे उत्पन्न कमी असल्याचे सांगून माणिकराव कोकाटे आणि भाऊ सुनील कोकाटे यांनी मुख्यमंत्री निधीतील सदनिका घेतल्याचा आरोप करण्यात आला होता.

याप्रकरणी माणिकराव कोकाटे आणि त्यांच्या भावावर भादंवि कलम ४२० (फसवणूक), ४६५ (कृत्रिम दस्तऐवज तयार करणे), ४७१ (बनावट दस्तऐवजाचा उपयोग करणे) आणि ४७४ (सत्यता लपवणे) या कलमांखाली गुन्हा दाखल झाला होता.

३० वर्षांनंतर या खटल्याचा आज नाशिक जिल्हा न्यायालयाने निकाल दिला. त्यानुसार माणिकराव कोकाटे आणि त्यांचे भाऊ सुनिल कोकाटे यांना २ वर्षांचा कारावास आणि ५० हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

या सुनावणीला माणिकराव कोकाटे स्वतः जिल्हा न्यायालयात हजर होते. जिल्हा न्यायालयाने शिक्षा ठोठावताच माणिकराव कोकाटे यांच्याकडून तत्काळ जामीन मिळण्यासंदर्भात हालचारी सुरू झाल्यात आहेत. त्यांनी जामिनासाठी अर्ज केला आहे.

या प्रकरणामुळे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे अडचणीत आले आहेत. त्यांच्या आमदारकी आणि मंत्रीवर टांगती तलवार आहे. लोकप्रतिनिधीला दोन किंवा त्यापेक्षा जास्त वर्षांची शिक्षा झाल्यास त्याचे सभागृहाचे सदस्यत्व रद्द होते. तसे झाल्यास माणिकराव कोकाटे यांच्या राजकीय कारकीर्दीला ब्रेक लागू शकतो.

वरच्या कोर्टात दाद मागणार

न्यायालयाने शिक्षा सुनावल्यानंतर माणिकराव कोकाटे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ३० वर्षांपूर्वी तुकाराम दिघोळे यांनी राज्यमंत्री असताना राजकीय द्वेषापोटी माझ्यावर ही केस दाखल केली होती. आज या केसचा निकाल आला. निकाल पत्र मी अद्याप वाचले नाही. या निकालाविरोधात उच्च न्यायालयात अपील करणार असल्याचे ते म्हणाले.

न्यायालयाने शिक्षा सुनावल्यानंतर मी रीतसर जामीन घेतलेला आहे, असा दावाही माणिकराव कोकाटे यांनी केला. कोकाटे यांच्यावर कागदपत्रांची फेरफार आणि फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला होता.

दिल्लीत 'रेखा सरकार'

मुख्यमंत्री पदाची घेतली शपथ : प्रवेश वर्मांसह ६ मंत्री

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. २० :
शालीमार बाग मतदारसंघातून पहिल्यांदाच आमदार झालेल्या रेखा गुप्ता (५०) यांनी गुरुवारी दिल्लीतील रामलीला मैदानावर शपथ घेतली. त्या दिल्लीच्या नवव्या आणि चौथ्या महिला मुख्यमंत्री बनल्या आहेत.

रेखा यांच्या आधी सुषमा स्वराज, शीला दीक्षित आणि आतिशी मुख्यमंत्री होत्या. या कार्यक्रमाला पंतप्रधान मोदी आणि अमित शहा यांच्याव्यतिरिक्त, भाजपशासित २१ राज्यांचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्रीदेखील उपस्थित होते. आप नेते अरविंद केजरीवाल आणि आतिशी शपथविधीला उपस्थित राहिले नाहीत.

रेखा यांच्याशिवाय ६ मंत्र्यांनीही शपथ घेतली. यामध्ये प्रवेश वर्मा ज्यांनी अरविंद केजरीवाल यांना पराभूत केले, तसेच आशिष सूद, मनजिंदर सिंग सिरसा, रवींद्र इंद्रराज सिंग, कपिल मिश्रा आणि पंकज कुमार सिंग यांचा समावेश आहे.

दिल्लीतील रामलीला मैदानावर झालेल्या शपथविधी सोहळ्याला एनडीए शासित राज्यांचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री उपस्थित होते. याशिवाय, पंतप्रधान मोदी, दिल्लीचे नायब राज्यपाल, मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि त्यांचे मंत्रिमंडळ व्यासपीठावर उपस्थित होते.

शीशमहालमध्ये राहणार नाही

शपथ घेण्यापूर्वी रेखा गुप्ता यांनी गुरुवारी सकाळी माध्यमांना सांगितले की, 'ही एक मोठी जबाबदारी आहे. माझ्यावर विश्वास दाखवल्याबद्दल मी पंतप्रधान मोदी आणि पक्षाच्या हायकमांडचे आभार मानते. मी कधीच विचार केला नव्हता की मी दिल्लीची मुख्यमंत्री होईन. मी काचेच्या महालात राहणार नाही.

दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांच्या अधिकृत निवासस्थानाचे नाव भाजपने शीशमहाल ठेवले. अरविंद केजरीवाल यांनी ते बांधले होते. केजरीवाल यांनी नियमांचे उल्लंघन करून ते बांधण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च केल्याचा आरोप भाजपने केला आहे.

४ महिला नक्षली ठार

हॉकफोर्स व बालाघाट जिल्हा पोलिसांची कारवाई

■ महासागर प्रतिनिधी
गोंदिया, दि. २० :
मध्य प्रदेशच्या बालाघाट जिल्ह्यात हॉकफोर्स आणि बालाघाट जिल्हा पोलीस दलाला नक्षलवादी कारवायांविरोधात मोठे यश मिळाले आहे.

जंगल परिसरात शोध मोहीम राबविताना ठाणे गढीच्या सूपखार वन परिक्षेत्राच्या रोंडा फॉरेस्ट कॅम्पजवळ हॉकफोर्स, बालाघाट जिल्हा पोलिस आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत ४ महिला नक्षलवाद्यांना ठार करण्यात आले आहे.

मारल्या गेलेल्या ४ महिला नक्षलवाद्यांकडून एक इन्सास रायफल, एक एसएलआर रायफल आणि एक ३०३ रायफल आणि दैनंदिन वापरातील इतर वस्तू जप्त करण्यात आल्या. मृत महिला नक्षलवाद्यात २० लाखाचे बक्षिस असलेली भोरमदेव एरिया कमेटीची कमांडर आशा, १४ लाख बक्षिस असलेली शीला उर्फ पद्मा उर्फ सरिता, १४ लाख बक्षिस असलेली रंजिता आणि तितकेच बक्षिस असलेली लख्खे मडावी यांचा समावेश आहे.

या चकमकीत काही महिला नक्षलवादी जखमी झाल्या आहेत. चकमकीनंतर घनदाट जंगलाचा फायदा घेऊन ते पळून गेल्याचे सांगण्यात आले. त्यांचा शोध घेण्यासाठी १२ पोलिस पथकातील ५०० हून अधिक पोलिस बळ अजूनही हॉकफोर्स, सीआरपीएफ कोब्रा आणि पोलीस पथकांकडून शोध सुरू आहे.

जेएनयूमध्ये कुसुमाग्रज मराठी अध्यासन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २० :
गेल्या २० वर्षांपासून जवाहरलाल नेहरु विश्वविद्यापीठ अर्थात जेएनयुमध्ये रखडलेल्या मराठी भाषा अध्यासनाचा विषय अखेरीस दिल्लीत होणाऱ्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित संमेलनाच्या निमित्ताने निकाली काढण्यात आला. २७ फेब्रुवारी या कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी जेएनयुमध्ये कुसुमाग्रजांच्याच नावे मराठी अध्यासन सुरू करण्यात येणार असून त्यासाठी १० कोटी रुपये देण्यात येणार असल्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी सांगितले. दिल्लीत होणाऱ्या मराठी साहित्य संमेलनाची विशेष रेल्वे पुण्याहून रवाना झाली. यावेळी सामंत यांनी ही माहिती दिली.

अध्यासनामुळे एम.ए, पीएच.डी अभ्यासक्रम, मराठी भाषा विस्तार, प्रचार, अभिजात मराठी वाङमय, साहित्य देशभरातील साहित्यिकांना उपलब्ध होइल, असे मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

दिल्लीत मराठीचा जागर

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. २० :
मायमराठीचा जागर करण्यासाठी ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्ली येथे २१, २२ आणि २३ फेब्रुवारी २०२५ या तीन दिवसांत संपन्न होत आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्ली २०२५

९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आज उद्घाटन

दिल्लीचेही तख्त राखतो महाराष्ट्र माझा... ही केवळ कविकल्पना नाही तर आपल्या अस्मितेचा आणि अभिमानाचा विषय आहे, याचा प्रत्यय आपणास या ऐतिहासिक संमेलनातून येणार आहे. भाषा, संस्कृती, राष्ट्रभावना, मानवता आणि एकात्मता यांचा आगळा मिलाफ यानिमित्ताने महाराष्ट्र वा देशातीलच नव्हे, अवघ्या जगातील साहित्यरसिक देशाच्या राजधानीत अनुभवणार आहेत. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ९८ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन सरहद, पुणेच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आले आहे.

दिल्लीत होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. पंतप्रधान मोदी यांनी निमंत्रण स्वीकारले आहे.

सरहद, पुणे आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या ९८ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे उद्घाटन २१ फेब्रुवारी २०२५ रोजी होणार आहे. जेष्ठ नेते शरद पवार या साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी असणार आहेत. संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. तारा भवाळकर असतील तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहतील. जवळपास ७० वर्षांनी पुन्हा एकदा दिल्ली मराठी साहित्य संमेलनासाठी सज्ज होणार आहे.

मराठी साहित्य संमेलन म्हटले की, लेखक, कवी, साहित्यिकांची गर्दी असणारच. सा संमेलनाच्या निमित्ताने सारस्वतांचा मेळा दिल्ली नगरीत भरत असून, महाराष्ट्रासह देशभरातील साहित्यिक, रसिक, मराठीवर प्रेम करणारे दिल्लीत गोळा होवू लागले आहेत. यापूर्वी १९५४ साली दिल्लीला ३७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झाले होते.

धनंजय मुंडे यांना 'बेल्स पाल्सी' आजार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २० :
बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडामुळे अडचणीत सापडलेले राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांना बेल्स पाल्सी नामक आजार झाला आहे.

या आजारामुळे मला साधे २ मिनिटेही व्यवस्थित बोलता येत नाही. त्यामुळे मला कॅबिनेट व पक्षाच्या जनता दरबाराला उपस्थित राहता येत नसल्याचे त्यांनी सांगितले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पक्षाच्या सर्वच मंत्र्यांना व आमदारांना जनता दरबार घेण्याचे आदेश दिलेत. पण मंत्री धनंजय मुंडे यांनी मागील ६ आठवड्यांपासून एकदाही जनता दरबार घेतला नाही. मुंडे यांनी आपल्याला बेल्स पाल्सी नामक आजार झाल्याची माहिती दिली.

साहित्य संमेलनासाठी राज्य सरकारकडून अतिरिक्त २ कोटींचा निधी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :
अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्ली येथे सुरू होत असून, या संमेलनासाठी राज्य सरकारने २ कोटी रूपयांचा अतिरिक्त निधी मंजूर केला आहे. विशेष बाब म्हणून राज्य मराठी विकास संस्थेच्या माध्यमातून हा निधी देण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. यासंदभार्तील शासकीय आदेश (जीआर) जारी करण्यात आला आहे.

राज्य सरकारकडून मंजूर केलेला हा निधी फक्त मराठी भाषेच्या प्रचार, प्रसार, विकास आणि संवर्धनासाठीच वापरला जाणार आहे. संमेलन संपल्यानंतर ३ महिन्यांच्या आत अखिल भारतीय साहित्य महामंडळाने राज्य मराठी विकास संस्थेकडे या निधीच्या वापराबाबतचे विनियोजन प्रमाणपत्र, संमेलन अहवाल आणि सनदी लेखापालांकडून तपासलेले विवरणपत्र सादर करणे आवश्यक असल्याचे सरकारने आदेशात नमूद केले आहे.

आयसीसी वनडे रँकिंगमध्ये गिल अव्वल

पाकिस्तानच्या बाबर आझमला मागे टाकले गोलंदाजांत श्रीलंकेचा तीक्षणा अव्वल स्थानी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :
भारतीय सलामीवीर शुभमन गिल आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत नंबर-१ फलंदाज बनला आहे. त्याने पाकिस्तानचा माजी कर्णधार बाबर आझमला मागे टाकले. गेल्या आठवड्यात गिल दुसऱ्या स्थानावर होता. आयसीसीने बुधवारी ताजी क्रमवारी जाहीर केली. गोलंदाजीत श्रीलंकेचा महीष तीक्षणाने अफगाणिस्तानच्या रशीद खानला मागे टाकत अव्वल स्थान पटकावले आहे. फलंदाजी क्रमवारीत चार भारतीय फलंदाज टॉप-१० मध्ये आहेत. कर्णधार रोहित शर्मा तिसऱ्या आणि विराट कोहली सहाव्या स्थानावर आहे. श्रेयस अय्यरने एका स्थानाचा फायदा घेत नववे स्थान मिळवले आहे.

गिलने इंग्लंडविरुद्ध नुकत्याच झालेल्या तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या दोन एकदिवसीय सामन्यात अर्धशतके आणि तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात शतक झळकावले होते आणि त्याचा फायदा त्याला मिळाला आहे. त्याने तीन सामन्यात २५९ धावा केल्या. एकदिवसीय क्रिकेटमध्ये गिलने नंबर-१ रँकिंग गाठण्याची ही दुसरी वेळ आहे.

श्रीलंकेचा फिरकी गोलंदाज महीष तीक्षणाने गोलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थान पटकावले आहे. त्याने अफगाणिस्तानच्या रशीद खानला मागे टाकले आहे. गोलंदाजांच्या क्रमवारीत टॉप-१० मध्ये दोन भारतीय आहेत, कुलदीप यादव आणि मोहम्मद सिराज. कुलदीपला एका स्थानाचा फायदा झाला आहे.

एकनाथ शिंदेंना जीवे मारण्याची धमकी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २० :
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. यासंदर्भात गोरेगाव पोलिस ठाण्यात धमकीचा ईमेल करण्यात आला आहे.

शिंदे यांची गाडी बॉम्बने उडवण्याचा उल्लेख यामध्ये करण्यात आला आहे. त्यामुळे आता पोलिसांकडून ई-मेल पाठवणाऱ्याचा शोध सुरू झाला आहे. वास्तविक शिंदे यांना धमकीची ही पहिली वेळ नाही. या आधी देखील त्यांना अनेकदा धमक्या देण्यात आल्या आहेत.

याआधीही धमक्या

मला अनेकवेळा अशा धमक्या आलेल्या आहेत. पण मी असल्या धमक्यांचा कधी विचार केला नाही. मी माझे काम करत राहिलो आणि आताही काम सुरू राहणार आहे. आज दिल्ली येथे ते माध्यमांशी बोलत होते. अशा धमक्यांना मी भीक घालत नसल्याचेही ते म्हणाले.

एक महिन्यापूर्वी देखील उपमुखमंत्री एकनाथ शिंदे यांना एका व्यक्तीने धमकी दिल्याचा प्रकार समोर आला होता.

एका २४ वर्षीय तरुणाने एकनाथ शिंदे यांना जीवे मारण्याची धमकी दिली होती. याबाबत त्याने सोशल मीडियावर प्लॅटफॉर्म इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ पोस्ट केला होता. या पोस्टद्वारे त्याने एकनाथ शिंदे यांना धमकी दिली होती. याप्रकरणी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी तरुणावर गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी केली होती. हितेश प्रभाकर धेंडे असे या तरुणाचे नाव असल्याचे समोर आले होते.

शिंदेंच्या निर्णयाची चौकशी होणार!

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :
सिडकोच्या जालन्यातील खरपुडी प्रकल्पाच्या चौकशीचे आदेश मुख्यमंत्री सचिवालयाकडून देण्यात आले आहेत. सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांना या प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे आता सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकल्पाला मंजुरी दिली होती. मात्र ९०० कोटी रुपयांच्या या प्रकल्पावरून आता शिंदे आणि भाजपतच शीतयुद्ध पुन्हा समोर आले आहे. एकनाथ शिंदे यांच्या निर्णयाची चौकशी करण्याचे आदेश फडणवीसांनी दिल्यामुळे त्यांच्या आदेशाचा अर्थ काय? याबाबत आता राज्यात चर्चा सुरु झाली आहे.

जालना जिल्ह्यातील ९०० कोटी रुपयांच्या या प्रकल्पाला एकनाथ शिंदे यांनी मंजुरी दिली होती. याबाबत उद्धव ठाकरे गटाचे माजी आमदार संतोष सांबरे यांनी चौकशीचे पत्र दिले होते. सिडकोच्या जालना जिल्ह्यात खरपुडी प्रकल्पात भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप यात करण्यात आला होता.

या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आता चौकशीचे आदेश दिले आहेत. त्यामुळे फडणवीस, शिंदे यांच्यातील शीतयुद्ध सुरू असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे.

मराठी साहित्यात लीळाचरित्राचे स्थान

प्रा. डॉ. किरण वाघमारे
सहायक प्राध्यापक
९८५०९०२१५४

मराठी साहित्याचा प्रांत अतिशय समृद्ध आणि सशक्त आहे. मराठी साहित्याला दीर्घ आणि प्राचीन अशी परंपरा लाभली आहे. आज इतर भाषांमधील जी साहित्य संपदा आहे त्यामध्ये मराठी साहित्य कुठेही मागे नाही. उलट मराठी साहित्याने आपले भावविश्व अतिशय व्यापक केलेले असून जागतिक साहित्याला तोडीस तोड साहित्य मराठी भाषेमध्ये उपलब्ध आहे.

समाजातील सर्वच अंगांना स्पर्श करण्याचे कार्य मराठी साहित्याने केले आहे. कविता,कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णन अशा विविध प्रकारांनी मराठी साहित्य बहरलेले आहे. प्रामुख्याने वैचारिक आणि ललित अशा दोन्ही प्रांतात मराठी साहित्याची मुशाफिरी दिसून येते.

या दोन्ही प्रांतात अतिशय विपलु असे लेखन मराठी भाषेत आढळून येते. मराठी साहित्याचा मागोवा ज्यावेळी आपण घेतो त्यावेळी आपण बाराव्या शतकात जाऊन पोहोचतो. बारावे शतक हे मराठी साहित्याच्या दृष्टीने सुवर्णकाळ होय. याच काळात मराठी साहित्य गंगेचा उगम झालेला दिसून येतो.

मराठीचा पहिला लिखित स्वरुपातील ग्रंथ लीळाचरित्र याच काळात लिहिल्या गेला. गद्य निर्मितीचा पाया या ग्रंथाने घातला. याप्रमाणेच धवळे हे आद्य काव्य देखील याच काळात रचल्या गेले. इथून सुरु झालेला मराठी आणि गद्य आणि पद्य साहित्याचा प्रवास अविरतपणे अद्यापही सुरुच आहे.

मराठीच्या आरंभकाळाला सुवर्णयुग असे म्हटल्या गेले आहे कारण मानवी जीवनाच्या सर्व अंगाला स्पर्श करणारा आद्य ग्रंथ लीळाचरित्र एक मानदंड ठरला. पुढे ज्ञानेश्वरीसारखे महाकाव्य असेल किंवा नरेंद्राचे रुक्मिनी स्वयंवर हे काव्य असेल यांनी मराठी साहित्याला श्रीमंती प्राप्त करुन दिली आहे.

या ग्रंथांचा आदर्श पुढे ठेवतच आजतागायत शेकडो ग्रंथ मराठी भाषेमध्ये निर्माण झाले. महानुभाव साहित्याचे तर मराठी भाषा श्रीमंत करण्यात फार मोठे योगदान आहे. महानुभावांनी मराठी साहित्याला साडेसहा हजार ग्रंथ दिले आहेत. एवढया मोठया प्रमाणात एकाच संप्रदायाने ग्रंथ निर्मिती करावी हे जगाच्या पाठीवर कुठेच घडलेले नाही.

महानुभाव साहित्याशिवाय मराठी भाषेचा इतिहास अपूर्णच राहील. एवढे महत्वपूर्ण साहित्य या संप्रदायाने मराठी भाषेला दिलेले आहे. आधुनिक काळात देखील महानुभाव साहित्याची निर्मिती सुरुच आहे. आधुनिकतेशी महानुभाव साहित्याने जुळवून घेतले आहे.

संशोधनासोबतच आधुनिक काव्यात चितपरिचीत असलेले कथा, कादंबरी आणि काव्य प्रकार देखील महानुभाव साहित्यिक हाताळत असून ते मराठी साहित्याच्या प्रांतात आपला ठसा उमटवित आहेत- असे असले तरी लीळाचरित्राचे मराठी साहित्यात आगळे वेगळे स्थान आहे हे मान्य करावेच लागेल.

लीळाचरित्र ग्रंथ कसा तयार झाला याविषयी अत्यंत उद्बोधक माहिती आहे. श्रीचक्रधर स्वामींच्या प्रयाणानंतर त्यांचे पट्टशिष्य नागदेवाचार्य व इतर भक्तमंडळी रिद्धपूरला श्रीगोविंदप्रभूंच्या सेवेसाठी येऊन राहिले. स्वामीच्या विरहाचे दुःख सर्वांच्याच अंतःकरणात भरलेले होते. नागदेवाचार्य तर श्रीगोविंदप्रभूंची सेवा आटोपल्यानंतर एकांतात बसून स्वामींच्या लीळांचे स्मरण करीत असतं. हे केवळ विरह दुःखाचे ओवले-पोवलेपण नाही. आचार्य कशाचे तरी निरंतर स्मरण करीत असतात. हे चाणाक्ष म्हाइंभटांच्या लक्षात आले.

एके दिवशी त्यांनी नागदेवाचार्यांना विचारले भटोः तुम्ही निरंतर काइसयाचे मनन करीत असा, तुम्हासी केव्हळीही मननावेगळेया न देखोः यावर नागदेवाचार्यांनी उत्तर दिले. मी नेहमी स्वामींच्या लीळा मनन करीत असतो. स्वामींच्या सान्निध्यात मी जेव्हा हिरवळीला होतो, तेव्हा एके दिवशी त्यांनी मला तेथून रिद्धपूरला पाठविले.

मी जायला निघालो, तेव्हा सर्वज्ञांनी मला म्हटले, वानरेयाः एथोनि निरोपीले विचारशास्त्रः अर्थशास्त्रः तयाचे श्रवणः मननः निदिध्यसन करावेः तेही एक स्मरणचि कीं गाः एथीची चरित्रे आठविजेतिः आइकीजेतिः तेही एक स्मरणचि कीं गाः असे निरुपण सर्वज्ञांनी मला त्यावेळी केले होते.

म्हणून त्यावेळी रिद्धपूरला म्हणजे येथे श्रीप्रभूंच्या सान्निध्यात असताना श्रीप्रभूच्या ज्या खेळक्रीडा पाहिल्या त्या सर्वांचे मी निरंतर स्मरण करीत असतो.

मी जैलागुनी अनुसरलां तैलागुनी मज देखता जीया सर्वज्ञांचीया लीळा वर्तलीया तीया मी आवांकीतेचि असेः जै मज पवाड नसेः सर्वज्ञांच्या सेंवादास्यालागी कव्हणीकडे जाए तरी जीए भक्ते सर्वज्ञांजवळि असेति त्याते एऊनि पुसेः आन मी अनुसरलां नव्हता तै बाइसादेखत जिया लीळा वर्तलीया तीया मीया सर्वज्ञाते पुसीलीयाः आन सर्वज्ञे प्रसंग परांत नीरुपीले इतिहास तेही आवांकीत असेः आन सर्वज्ञे जे नीरोपीले परावर नीरुपन तेही आवांकीतूची असेः आन अळजपुरीहून सर्वज्ञे बीजे केले तो थौनि प्रतिष्ठानापर्यंत जीया लीळा वर्तलिया तीया सर्वज्ञे प्रसंगे भक्तापरिवारात सांगीतलीया तीया आठवीतूचि असेः आन सर्वज्ञे जै एकांकी राज्य केले तीया लीळाः सर्वज्ञे प्रसंगे भक्ताप्रती नीरुपीलीयाः तीयाही आठवितूचि असेः आन सर्वज्ञे द्वापरिचीया लीळाः श्रीप्रभूचीया लीळा प्रसंगे भक्ताप्रति नीरुपीलिया तीयाही आठवितुची असेः



आपण कशाचे मनन करीत असतो याचा वृत्तांत नागदेवाचार्यांकडून ऐकल्यावर दूरदर्शी प्रज्ञावंत म्हाइंभटांच्या मनात एक विचार स्फुरला व तो त्यांनी ताबडतोब बोलूनही दाखविला.

आचार्यांना ते म्हणाले, भटो तुम्हासी सर्वज्ञांचा वरुः म्हणौणि सर्वज्ञे नीरोपीले ज्ञानः शास्त्र ज्ञातः सर्वज्ञे जीया केलीया सांगितलीया तीया तुम्हासि आठवितातिः तरि आता श्रीचरणा सन्निधानी आम्हांसीः आन पुढे जो सर्वज्ञांचा मार्ग होइल त्यासि तवं इतुके शास्त्र न धरेः तरि सर्वज्ञांचिया लीळा तुम्ही सांगा आन मी लीहिनः भटी म्हणीतलेः हो कांः लिहीले मार्गासी उपयोगा जाईलः सर्वज्ञाते मागार्ची प्रवृत्ती असेः कां पाः सर्वज्ञे म्हणीतलेः शास्त्र घेइजेः मग काळे करुनी उपयोगा जायेः

लीळाचरित्राच्या रुपाने स्वामींच्या आठवणी लिहून काढण्याचा विचार ज्यावेळी म्हाइंभटांना स्फुरला तो क्षण मराठी साहित्याच्या दृष्टीने अपूर्व क्षण होता यात शंका नाही. या आठवणी लिहून काढण्याचे प्रयोजन जरी महानुभाव पंथा पुरते मर्यादित असले तरी त्यामुळे महाराष्ट्र, मराठी भाषा व मराठी साहित्य यांची म्हाइंभट व नागदेवाचार्य या दोन्ही पंडितांकडून कशी अनमोल सेवा घडली हे आपणास आज अनुभवाला येते.

पुढे नागदेवाचार्यांनी आठवणी सांगायच्या आणि म्हाइंभटांनी त्या लिहून काढायच्या असे ठरले. मग माहिभटी लेखन आरंभीलेः भट माहीभट वाजेश्वरी वीजन करीतः ऐसे अवघे भटोबासी लीळा कथन केलेः ते माहीभट सा मासा लीहिलेः आणि अशारितीने सहा महिण्यात लीळाचरित्राचा कच्चा खर्डा तयार झाला.

लीळाचरित्राचा खर्डा तयार झाल्यावर त्यातील मजकूर यथार्थ असावा, त्यात कोणतीही चूक किंवा कमी अधिकपणा राहू नये म्हणून ज्या विद्यमान व्यक्तींचा त्यात संबध आला होता त्यांच्याकडून त्या मजकुराची खात्री करुन घेणे आचार्यांना आवश्यक वाटले.

म्हणून म्हाइंभटांना त्यांनी म्हटले, माहीभटो जै मी सर्वज्ञाते अनुसरलां नाही तै बाइसां अवीद्यमान जीया लीळा वर्तलीया तिया तयाचीये अनुभवीचीया तयाते पुसावीयाः जानोचेया अनुभवीचीया जानोते पुसावीयाः नाथोचीये अनुभवीचीया नाथो ते पुसावीयाः येल्होचीये अनुभवीचीया येल्होते पुसावीयाः एये जीयाचाची परी ज्या ज्या ज्याचिये अनुभवीचीया लीळा त्या त्यासि पुसावियाः श्रीप्रभूचा सन्निधानी जे भक्त होते त्याचीये अनुभवीचीया लीळा त्याते पुसावीयाः

मग म्हाइंभटांनी आचार्यांच्या आज्ञेप्रमाणे गावोगावी फिरुन स्वामींच्या लीळा गोळा केल्या व पुन्हा त्या नागदेवाचार्यांना दाखविल्या व शके ११९७ मध्ये लीळाचरित्र हा ग्रंथ तयार केला.

म्हाइंभटांनी लिहिलेल्या लीळाचरित्राची एकच प्रत होती. लीळाचरित्र म्हाइंभटांनी बाळबोध लिपीत लिहिले होते. त्यावेळी त्याच्या प्रतिलिपी तयार केल्या नाहीत. ही प्रत नागदेवाचार्यांजवळ होती.

त्यांच्या निधनानंतर ती बाइदेवबासाकंडे व नंतर कवीश्वरबासाकंडे आली व त्यांच्याजवळ असतांनाच खालशाची धाड आली व त्यावेळी ही आद्य प्रत नाहीशी झाली. सिद्धांते हरिबास व धाकटे सोंगोबास यांच्या अन्वयस्थळात आन तिन्ही रुपेचरित्रे महाइभटीचि केली परि ते लीळासंबंध खालसाचिया धाडीसी नाहीचि जालेः असा स्पष्ट उल्लेख आहे. पुढे लीळाचरित्रावर अनेक पिढीपाठ तयार झाले. हे सर्व पाठ लिपीबद्ध होते.

खालशाच्या धाडीत मुळ प्रत नष्ट झाल्यावर त्याच्या पुनर्लेखनाचे काम प्रथम कमळाइसाची शिष्या हिराइसा हिने केले. हिराइसाला एकछंदी प्रज्ञा होती. त्यामुळे एकदा ऐकलेले तिच्या डोक्यात पक्के बसतं असे. तिने लीळा सांगितल्या व पाटकुले मालोबास यांनी लिहून काढल्या. हे पुनर्लेखनाचे काम शके १२३२ मध्ये झाले.

महानुभावांनी अचाट साहित्य निर्मितीचे काम करुन महाराष्ट्र वाङ्मय इतिहास समृद्ध केला आहे. महाराष्ट्राबाहेर पंजाब, काश्मीर, उत्तप्रदेश, आंध्रपदेश किंबहुना अफगाणिस्थान, काबुल- कंदहार पर्यंत महानुभावांनी मराठी भाषा पोहोचविली. सोबत महाराष्ट्राच्या संस्कृतीला सर्वदूर नेले.

महानुभाव विचारधारा असलेले साहित्यिक आधुनिक साहित्यात संचार करीत असून ते मराठी साहित्य विश्वाला दमदार साहित्यकृती देत आहेत. याची दखल मराठी साहित्य विश्वाने घेणे आवश्यक आहे. काव्यातील अभंग, गझल अशा प्रकारांचा देखील वापर महानुभाव साहित्यिक करीत आहेत. कलगीतुरा याचा देखील अंतर्भाव महानुभाव साहित्यिकांनी केला आहे.

अशाप्रकारे मराठीच्या आरंभकाळी एक सशक्त आणि परिपूर्ण साहित्य निर्मिती करुन मराठी साहित्य निर्मितीचा पाया घालणाऱ्या महानुभाव साहित्यिकांनी आधुनिक काळात देखील आपली साहित्य निर्मिती सुरुच ठेवली असून महानुभावीय विचारधारेच्या ग्रंथ निर्मितीसोबतच इतरही अनेक ग्रंथांची निर्मिती करुन आपली देखील नाळ आधुनिक साहित्यासोबत जुळलेली आहे हे दाखविण्याचा एक उत्तम प्रयत्न या साहित्यिकांनी केला आहे. भविष्यात हा प्रवाह अधिक जोमाने प्रवाहित होत जाईल यात कुठलीच शंका नाही.

सारस्वती जन्मभू : आदिपर्व

सुरेश अकोटकर (भावचित्रे)
अमरावती .

दक्षिण हिंदुस्थानातील सर्वात प्राचीन देश म्हणून विदर्भाचे नाव घेण्यात येते. रामायण, महाभारत, रघुवंश आदी प्राचीन ग्रंथांमधून विदर्भाचे संदर्भ येतात. कवी राजशेखरने 'सारस्वती जन्मभू' म्हणून या भूमीला प्रशस्तिपत्र बहाल केले आहे. मराठी भाषेची जननी म्हणूनही तिचा उल्लेख करण्यात येतो.

काळ कुणासाठी थांबत नाही. गतकाळाची पुनरावृत्तीही होत नाही. या काळाच्या विशाल पडद्यावर अनेक ऋषिमुनी आणि लेखक कवी आपल्या शब्दांची अक्षरनोंद ठेवून व आपले अस्तित्व चिरंजीव करून पडद्याआड निघून जातात. वाचकांच्या हाती उरतो तो या आठवणीतील अक्षरांचा अमोल ठेवा...

विदर्भाच्या सुवर्णाक्षरांतले एक पान इंद्रपुरीचे आहे. एके काळची संपन्न आणि विख्यात नगरी म्हणजे इंद्रपुरी म्हणजेच अमरावती. तिच्या प्राचीनतेच्या खुणा आज जागोजागी आढळतात. ऋग्वेदातील काही सूक्तांचा द्रष्टा आणि आर्यपुरुष अगस्ती ऋषी यांची पत्नी विदर्भ राजकन्या लोपामुद्रा, नळराजाची राणी दमयंती, श्रीकृष्णाची पत्नी रुक्मिणी आणि दशरथ राजाची आई इंदुमती येथल्याच मातीत जन्मल्या. या चारही विदर्भकन्यांचा इतिहास अमरावती जिल्ह्यातल्या चांदूर तहसीलीतील 'कौडिंण्यपूर' या एकेकाळच्या विदर्भाच्या राजधानीच्या नावाने जगाला ज्ञात आहे.

सालबर्डी

याच जिल्ह्यात सातपुडा पर्वताच्या रम्य कुशीत सालबर्डी वसली आहे. येथे वाल्मिकी ऋषींचा आश्रम होता. सीता इथेच आश्रयाला होती. लव-कुश ह्याच ठिकाणी वाढले अणि राम-सीतेचे पुनर्मिलन येथेच झाले, अशी आख्यायिका आहे. श्री चक्रधरस्वामींनीही येथेच तप केले होते.

येथले रिद्धपूर म्हणजे महानुभावपंथीयांची काशी. या पंथाचे चौथे कृष्ण श्री गोविंद प्रभू यांचे वास्तव्य रिद्धपूरला होते. त्यांच्याकडून चक्रधर स्वामींनी ज्ञान प्राप्त केले आणि महानुभाव पंथ पुरस्कृत केला. (तेरावे शतक) अनेक पुरोगामी तत्त्वांची बांधिलकी स्वीकारलेला हा पंथ येथूनच पुढे भारतभर पसरला.

चक्रधरस्वामींची शिष्या महदंबा महानुभाव वाङ्मयात आद्य कवयित्री म्हणून प्रसिद्ध आहे. तिचा चक्रधरांच्या स्तुतीपर लिहिलेला अभंग लीळाचरित्रात आहे. तद्वतच धवळे हे तिचे एक सुंदर कथागीत असून गेयता हे त्याचे वैशिष्ट्य आहे. आजही महानुभावांच्या मठातून हे धवळे सामूहिकरित्या म्हटले जाते. देश-विदेशातील संशोधक आजही रिद्धपूरला येत असतात.

राजज्योतिषी कृष्णः

या भूमीत अंदाजे सतराव्या शतकात एक प्रसिद्ध ज्योतिष घराणे होऊन गेले. या घराण्यातला विद्वान ज्योतिषी आणि ग्रंथकार कृष्ण याने काही ग्रंथांची निर्मिती केली. बीजगणितावर टीकाग्रंथ लिहून स्वतःचे काही नवे सिद्धांत मांडले. त्यावेळचा राजा जहांगीर याने त्याला आपल्या दरबारात राजज्योतिषी म्हणून मानाचे स्थान दिले.

सुर्जी-अंजनगाव

साहित्याचा अभिजात वारसा मिळालेले एक गाव सुर्जी अंजनगाव. संत एकनाथ महाराजांच्या शिष्यपरंपरेतले विदर्भकवी श्री देवनाथ महाराज (इ.स. १७५४-१८३१) हे अंजनगावचेच. श्री. राजेश्वरपंत कमाविसदार यांच्या कुळात सुर्जी येथे 'देवराज' जन्माला आले. त्यांना कुस्त्यांचा भारी शौक. 'निरुद्योगी' म्हणून घरी आईशी व मोठ्या बंधूशी भांडण झाले. त्यामुळे ते सुर्जीच्या हनुमान मंदिरात गेले आणि ध्यान लावले.

योगायोगाने या २७ वर्षांच्या ब्रह्मचारी देवरावांची संत एकनाथांच्या संप्रदायातील तेरावे पुरुष श्री गोविंदनाथ यांच्याशी गाठ पडली. गोविंदनाथांनी त्यांच्यावर अनुग्रह केला. आणि त्यांचे 'देवनाथ' हे सांप्रदायिक नाव ठेवले. तेव्हापासून त्यांचा काव्यप्रवास आणि कीर्तने यांना प्रारंभ झाला. या निमित्ताने ते भारतभर फिरले. संत नामदेव महाराजानंतर पंजाबात जाऊन समाजप्रबोधनाचे कार्य श्री देवनाथांनीच केले. अनेक ठिकाणी आपले मठ स्थापन केले. आज मुख्य मठ सुर्जीला आहे.

श्री देवनाथ महाराज या मुख्य पीठावर विराजमान झाले. त्यांच्यानंतरचे पीठाधीश श्री दयाळनाथ महाराज हेही श्रेष्ठ प्रतीचे आख्यानक कवी होते. त्यानंतरच्याही पीठाधीशांनी काव्यरचना केल्या. श्री देवनाथ व श्री दयाळनाथ यांची कविता प्रासादिक आहे.

द्रौपदीचा कृष्णासाठीचा धावा दयाळनाथ या शब्दांत बद्ध करतात- 'ये धावत कृष्णा बाई अति कनवाळे निज जन मन सर समराळे.' हृदय हेलावून टाकणारी अशी ही रचना आहे. श्री दयाळनाथांचे निधन वयाच्या ४८ व्या वर्षी (इ.स.१८३६) हैद्राबाद येथे झाले. श्री देवनाथांच्या निधनाची कथा मात्र मती गुंग करून टाकणारी आहे.

रामनवमीच्या निमित्ताने ग्वाल्हेरला ते कीर्तन करण्यासाठी गेले. अपार गर्दीत त्यांनी कीर्तन सुरू केले. एवढ्यात मंडपाला आग लागली. शेकडो लोक मारले गेले. देवनाथ महाराज बाहेर पडणार तोच कुणीतरी त्यांना कुत्सितपणे म्हणाले, 'नैन छिन्दती शस्त्राणी, नैन दहती पावक.' हे ऐकून देवनाथांनी त्या इसमाला घट्ट पकडून ठेवले आणि त्याच्यासोबतच ते अग्निदेवतेच्या स्वाधीन झाले. श्री देवनाथांची समाधी ग्वाल्हेरला आहे अन् त्यांनी स्थापित केलेला मठही तेथे आहे.

अमरावती : काही वेधक नोंदी

अमरावती हे नाटककारांचे गाव आहे, तसेच ते नाट्यवेड्यांचे गाव आहे. नामवंत कंपनींची नाटके अमरावतीला आली की ती पाहण्यासाठी दूरदूरून नाटकांचे रसिक येत. छकडा, पायटांगी व सायकल ही त्यावेळची वाहने. काही श्रीमंत व्यक्ती घोडा वा घोडागाडी वापरत. जमेल त्या वाहनाने माणसे येत. रात्रभर नाटकांचा आस्वाद घेत. त्या काळची नाटकंही 'रात्रीचा समय सरूनी येत उषःकाल हा...' अशा स्वरूपाची असत.

अमरावती लेखक-कवींचेही गाव आहे. या शहराने महाराष्ट्राला 'साहित्य-सोनियाच्या खाणी' दिल्या आहेत. मराठी कवितेला मुक्तछंद देणारे कवी अनिल येथेच शिकले. कुसुमावती देशपांडेही येथल्याच. कुसुमावतींचे वडील जयवंत कविता लिहीत. शालेय जीवनापासूनच कुसुमावती येथल्या साहित्य विशेष आणि सांस्कृतिक कार्यक्रमात हिरिरीने भाग घेत. 'कुसुमानिल' यांचे प्रेम येथेच फुलले.

बेडेकर इथलेच

विश्राम बेडेकर यांचा जन्म अमरावतीचाच. त्यांची नाटक व चित्रपटातील कामगिरी सर्वांना परिचित आहे. 'ब्रह्मकुमारी' हे त्यांचे पहिले नाटक दि. १५/६/१९३३ रोजी रंगभूमीवर आले. (संगीत- मास्टर दीनानाथ) त्यानंतर त्यांनी मोजकेच लेखन केले. त्यांच्या वास्तव्यातली अमरावती, विदर्भ महाविद्यालय, मित्रमंडळी आणि येथे भोगलेले दारिद्र्य... या साऱ्या आठवणी त्यांनी आपल्या आत्मचरित्र ग्रंथातून (एक झाड दोन पक्षी) मांडल्या आहेत. बेडेकरांचे वडील रेल्वे स्टेशन परिसरातील आळशी राममंदिराचे पुजारी होते.

कवी कृष्णमूर्ती, गोपाळराव बेडेकर, बा. सं. गडकरी, ना. कृ. दिवाणजी, दादासाहेब आसरकर, डॉ. श्री. व्यं. केतकर, काकासाहेब सहस्त्रबुद्धे. वि. रा. हंबर्डे, रा. द. सरंजामे, डॉ. भवानराव म्हैसाळकर, मा. ल. व्यवहारे, पु. य. देशपांडे, खापर्डे बंधू, वीर वामनराव जोशी, नानासाहेब बामणगावकर, कृष्णाबाई खरे, अ. तु. वाळके, जा. दा. राऊळकर, वासुदेवशास्त्री खरे, तात्यासाहेब सबनीस, भाऊसाहेब असनारे, अप्रबुद्ध, संत गुलाबराव महाराज, संत तुकडोजी महाराज, गीता साने, सुदामजी सावरकर, विमलाबाई देशपांडे आदींनी आपल्या लेखनकर्तृत्वाने आपला काळ गाजवला आहे. संत तुकडोजी महाराजांची ग्रामगीता, श्लोक, अभंग आणि इतर लेखन यांची जनमानसावरील पकड आजही कायम आहे. त्यांचे एकूणच लेखन चिरंजीवी ठरले आहे.

वाचता वाचता

जुन्या लेखनकर्तृत्वाचा धांडोळा घेताना काही संस्मरणे वाचनात आली. सुप्रसिद्ध कादंबरीकार बाळकृष्ण संतुराम गडकरी, यवतमाळचे यशवंत खुशाल देशपांडे आणि डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर हे तिघेही जिवाभावाचे मित्र होते. ते एकाच शाळेत शिकत. नगर वाचनालयात ग्रंथवाचन करीत आणि मराठी वाङ्मयावर चर्चा घडवत.

सुप्रसिद्ध कादंबरीकार गीता साने अमरावतीतली १९२६ मध्ये प्रथम श्रेणीत मॅट्रिक होणारी पहिली मुलगी. सायन्स कॉलेजचीही पहिली विद्यार्थिनी. लग्नानंतर आडनाव न बदलविणारी. पहिली मराठी लेखिका ! उत्तर प्रदेश व बिहारमध्ये स्त्री-शिक्षणाचा प्रसार करणारी पहिली विदर्भकन्या !

कवी गणपतराव देशमुख हे स्वामी शिवानंद नावाने ओळखले जायचे. अमरावती नगरपालिकेत ते लिपिक होते. इंग्रज अधिकाऱ्यांविरुद्ध कविता रचल्यामुळे १९०७ साली त्यांना सात वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा फर्मावली होती. परंतु पुढे वऱ्हाडात पाय ठेवू नये, या अटीवर त्यांना मुक्त करण्यात आले. कविता लेखनामुळे तुरुंगात जाणारा हा पहिलाच वैदर्भीय कवी असावा.

डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांनी लेखन केले नसले तरी ते अनेक लेखकांचे प्रेरणास्थान होते. डॉ. वि. भि. कोलते यांनी आपल्या आत्मचरित्रात (अजूनि चालतोचि वाट) भाऊसाहेबांच्या अनंत उपकारांचे स्मरण मोठ्या हृद्यतेने केले आहे. भाऊसाहेबांबद्दल एक विशेष माहिती मिळाली. त्यांना स्वतःचे नाव इंग्रजीत Panjab ऐवजी Punjab लिहिणे योग्य वाटत नसे. कुणी असे लिहिल्याचे लक्षात आले की ते नावातल्या 'यू' अक्षराचा 'ए' करीत.

सुप्रसिद्ध नट-दिग्दर्शक गजानन जागिरदार अमरावतीलाच चौथीपर्यंत शिकले. सुप्रसिद्ध नाटककार जयराम केशव ऊर्फ भाऊसाहेब असनारे यांनी आपले आयुष्य संगीत नाटकांना वाहून टाकले. आजही असनारे घराण्याची आजची पिढी संगीत, वादन आणि गायन या क्षेत्रात नाव मिळवित आहे. परंतु आज हे कुटुंब सांगलीला स्थायिक झाले आहे.

दादासाहेब खापर्डे ह्यांनी हिराबाई बडोदेकरांना 'गानकोकिळा' पदवी अमरावतीलाच प्रदान केली होती. पूर्वी राजकमल चौकात 'महाराष्ट्र प्रकाशन' या नावाची सुप्रसिद्ध प्रकाशन संस्था होती. या प्रकाशनाने आचार्य अत्रे, गो. नी. दांडेकर, जयवंत दळवी इ. नामवंत लेखकांची काही पुस्तके एका काळात प्रकाशित केली होती.

कादंबरीकार ह. ना. आपटे यांनी 'जयध्वज' नावाचे नाटक लिहून त्याचा पहिला प्रयोग १९०५ च्या सुमारास अमरावतीला केला होता. विख्यात लेखक रा. भि. जोशी हे अमरावतीला शिकले आणि काही वर्षे अमरावतीच्या डेप्युटी कमिशनरच्या ऑफिसात नकलनवीस म्हणून काम केले. ह.भ.प. ल. रा. पांगारकर हे काही काळ अमरावतीला शिक्षक होते. डॉ. श्री. व्य. केतकर हे त्यांचे विद्यार्थी. अमरावतीच्या एके काळच्या साहित्य आणि सांस्कृतिक जीवनाचा हा धावता आढावा.

विद्रोही मराठी साहित्य संमेलन

छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक २१, २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी आयोजित १९ व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी लोकसाहित्य व संस्कृतीचे अभ्यासक, इतिहास संशोधक व भाषातज्ञ डॉ. अशोक राणा (यवतमाळ) यांची निवड झाली आहे. विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या अध्यक्ष प्रा. प्रतिमा परदेशी यांनी पत्रकार परिषदेत घोषित केली. डॉ. अशोक राणा हे १८ व्या विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ग्रामीण साहित्यिक डॉ. वासुदेव मुलाटे यांच्याकडून सूत्रे हाती घेतील.

विद्रोही सांस्कृतिक चळवळ १९९९ पासून महाराष्ट्रभर कार्यरत आहे. महात्मा जोतिराव फुले यांनी ग्रंथकार सभेस पाठविलेले पत्र हा विद्रोहीचा वैचारिक जाहीरनामा आहे. न्या. म. गो. रानडेंनी ग्रंथकार सभेत सहभागी होण्याचे निमंत्रण म. जोतीराव फुले यांना दिले; तेव्हा तुमच्या ग्रंथांमध्ये अखिल मानवाचे हित होईल याचे बीज नाही. असे म्हणत म. फुलेंनी उंटावरून शेळ्या वळणाऱ्या घालमोड्या दादाच्या त्या संमेलनात सहभागी होण्यास ठाम नकार दिला होता.

आमचे ग्रंथकार तयार होतील, तेव्हा ते स्वाभिमानाने आपली संमेलने भरवतील असेही म्हटले होते. ग्रंथकार सभेचे २० व्या शतकातील स्वरूप म्हणजे अ. भा. मराठी साहित्य संमेलन आहे. अ. भा. साहित्य संमेलन आणि महामंडळ यांचा आजवरचा व्यवहार हा विषमतावादी राहिला आहे.

चिपळूणच्या साहित्य संमेलनात परशुरामाची मूर्ती स्टेजवर ठेवण्याचा आग्रह, ठाण्यात संमेलन स्मरणिकेत महात्मा यांच्या खुन्याचा पंडित नथुराम' असा उल्लेख करणे असेल. संयुक्त महाराष्ट्राचे सेनानी शाहीर अण्णाभाऊ साठे, शा. गव्हाणकर, शा. अमर शेख, शा. वामनदादा कर्डक, शा. यशवंत चकोर, क्रांतीसिंह नाना पाटील, भाई उद्धवराव पाटील, कर्मवीर दादासाहेब गायकवाड, यांना संमेलनासाठी साधे निमंत्रणही न देणे; उलट अनेक दांभिकांना अध्यक्षपदे बहाल करणे, स्वातंत्र सैनिक व थोर गांधीवादी नयनतारा सहेगल यांना यवतमाळला उद्घाटक म्हणून बोलावून नंतर अपमानित करणे, संविधान जाळण्याचे समर्थन करणारांना प्रतिष्ठा देणे अशी अ.भा. मराठी साहित्य संमेलनाच्या विषमतावादाची असंख्य उदाहरणे आहेत. किंबहुना विषमतावादी सांस्कृतिक राजकारणाचे ते मूर्खंडच आहे.

म्हणूनच ब्राह्मणी, भांडवली, पुरुषत्ताक मूल्य आणि विषमतावादी सांस्कृतिक विचारांचा विषारी प्रचार-प्रसार करणाऱ्या संस्था, संघटना व संमेलनाच्या विरोधात भूमिका घेण्याचा फुले-आंबेडकरांचा संदेश मानून आपण विचार व संघटित कृती केली पाहिजे.

विद्रोही सांस्कृतिक चळवळ जीवनाच्या सर्व क्षेत्रात समतावादी संस्कृती व साहित्य विचारांचा पुरस्कार करते. विद्रोही साहित्य चळवळीच्या वतीने आजवर मुंबई, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती, सोलापूर, नंदुरबार, वाशी (नवी मुंबई), पुणे, मनमाड, धुळे, परभणी, बुलढाणा, हिंगोली, नाशिक, उदगीर, वर्धा, अमळनेर इत्यादी ठिकाणी साहित्य संमेलने, एक आंतरराज्य (निपाणी), एक विद्रोही महिला साहित्य संमेलन (पुणे) यशस्वीपणे आयोजित करण्यात आली आहे.

कालकथित बाबुराव बागुल, कवी वाहरू सोनवणे, डॉ. यशवंत मनोहर, डॉ. अजिज नदाफ, आत्माराम कनिराम राठोड, कॉ. तारा रेड्डी, तुळसी परब, डॉ. आ. ह. साळुंखे, संजय पवार, जयंत पवार, उर्मिला पवार, डॉ. श्रीराम गुंदेकर, डॉ. प्रतिभा अहिरे. विमल मोरे, डॉ. प्रल्हाद लुलेकर, डॉ. आनंद पाटील, गणेश विसपुते, चंद्रकांत वानखेडे, डॉ. वासुदेव मुलाटे यांसारख्या सर्जनशील साहित्यिकांनी विद्रोही साहित्य संमेलनाची अध्यक्षपदे भूषविली आहेत.

डॉ. अशोक राणा यांचे लेखन कार्य

डॉ. अशोक राणा हे मराठी साहित्य, भाषा, इतिहास, लोकसंस्कृती, प्रबोधन, संत वाङमय, आधुनिक समीक्षा, चित्रकला, नाट्य अशा विविध विषयांमध्ये पारंगत संशोधक म्हणून ख्यातनाम आहेत. त्यांची संशोधन व प्रबोधनपर ७६ पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यांनी विलास सारंग यांच्या कथांवरील अतिवास्तववादी छाया तसेच मराठी कथा व कवितांमधील नाग मिथक व प्रतिमा अशा आधुनिक व प्राचीन विषयांवरील अभ्यासापासून तरूण वयात संशोधनाला सुरूवात केली.

त्यांनी भाषा व साहित्य या विषयात साहित्याची भाषा, साहित्य निर्मिती प्रक्रिया, मराठीच्या मानगुटीवर संस्कृतची वेलांटी, बहुजन साहित्य म्हणजे काय? साहित्याची जात्यांधांची झुंडशाही, इत्यादी ५, प्राचीन इतिहास- मिथके- पुरातत्व- सण-उत्सव अशा लोकसंस्कृती संदर्भातील सिंधू जणांनी निऋती, शोध सरस्वतीचा, गणेश जन्माच्या कथेचा अर्थ, देवादिकांचे रहस्य, नागकथा व भूतपिशाच्च, कृषि विरूद्ध ऋषी, बौद्ध गणपती व सरस्वती, आदिमाया, सणांची सत्यकथा, मिथक साहित्य व संस्कृता इत्यादी २३ पुस्तके लिहिली.

प्रबोधनपर गाडगे बाबा, बाबासाहेब व भाऊसाहेब, डॉ. आंबेडकर व मातृदेवता, बुद्ध व बुद्धिप्रामाण्यवाद, वैज्ञानिक दृष्टिकोन व जादूटोणा, समरसतेचे वारकरी, मनुस्मृती-संघ व संविधान, राष्ट्रसंत तुकडोजी विचार इत्यादी १३, संत वाङमयासंदर्भातील वेदोक्त प्रकरण व संत साहित्य, रामदासी परंपरा व संत तुकाराम, सार्वकालिक संत तुकाराम, विठोबा कोणाचा? इत्यादी ५, जिजाऊ, शिवकाल, छत्रपती संभाजी, आहिल्यामाई या मध्य युगाच्या अंतिम चरणातील इतिहासाबद्दल : आरोपीच्या पिंजऱ्यात संभाजी, शिवशाहीचा उदय, शिवरायांचा प्रताप, शिवचरित्राची शिकवण, शिवाजी शूद्र कसे? , शिवराज्याभिषेक १ ला व २ रा अशी ११ पुस्तके, धर्म-ब्राह्मणी धर्म, शिवधर्म या संदर्भात शिवधर्म च

श्रींचा प्रगट दिनी डाबकी रोड स्थित गजानन महाराज मंदिराला सुंदर सजविले होते. आकर्षक रोषणाई आणि मंदिरात फुलांची सजावट करण्यात आली होती. मदिरात सकाळपासूनच दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होती.



राजपुतपुऱ्यातील श्री लोंधेश्वर शंकरजी संस्थान आणि गजानन महाराज मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात येत आहे. जिर्णोद्धारासाठी राजपूतपुरा येथील मंदिराचे निर्माण कार्य सुरु आहे. देखील आज श्रींच्या प्रगट दिनी या ठिकाणी छप्पन भोग श्री महाराजांना प्रसाद अर्पित केला गेला आहे.

‘ शिवरायांच्या स्वप्नातील सुजलाम सुफलाम देश घडविणे युवा पिढीचे कर्तव्य’ : शिव व्याख्याते अक्षय राऊत

डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात शिवजयंती उत्साहात साजरी!

▪अकोला,दि.२० (प्रतिनिधी):

सोळाव्या शतकात शिवरायांनी अवलंबिलेले उच्च दर्जाचे व्यवस्थापन युगानुयुगे सर्वांनाच मार्गदर्शक ठरणारे असून जागतिक स्पर्धेच्या या कालखंडात तरुणाईने शिवरायांचे इतिहासातून उच्च दर्जाचे व्यवस्थापन शिकत वेळेचे व्यवस्थापन, अखंड कार्य करण्याची शक्ती, प्रसंगी पराभव पचविण्याचे धैर्य, नियोजन, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आत्मविश्वास वृद्धिंगत करीत समाजहीत जोपसण्याचे कसब अंगीकरावे असे भावनाप्रधान आवाहन शिव चरित्राचे अभ्यासक सुप्रसिद्ध शिव व्याख्याते शिवजयंती उत्सवाचे प्रमुख वक्ते अक्षय राऊत यांनी केले. विद्यार्थी कल्याण विभाग डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला द्वारा कृषी महाविद्यालयाच्या स्व. के. आर. ठाकरे सभागृहात आयोजित शिवजयंती उत्सवात उपस्थित तरुणाईला ते संबोधन करीत होते.

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेची, मावळ्यांची आणि एकंदरीतच समाजाची घेतलेली निगा, शत्रूला नामोहरम करण्यासाठी अवलंबिलेले गनिमी काव्याचे अनेकानेक दाखले देत अक्षय राऊत यांनी शिवरायांचे चरित्र अवलंबित आजच्या युगात सचोटी, व्यवहार कुशलता व प्रसंगी वापरावयाच्या रणनीती आणि राष्ट्रहित तरुणाईला अनेकानेक दाखले देत पटवून दिले.

आपल्या अतिशय ओघवत्या, अभ्यासपूर्ण आणि वास्तवतेला धरून केलेल्या मार्गदर्शनात अक्षय राऊत यांनी तरुणाईच्या काळजाचा ठाव घेत शिवरायांच्या स्वप्नातील सुजलाम सुफलाम देश घडविणे युवा पिढीचे कर्तव्य विशेषतः कृषि पदवीधरांचे कर्तव्य असल्याचे आवर्जून सांगितले.

अल्पसंख्याकबहुल शाळांना अनुदानासाठी अर्ज करण्याचे आवाहन

▪अकोला,दि.२० (प्रतिनिधी):

अल्पसंख्याक बहुल शासन मान्यता प्राप्त खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपालिका/ नगरपरिषद शाळा व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी अनुदान मिळते. त्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. अनुदान मिळवू इच्छिणाऱ्या संबंधित संस्थांनी परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन कार्यालयास दिनांक २२ फेबुवारीपर्यंत मिळतील या बेताने सादर करावेत. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावाचा विचार केला जाणार नाही.

आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन

▪अकोला,दि.२० (प्रतिनिधी):

दि. २० फेबुवारी २०२५ रोजी मराठी पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त अकोला महानगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब मुख्य सभागृहात आयोजित कार्यक्रमामध्ये उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून माल्यार्पण करण्यात आले. यावेळी नगर सचिव विभागाचे मंगेश जाधव, गणेश गावंडे, मनपा शाळांचे मुख्याद्यापक, शिक्षक/शिक्षिका यांचेसह विजय वरुळकर, राजू गोंधळेकर, विश्वनाथ सुतवणे, भगवान गायकवाड व ईतर अधिकारी/कर्मचा-यांची उपस्थिती होती.

थोडक्यात

डॉ. झाकिर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना अनुदानासाठी इच्छूकांना अर्ज करण्याचे आवाहन

अकोला : ज्या मदरशांमध्ये फक्त पारंपारिक धार्मिक शिक्षण देण्यात येत आहे आणि ज्यांना आधुनिक शिक्षणाकरीता शासकिय अनुदान घेण्याची इच्छा आहे अशा मदरशांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.सदर मदरसे चालवणा-या संस्था धर्मदाय आयुक्त अथवा वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. इच्छुक मदरशांना विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दु हे विषय शिकविण्याकरीता शिक्षकांना मानधन, पायाभुत सुविधांसाठी व ग्रंथालयासाठी अनुदान, मदरशांमध्ये राहुन शाळेत शिकणा-या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती. निवासस्थानात इन्वर्टसची सुविधा, पेय जलाची व्यवस्था आदी बाबींसाठी अर्ज करता येईल. इच्छुक मदरशांनी अर्ज आवश्यक कागदपत्रे जोडून जिल्हा नियोजन समिती, नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, अकोला दिनांक २२ फेबुवारीपर्यंत प्रस्ताव २ प्रतीत कार्यालयीन वेळेत सादर करावा.

शासन निर्णयातील तरतुदीनुसार जास्तीत जास्त ३ डी. एड. /बी. एड. शिक्षकांना मानधन देण्यात येईल. शिक्षणासाठी हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दु यापैकी एका माध्यमाची निवड करुन त्यानुसार शिक्षक नेमणे आवश्यक आहे. ग्रंथालयासाठी तसेच शैक्षणीक साहित्यासाठी फक्त पहिल्यांदा ५० हजार रू व तद्रंतर प्रती वर्षी पाच हजार रू अनुदान देय आहे. पायाभूत सुविधांसाठी रु. १० लाख अनुदान देय आहे. पूर्वी ज्या बाबीसाठी लाभ मिळाला असेल तर तो पुन्हा, तसेच केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत लाभ मिळाला. असेल मदरशांना योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले प्रस्ताव ग्राह्य धरले जाणार नाहीत. अर्जाचा नमुना व आवश्यक कागदपत्रांची यादी http://mdd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

’हमसफर एक्सप्रेस’ रद्द

अकोला : उत्तर रेल्वेच्या जम्मू तवी स्थानकाच्या पुनर्विकास आणि यार्ड कनेक्शनच्या नॉन-इंटरलॉकिंग कामामुळे काही गाड्यांचे वेळापत्रक प्रभावित झाले आहे. हे काम फेबुवारी आणि मार्च २०२५ दरम्यान सुरू राहणार असून, या कालावधीत अनेक गाड्या तात्पुरत्या रद्द करण्यात आल्या आहेत. यात अकोला मागीवरून धावणाऱ्या जम्मू तवी एक्सप्रेस हमसफर एक्सप्रेसचाही समावेश आहे. ट्रेन क्रमांक १२७५१ नांदेड-जम्मू तवी एक्सप्रेस २१ फेबुवारी आणि २८ फेबुवारी २०२५ रोजी रद्द. ट्रेन क्रमांक १२७५ २ जम्मू तवी-नांदेड एक्सप्रेस २३ फेबुवारी आणि २ मार्च २०२५ रोजी रद्द.प्रवाशांना विनंती आहे की अधिक माहितीसाठी रेल्वेच्या वेबसाइटला भेट द्या किंवा हेल्पलाइन नंबरवर संपर्क साधावा.

विद्युत भवनात छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी

▪अकोला,दि.२० (प्रतिनिधी):

छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती विद्युत भवनात उत्साहात साजरी करण्यात आली. अधीक्षक अभियंता अजितपालसिंह दिनोरे यांच्याहस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित सहाय्यक उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी अरूण शेलकर,अपकार्यकारी अभियंता नितीन उमक,अनंता साबळे,अजिंक्य बुलबुले,तुषार जावरकर,क्षीरसागर ,धर्मे व उपस्थित सर्वांनी शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

अकोला खंडवा रेल्वे प्रकल्पाचे काम युद्धस्तरावर होणार?

▪अकोला,दि.२० (प्रतिनिधी):

ब्रॉडगेज रेल्वे मार्गासाठी सन २०१६ पासून अकोला हिवरखेड खंडवा हा रेल्वे मार्ग बंद करण्यात आला होता. मागील नऊ वर्षांपासून रेल्वे प्रेमी नागरिक व प्रवासी हा मार्ग पूर्ण होण्याची चातकाप्रमाणे वाट बघत होते. आता रेल्वे प्रेमींची स्वप्न युद्ध स्तरावर पूर्ण होण्यास सुरुवात झाली आहे.

बहु प्रतीक्षेत असलेल्या अकोला हिवरखेड खंडवा इंदोर या रेल्वे मार्गासाठी हजारो लाखो नव्हे... करोडो नव्हे तर अरबो रुपयांच्या निविदा जाहीर झाल्याने रेल्वे प्रकल्प युद्ध स्तरावर पूर्ण होणार असल्याचे स्पष्ट होत आहे. या मार्गासाठी आवश्यक असणारे भूसंपादन आधीच पूर्ण झालेले आहे.या मार्गावरिल अकोला अकोट गेज परिवर्तन पूर्ण होऊन डेमो रेल्वे धावत आहे. आमला खुर्द ते खंडवा हा मार्ग पूर्ण झाला असून त्यावर लवकरच रेल्वे धावणार आहे. खंडवा ते सनावद पर्यंत मार्ग पूर्ण झालेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर महू ते इंदोर मार्ग पूर्ण झालेला असून या मार्गावरून रेल्वे धावत आहेत.

▪मध्यप्रदेश महाराष्ट्र सीमेवरील बोगदा वगळता सर्व मार्गाच्या निविदा जाहीर
▪अनेक टप्प्याचे काम झाले पूर्ण,तर अनेक कामे प्रगती पथावर

आमला खुर्द ते तुकाईथड मार्गाचे कार्य प्रगतीपथावर आहे. सनावद ते महू पर्यंत कोट्यावधीच्या निधीतून विविध टप्प्यात कार्य सुरु आहे. ओंकारेश्वर ज्योतिर्लिंग मोरटक्का येथे सुद्धा कार्य प्रगतीपथावर आहे.

आकोट पासून हिवरखेड स्टेशन सह वान नदीपर्यंत अकोला आणि बुलढाणा जिल्ह्याच्या सीमेपर्यंत २८ किमी मार्गासाठी तब्बल ५५३ कोटी रुपये निधीची निविदा निघाली आहे.

तसेच सर्वात मोठी ७२४ कोटींची निविदा खकनार ते उसरणी महाराष्ट्र मध्य प्रदेश सीमेपर्यंत च्या १६.३० किमी मार्गासाठी निघाली आहे.मध्यप्रदेशच्या सीमेपासून जामोद सोनाळा मार्गे हिवरखेड नजीकच्या वान नदीपर्यंत म्हणजेच बुलढाणा जिल्ह्यातील एकूण २२ किमी मार्गासाठी ४२४ कोटी रुपयांची निविदा निघाली आहे.तुकईथड ते खकनार या १८.४४ किमी मार्गासाठी ४५६ कोटीच्या निधीतून कार्य प्रगतीपथावर सुरू आहे. अकोट ते अकोला आणि खंडवा ते आमला खुर्द या पूर्ण झालेल्या मार्गावर विद्युतीकरण मंजूर झाले असून त्यासाठी १४५ कोटी रुपयांची निविदा निघालेली आहे.

लहुजी शक्ती सेना अकोला महानगरच्या वतीने आद्य क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांचा स्मृतिदिन साजरा

▪अकोला,दि.२० (प्रतिनिधी):

लहुजी शक्ती सेना अकोला महानगरच्या वतीने आद्य क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. ह्या प्रसंगी महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य आ. अमोल मिटकरी, लहुजी शक्ती सेनेचे प्रदेश महासचिव वामनराव भिसे, पश्चिम विदर्भ महासचिव प्रकाश दांडगे, अकोला जिल्हाध्यक्ष भिकाजी अवचार, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष सौ. सरिताताई दुतोंडे, अकोला जिल्हा महिला आघाडीच्या महासचिव सौ. आरतीताई हिवराळे, महिला आघाडी अकोला महानगर उपाध्यक्षा सौ. शारदा तायडे, अकोला जिल्हा युवक आघाडीचे प्रभारी पिंटू अंजनकर, महानगर उपाध्यक्ष सागर खडसे, महानगर उपाध्यक्ष गजानन गवई, अकोला महानगरचे युवक अध्यक्ष अविनाश जाधव यांच्या प्रमुख उपस्थित स्मृतिदिन निमित्त मानवंदना घेण्यात आली.

स्वस्तीक कॉलनी गजानन महाराज मंदीर भागवत समाप्ती

हजारो लोकांनी महाप्रसादाला लावली हजेरी



▪हिवरखेड,दि.२० (प्रतिनिधी):

हिवरखेड शहरातील स्वस्तीक कॉलनी मधील गजानन महाराज मंदीरात दि १३/२/२५ ते २०/२/२५ पर्यंत हभप श्री विठ्ठल महाराज तेल्हारकर यांचे व्यासपीठ नेतृत्वात विजय ग्रथ पारायण व हरीनाम सप्ताह संपन्न झाला दररोज सकाळी काकडा दूपारी पारायण सध्यांकाळी हरीपाठ व रात्रीला महाराष्ट्रातील नामंवत कीर्तणकाराची कीर्तने झाली. आज काला वाटु एकमेका काल्याचे कीर्तण भागवताचार्य विठ्ठल महाराज तेल्हारकर यांचे मधुर वानीतुन सपन्न झाले यावेळी श्री,चे भक्तमंडळीनी सात दिवस कथा श्रवन पारायण व कीर्तन श्रवनाचा लाभ घेतला.

तर समाप्ती पुर्व सध्येंला ग्रंथ दिडी व गजानन महाराज पालखी व ट्रक्टरवर प्रतीमा सोहळा मिरवनूक तसेच छत्रपती शिवाजीमहाराज जयती मिरवनूक वारकरी माळकरी टाळकरी विठ्ठल मदीर भवानी मदीर शंकर सस्थान वारकरी महिला भजनी मंडळा सह काढन्यात आली व आज प्रगट दिनाला आयोजीत कथा समापण महाप्रसादाचा पंचक्रोशीसह गावर्कयानी लाभ घेतला तसेच सध्यांकाळी सूद्दा कामठा जूनी चावडी येथे श्री गजानन महाराज मानव सेवा समीती मंदीरातही भागवत व पारायण सप्ताह सांगता निमीत्त महाप्रसाद म्हनून बेसन भाकरीचा महाप्रसाद होनार आहे.

योगीराज भजनी व पारायण मंडळाचा सामूहिक पारायण सोहळा संपन्न

▪अकोला,दि.२० (प्रतिनिधी):

सामाजिक व धार्मिक सेवा कार्यात सक्रिय असणाऱ्या फडके नगर परिसरातील महिलांच्या योगीराज भजनी व पारायण मंडळाच्या वतीने संत गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त सामूहिक पारायण सोहळा संपन्न झाला. डाबकी रोड परिसरातील रामेश्वर नगर येथील सेवाभावी संजय पुरी यांच्या परिसरात संपन्न या सामूहिक पारायण सोहळ्यात पारायणकर्त्या, व्यासपीठकार सौ सुनंदा गावंडे यांनी संत गजानन महाराज यांच्या अवतार कार्यावर सामूहिक पारायण केले. संत गजाननाच्या गजराने यावेळी परिसर भक्तीमय झाला. सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचा जल्लोष साजरा करण्यात आला. शिवरायांच्या प्रतिमेचे यावेळी पूजन करण्यात आले. संचालन मंडळाच्या मनीषा ताई गावंडे यांनी तर आभार संजीवनी पुरी नी मानलेत. यावेळी मंडळाच्या रुक्मिणी पुरी, ललिता खांडेकर,सुनीता गावंडे, रंजना पठाडे, माया सांगळे, ताराबाई गोलाईत, अलका देशमुख, पुष्पा वानखडे, कल्पना पुरी, राधा पुरी, गिरीबाई, प्रतिभा भाकरे, खाडे समवेत बहुसंख्य पारायणकर्त्या महिला व भजनी मंडळाच्या सदस्या उपस्थित होत्या.

भागवत प्रभूप्रतीचे साधन : हभप भागवत महाराज

धाबेकर नगरातील भागवत व कीर्तन महोत्सवाचे भक्तिभावात समापन

▪अकोला,दि.२० (प्रतिनिधी):

श्रीमद् भागवत मध्ये मानवीय सुखाचे सार समावले असून प्रभूप्राप्ती ही भागवताच्या श्रवणाने प्राप्त करता येऊ शकते. म्हणून भाविकांनी या भागवताचे नित्य श्रवण करून जीवन कुतार्थ करण्याचे आवाहन हभप भागवत महाराज देशमुख यांनी केले.खडकी परीसरातील धाबेकर नगरात श्री संत गजानन महाराज प्रकट दिन निमित्त आयोजित हभप भागवत महाराज देशमुख जळगांव खान्देश यांच्या श्रीमद् भागवत कथा व किर्तन महोत्सवा चे प्रकट दिनी भक्तिभावात समापन झाले. यावेळी हभप भागवत महाराज देशमुख हे काल्याचे कीर्तन सादर करीत होते. हभप नारायण महाराज कुटे व हभप पंकज महाराज पवार यांच्या मार्गदर्शनात हभप भागवत महाराज देशमुख यांनी काल्याच्या कीर्तनाची महती सांगून महाआरतीने या उत्सवाचे समापन झाले.रात्रीच्या कीर्तन उत्सवात राज्यातील ख्यातनाम कीर्तनकारानी आपली उपस्थिती दर्शवित कीर्तन सेवा सादर केली.यावेळी या समारोपीय सोहळ्यात आ.रणधीर सावरकर,आ.अमोल मिटकरी यांनी आपली उपस्थिती दर्शवित ट्रस्ट च्या या उपक्रमाचे कौतुक केले.यावेळी आयोजित महाप्रसादाचा परिसरातील शेकडो महिला पुरुषांनी लाभ घेतला.हा कथा व कीर्तन उत्सव सफल करण्यासाठी श्री संत गजानन महाराज चॅरीटेबल ट्रस्ट धाबेकर नगर व खडकीच्या समस्त नागरिकांनी मेहनत घेतली.

VASTU HOUSING FINANCE

वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लि

युनिट २०३ आणि २०४, दुसरा मजला, ए विंग, नवभारत इस्टेट, झकेरिया बंदर रोड, शिवडी (पश्चिम), मुंबई ४०००१५. महाराष्ट्र. CIN क्रमांक: U65922MH2005PLC272501

२००२ च्या सिक्युरिटायझेशन कायद्याच्या कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचना

तर वास्तू हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड, मुंबईच्या मुख्य कार्यालयामार्फत, खालील कर्जदार/जामीनदार/गहाण ठेवणाऱ्यांना जारी केलेली नोटीस मुद्दलाची परतफेड करण्यात चूक केली आहे आणि त्यांना व्हीएचएफसीएल कडून मिळालेल्या क्रेडिट सुविधांचे व्याज भरणे आणि सुविधा नॉन परफॉर्मिंग ॲसेट्स बनल्या आहेत. आर्थिक मालमत्तेच्या सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शनच्या कलम १३(२) अंतर्गत त्यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत आणि त्यांच्या शेवटच्या ज्ञात पत्त्यांवर सुरक्षा व्याज कायदा, २००२ अंमलबजावणी तथापि ते सेवा न देता परत आले आहेत आणि म्हणून त्यांना त्याबद्दल सार्वजनिक नोटीसद्वारे सूचित केले जाते.

कर्जदाराचे नाव, सह-कर्जदार आणि कर्ज खाते क्रमांक.	कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचनेची तारीख आणि रक्कम.	गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन
मोहम्मद अकबर अब्दुल तमिज (अर्जदार), अनिसा बी मोहम्मद अकबर (सह-अर्जदार), LP0000000078334	११-जाने-२५ रु. ६३१५२४/- ०८-जाने-२५ रोजी पुढील व्याज आणि शुल्कासह	प्लॉट असलेल्या जमिनीचा तो सर्व तुकडा आणि पार्सल भूखंड क्षेत्र ५४४.५० चौरस फूट बांधलेले क्षेत्रफळ ५०० चौरस फूट मालमत्ता क्रमांक ७२१, गट क्रमांक १४/१, सर्वेक्षण क्रमांक ३०, चांद खा प्लॉट मौजे अकोला, महाराष्ट्र, ४४४००२ येथे, उत्तर-जहूरबी यांचे प्लॉट, पश्चिम - रोड, पश्चिम-सर्विस लेन, दक्षिण-पश्चिम-जहागीर खान यांचे प्लॉट

नोटीसच्या बदली सेवेसाठी पावले उचलली जात आहेत. वरील कर्जदारांना, सहकर्जदारांना आणि/किंवा त्यांच्या जामीनदारांना (जेथे पूर्वसंध्येला लागू होते) ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून ६० दिवसांच्या आत थकबाकीची देयके द्यावीत, असे न झाल्यास ६० दिवसांची मुदत संपल्यानंतर सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन इननॅशियल ॲसेट्स अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ नुसार पुढील पावले उचलली जातील.

भाडेपट्ट्याने कळवावे की सदर नोटीस कलम १३(१३) अंतर्गत कर्जदार/जामीनदार/गहाणदारांना सूचित करते की, गहाण ठेवलेली मालमत्ता विकली जाऊ नये/लीजवर/हस्तांतरित केली जाऊ नये.

तारीख: २१.०२.२०२५
ठिकाण: अकोला

अधिकृत अधिकारी,
वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लि

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्ली.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्ली २०२५

एक अपूर्व योग जुळून आला. आपल्या मायमराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय झाला आणि याच पार्श्वभूमीवर, मायमराठीचा जागर करण्यासाठी ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्ली येथे २१, २२ आणि २३ फेब्रुवारी २०२५ या तीन दिवसांत संपन्न होत आहे. प्रत्येक मराठी माणसासाठी अभिमानास्पद अशी ही बाब. दिल्लीचेही तख्त राखतो महाराष्ट्र माझा... ही केवळ कविकल्पना नाही तर आपल्या अस्मितेचा आणि अभिमानाचा विषय आहे, याचा प्रत्यय आपणास या ऐतिहासिक संमेलनातून येणार आहे. भाषा, संस्कृती, राष्ट्रभावना, मानवता आणि एकात्मता यांचा आगळा मिलाफ यानिमित्ताने महाराष्ट्र वा देशातीलच नव्हे, अवघ्या जगातील साहित्यरसिक देशाच्या राजधानीत अनुभवणार आहेत.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ९८ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन सरहद, पुणेच्या पुढाकारातून याच भावनेतून आयोजित करण्यात आले आहे. दिल्लीत होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. पंतप्रधान मोदी यांनी निमंत्रण स्वीकारले आहे. सरहद, पुणे आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या ९८ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे उद्घाटन २१ फेब्रुवारी २०२५ रोजी होणार आहे. जेष्ठ नेते शरद पवार या साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी असणार आहेत. संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. तारा भवाळकर असतील तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहतील. जवळपास ७० वर्षांनी पुन्हा एकदा दिल्ली मराठी साहित्य संमेलनासाठी सज्ज होणार आहे.

मराठी साहित्य संमेलन म्हटले की, लेखक, कवी, साहित्यिकांची गर्दी असणारच. सा संमेलनाच्या निमित्ताने सारस्वतांचा मेळा दिल्ली नगरीत भरत असून, महाराष्ट्रासह देशभरातील साहित्यिक, रसिक, मराठीवर प्रेम करणारे दिल्लीत गोळा होवू लागले आहेत.

यापूर्वी १९५४ साली दिल्लीला ३७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झाले. त्याचे स्वागताध्यक्ष काकासाहेब गाडगीळ, संमेलनाध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी तर उद्घाटक तत्कालिन पंतप्रधान पंडित नेहरू होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीला या संमेलनानंतर बळ मिळाले आणि १ मे १९६० साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. त्यानंतर दिल्लीला एकदाही अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झाले नाही.

देशाच्या राजधानीत मराठीचा गजर होऊ घातलाय, मराठी साहित्याचा जागर येथे होत आहे, ही तमाम मराठी भाषिकांसाठी अभिमानाची आणि गर्वाची बाब आहे, हे मात्र तितकेच खरे.

अभिजात मराठी भाषेचा गजर आणि साहित्यिक जागर

देशाच्या राजधानीत यंदा ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने अभिजात मराठी भाषेचा गजर आणि साहित्यिक जागर होणार आहे. ही बाब माझ्यासारख्या मराठी साहित्यावर निर्व्याज प्रेम करणाऱ्यासाठी अतिशय आनंदाची आहे. म्हणून सुरवातीलाच सरहद संस्था आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अभिनंदन करतो.

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर आणि मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाल्यानंतर नवी दिल्लीत छत्रपती शिवाजी महाराज साहित्य नगरीत हे संमेलन होत आहे, हे देखील मराठीवर प्रेम करणाऱ्यांसाठी अभिमानास्पद आहे.

मराठी साहित्य हे आपल्या संस्कृतीचे सजीव प्रतीक आहे, ज्याने काळानुसार समाजाला मार्गदर्शन केले आहे. मराठी साहित्याने संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज, जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या भक्तिप्रधान आणि लोकप्रबोधन करणाऱ्या विचारांपासून लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या लोकचळवळदर्शी लेखनापर्यंत आणि पु. ल. देशपांडे यांच्या विनोदावर आधारित जीवनदर्शनापर्यंत अनेक पैलूंना स्पर्श केला आहे.

मराठी सारस्वतांनी भाषेचं माधुर्य दाखवताना प्रबोधनपर लेखनात मराठी वज्रासारखी किती कठीण होते हे वेळोवेळी दाखवून दिले आहे. समाजाला विचारशील बनवण्याचे कार्य केले आहे.

प्रत्येक पिढीतील बदलांना आपलेसे करण्याचे औदार्य मराठी साहित्यातून प्रकट होत आले आहे. समाजातील सर्व घटकांची भाषा आत्मसात करताना साहित्य अधिक समृद्ध आणि समकालाशी सुसंगत करणारी तरूण पिढी निर्माण होत राहिली हे मराठीचे भाग्यच आहे.

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र

आज तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे साहित्यिकांना जागतिक स्तरावर पोहोचण्याची संधी उपलब्ध झाली आहे. डिजिटल माध्यमातून मराठी साहित्य नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज आहे. मुलांचाच नव्हे तर पोक्त पिढीचाही स्क्रीन टाईम वाढत असताना या सर्वांना पुन्हा एकदा साहित्याकडे वळविणे हे सोपे काम नाही, याची जाणीव आहे. त्यासाठी नव्या प्रयोगांची आवश्यकता आहे. साहित्य संमेलनातून होणाऱ्या परिसंवादातून आणि चर्चांतून याबाबत उहापोह केला जाईल, असा मला विश्वास आहे.

हे संमेलन केवळ साहित्याचा उत्सव नसून समाज प्रबोधनाचे आणि सांस्कृतिक विचारांची देवाणघेवाण करण्याचे माध्यम आहे. या व्यासपीठावरून मराठी साहित्यिकांनी सामाजिक समता, पर्यावरणीय जाणीव, आणि तरुणांच्या समस्या यांसारख्या विषयांवर चर्चा करून परिवर्तनाचा नवा अध्याय लिहावा, अशीही अपेक्षा यानिमित्ताने मी करीत आहे.

ज्येष्ठ लेखिका डॉ. तारा भवाळकर यांची संमेलनाच्या अध्यक्षपदी झालेली निवड ही समकालातील मराठी साहित्यिकांच्या जाणिवांचे एकप्रकारे दर्शन घडविते. लोकसाहित्य, लोकसंस्कृती आणि लोककला हा त्यांच्या आस्थेचा, अभ्यासाचा आणि लेखनाचा विषय राहिला आहे.

मौखिक स्वरूपातून प्रवाहीत होणाऱ्या साहित्याचा अभ्यास करून त्याचे सत्व त्यांनी समाजापुढे आणण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे. त्यांच्या साहित्यकृतींमधून स्त्रीवादी दृष्टिकोन आणि सामाजिक प्रश्नांवर प्रगल्भ विचारधारा नेहमीच झळाळून उठली आहे. त्यांचे विचार या संमेलनाला अधिक व्यापक बनवतील, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

या संमेलनाच्या संयोजनासाठी सरहद आणि महामंडळास शासन म्हणून सर्वतोपरी पाठबळ दिले जाईल, अशी ग्वाही देतो. राजधानी निवासी मराठी जनांसह, मराठी भाषेवर, साहित्यकृतीवर प्रेम करणाऱ्या जगभरातील रसिक आस्वादकांना पर्वणी ठरेल असा विश्वास व्यक्त करतो.

या संमेलनासाठी निमंत्रित तसेच ज्येष्ठ साहित्यिक, अभ्यासक, संशोधक, रसिक वाचक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांचेही या स्मरणिकेच्या माध्यमातून स्वागत करतो..! पुन्हा एकदा मनापासून शुभेच्छा!

■ ■ ■

जागतिक स्तरावर पोहोचण्याचे स्वप्न पाहा

मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाल्याच्या पार्श्वभूमीवर आणि महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर प्रथमच नवी दिल्लीत ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत आहे, या संमेलनात येणाऱ्या सर्व मराठी साहित्यिकांचे तसेच साहित्य रसिकांचे स्वागत आणि या संमेलनाचे आयोजन करीन असलेल्या सरहद संस्थेला हार्दिक शुभेच्छा.

नितीन गडकरी
केंद्रिय मंत्री

अखिल भारतीय स्तरावर साहित्य संमेलन भरवण्याची परंपरा मराठी साहित्याच्या क्षेत्रात आहे. ती परंपरा ९८ वर्षे पूर्ण करीत असून, लवकरच संमेलनाच्या शताब्दीचा सोहळा होईल. १९५४ साली दिल्लीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित केले गेले होते.

थोर राजनीतिज्ञ, साहित्यिक व अर्थशास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्ध असलेले काकासाहेब गाडगीळ त्या संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते. ᵖ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे त्या संमेलनाचे अध्यक्ष होते. तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी त्या संमेलनाचे उद्घाटन केले होते.

दिल्लीत साहित्य संमेलन आयोजित करण्याचा योग सत्तर वर्षांनी आला आहे. सरहद संस्थेने या संमेलनाच्या पाश्र्वभूमीवर, मराठी अस्मितेचा राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार करणारे थोर व्यक्तिमत्त्व सर चिंतामणराव देशमुख यांच्या नावाने पुरस्कार सुरू करण्याचे औचित्य साधले.

आपल्या मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याच्या केंद्र शासनाच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत हे संमेलन होते आहे, जागतिक स्तरावर स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी मराठी भाषेला आता भरपूर संधी उपलब्ध होणार आहेत. सकस साहित्याच्या माध्यमातून माय मराठीने अनेक पिढया घडविल्या.

आता मराठी साहित्यिकांनी जागतिक स्तरावर पोहोचण्याचे स्वप्न पाहिले पाहिजे. देशाच्या राजधानीत होत असलेल्या संमेलनातून मराठीला ज्ञानभाषा बनविण्याच्या प्रक्रियेचा श्रीगणेशा व्हावा, हीच अपेक्षा. संमेलनाच्या यशस्वीतेसाठी खूप खूप शुभेच्छा.

■ ■ ■

बुद्धीवर विश्वास ठेवणारा जगातला क्रांतिकारी शास्त्रज्ञ : महात्मा गौतम बुद्ध

तथागत गौतम बुद्धाएवढा विज्ञाननिष्ठ, विवेकनिष्ठ, बुद्धिप्रामाण्यवादी, व्यक्तिस्वातंत्र्यवादी महामानव दुसरा कुणीही झाला नाही. प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध आणि त्याचा धम्म या ग्रंथात तथागथांच्या विचारसंपदेचा सविस्तर आढावा घेतला आहे..

तथागतांनी जगण्याचा आधार शोधणाऱ्या अगणित लोकांना विवेकशील स्वच्छ धम्म दिला. हा धम्म बुद्धाच्या करुणेतून जन्माला आला. सिद्धार्थ गौतमाने सुखी जीवनाचा त्याग करून दुःखाचे मूळ कारण शोधून काढले. जगात दुःख भरलेले आहे. त्यावर मात करता येते. आपलं स्वतःचं मौलिक जीवन सुखी करता येतं हेही ठामपणे सांगितलं.

पूर्वार्ध

भोगलालसेत भरकटणारी माणसं स्वतःचं स्वतःचं आपलं अस्तित्व हरवून जगतात. अंधारमय जीवन जगतात. स्वयंप्रकाशी न होता परप्रकाशी होवून आयुष्यभर चाचपडतात. हा अनेकांना भेडसावणारा प्रश्न महात्मा बुध्दांनी सोप्या शब्दांत कथन केला. बुद्धविचार हा काळाच्या, विज्ञानाच्या कसोटीवर खरा उतरणारा दिव्य-विचार आहे.

तथागत बुद्धाचं तत्त्वज्ञान स्वर्ग, मोक्ष आणि आत्मा यांना नकार देतं. बुध्दाच्या प्रखर बुद्धीप्रामाण्यामुळे लोकांची मोक्षाच्या गूढ, अगम्य, अदृष्य भ्रमातून मुक्तता झाली. अत्त दीप भव! स्वतःच स्वतःचे मार्गदर्शक व्हा. स्वयंप्रकाशी व्हा! हा महत्त्वाचा मूलमंत्र दिला. एका अर्थाने तथागत बुद्धाने अंधारात चाचपडणाऱ्या जगाला नितळ निळा प्रकाश दिला.

विख्यात विचारवंत डॉ. गंगाधर पानतावणे यांनी आपल्या बुद्ध चिंतन या ग्रंथात असं म्हटलंय की, मानवी मुद्रा असलेल्या धम्माला दास्यमुक्त, शोषणमुक्त, दुःखमुक्त माणूस हवा आहे. एहि पास्सिको या, पहा, अनुभव घ्या. स्वतःच स्वतःच्या मनाची दारे उघडा. बुद्धीला पटेल तरच स्वीकारा.. असे प्रतिपादन करणारा जगातील एकमेव धर्म म्हणजे बुद्ध धम्म होय.

तथागत गौतम बुद्ध यांची जयंती भारतासह जगातील अनेक देशात साजरी केली जाते. त्यांच्या धम्माचेही अनेक देशात अस्तित्व निर्माण झाले. पण जेथे ते जन्मले त्या देशात काही काळानंतर बुद्ध धर्माचा प्रभाव कमी झाला. 1956 साली बाबासाहेबांनी बौद्ध धम्माची लाखो अनुयायांसह दीक्षा घेतल्यावर धम्माचे पुनरुज्जीवन झाले. गौतम बुद्ध यांना आयु. आ. ह. साळुंके, प्रा. भगवान भोईर इ. विचारवंत सर्वोत्तम भूमीपुत्र म्हणून त्यांचा गौरव करतात.

या देशात अनेक प्रज्ञावान सुपुत्र जन्माला आले. त्यांनी आपल्या अंगभूत कर्तृत्वाने विविध क्षेत्रात भारत देशाचे नाव जगात वाढवले. त्या सर्वांमध्ये भगवान बुद्ध हेच सर्वोत्तम भूमीपुत्र ठरले. त्यांनी सबंध जगाला धम्म नावाची बुद्धिप्रामाण्यवादी अनमोल भेट दिली. त्यामुळे देशाचे नाव रोशन झाले.

जेव्हा बुद्धाचा जन्म झाला तेव्हा धर्मकारणात-समाजकारणात सर्वत्र अंधार भरलेला होता. कर्मकांडाने समाज गांजलेला होता. यज्ञसंस्कृतीने सर्वत्र उच्छाद मांडलेला होता. यज्ञाच्या नावावर सर्वत्र अवैज्ञानिक प्रयोगांनी धुडगूस घातलेला होता. नैसर्गिक संकट आले की, करा यज्ञ !

सुख शांतीसाठी - करा यज्ञ ! लोकांना सुखासाठी खोटे आमिष दाखवून यज्ञ करायला भाग पाडले जात होते. हजारो लाखो रुपयांचा खर्च करायला लावण्यात बाध्य केले जात होते. पाप-पुण्य, देव-दैव, स्वर्ग-नरक, भूत-पिशाच्च यांची भीती दाखवली जात होती.

अवतार संकल्पनेमुळे सारा समाज आंधळा झाला होता. मतिमंद बनला होता. देवशरणता माजल्याने माणसाचे अवमूल्यन झाले होते. माणूसपण संपवून टाकण्यात आले होते. महात्मा बुद्धाने माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा बहाल केली.

बुध्दाच्या समकालीनांनी आत्म्याविषयी अनेक प्रश्न उपस्थित केले. गतसमयी मी कोण होतो? मी काय होतो? मी कोणत्या अवस्थेतून कोणत्या अवस्थेत गेलो. मी भावी समयात कुठे असणार? कुठल्या अवस्थेत असणार? बुद्धांनी या प्रश्नांवर कपोलकल्पित, कल्पनाविलासाश्रित प्रश्न म्हणून शिक्का मारून त्यांना निकालात काढले.

कल्पित अवैज्ञानिक सिद्धांताची त्यांनी घोर निंदा केली. बुद्धांच्या या विचारांना स्फोटक, क्रांतिकारी म्हटले गेले. म्हणून महात्मा बुद्ध सामाजिक क्षेत्रामध्ये आद्य क्रांतिकारक ठरतात. विश्वाची निर्मिती झाली यावर त्यांचा विश्वास नव्हता. विश्व उत्क्रांत झाले अशी त्यांची धारणा होती. कुठल्याही जातीच्या माणसाला संघात प्रवेश होता. संघात स्त्रियांनाही त्याकाळी प्रवेशास मज्जाव नव्हता. ही बाब बुद्धविचाराचे क्रांतिकारत्व सिद्ध करणारी आहे.

महात्मा गौतम बुद्धाने जगाला एक आगळावेगळा धम्म दिला म्हणून त्यांच्या विचारांची प्रशंसा केली गेली. शास्त्रज्ञांनी, आधुनिक विचारवंतांनीही त्यांच्या महानतेची मुक्त कंठाने प्रशंसा केली. आर. जे. जॅक्शन म्हणतात - बौद्ध धम्माने मानवात प्रछन्न असलेल्या आंतर सामर्थ्याच्या शोधाकडे मानवाचे लक्ष वेधले. रेव्हरंड लेस्ली बोस्टन म्हणतात, बौद्ध धम्माचे आध्यात्मिक तत्त्वज्ञान हे सामर्थ्यशाली योगदान होय. प्रो. ईवाईट गोडार्ड म्हणतात, या जगी जेवढे धर्मसंस्थापक होवून गेले त्यात बुद्ध हाच एकमेव थोर संस्थापक होता की, ज्याने मानवातील विद्यमान निहित शक्ती जाणली. ही निहित शक्ती माणसाला मुक्तिपथावर अग्रेसर करू शकते. बौध्द धम्म हा विद्येचे श्रेष्ठत्व आणि अविद्येचे हीनत्व लक्षात आणून देतो.

डी. बी. जगत्पुरिया
9860485398
मीरानगर, पडेगांव, औरंगाबाद.

(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

■ ■ ■

केजरीवाल दिल्ली सोडणार

विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवामुळे आपच्या तंबूत निराशा आहे. परंतु पक्षाला विश्वास आहे की मोठी मतपेढी अजूनही त्यांच्यासोबत आहे. दिल्लीतील सत्ता गमावल्यानंतर आम आदमी पक्ष आपल्या पराभवाचा आढावा घेत आहे. पक्षाला वाटते की आता संघटनात्मक पातळीवर शस्त्रक्रियेची गरज आहे.

आता फक्त पंजाबमध्ये आपचे सरकार आहे. अशा परिस्थितीत पक्षाची भविष्यातील योजना काय आहे, पराभवानंतर ते संघटनेत कोणत्या प्रकारचे बदल करणार आहे, दिल्लीतील सरकारला कोंडीत पकडण्यासाठी त्यांची रणनीती काय असेल? आपच्या मंथन बैठकीतून जे समोर आले, त्यानुसार कमकुवत कार्यकर्त्यांमुळे दिल्लीत पक्षाचे नुकसान झाले, त्यामुळे आता संघटना मजबूत करण्याचे काम केले जाईल. पंजाब आणि गुजरातसारख्या राज्यात पक्षाचा विस्तार आणि नेतृत्वाला नवीन जबाबदाऱ्या देणे, भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे निवडणूक निकालांवर परिणाम झाला आहे, त्यामुळे अरविंद केजरीवाल यांच्या प्रतिमेवर काम करणे, भाजप सरकारच्या कामकाजावर लक्ष ठेवणे, पराभवानंतर आमदारांसोबत बैठक, त्यानंतर कृती आराखडा बनवला जाईल.

दिल्ली विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर आप आमदारांच्या बैठका होत आहेत. दिल्ली निवडणुकीत सहभागी असलेल्या पंजाबमधील आमदार आणि

कार्यकर्त्यांचीही बैठक झाली. दिल्लीतील विजयी आणि पराभूत उमेदवारांशी वैयक्तिक बैठका घेऊन पक्ष त्यांच्याकडून अभिप्राय घेत आहे.

'आप'चे एक आमदार नाव न सांगण्याच्या अटीवर म्हणतात, 'आम्ही पक्षाच्या पराभवाकडे पराभव म्हणून पाहत नाही आहोत. अरविंद केजरीवाल यांनी त्यांच्या राजकीय प्रवासात, शिखरावर पोहोचण्यापासून ते जमिनीवर परतण्यापर्यंत आणि तुरुंगात जाण्यापर्यंत सर्व काही पाहिले आहे. येथून पक्ष पुन्हा उदयास येण्यावर लक्ष केंद्रित करेल.

गेल्या काही वर्षांपासून केजरीवाल पक्षाच्या आमदार आणि कार्यकर्त्यांकडे लक्ष देऊ शकले नाहीत. संघटना मागे राहिली. आता आपल्याकडे वेळ आहे. आपण पुनरावलोकन करू शकतो. आता निर्णय घेण्याची वेळ आली आहे.

'आप'चे आमदार म्हणाले, 'भाजपने आमच्या नेत्यांची प्रतिमा मलिन केली आहे. त्यांनी इंदिरा गांधींपासून महात्मा गांधींपर्यंत सर्वांची प्रतिमा खराब करण्याचे काम केले आहे. मग आम्ही खूप लहान गोष्ट आहोत. आम आदमी पक्षाची प्रतिमा भ्रष्टाचारमुक्त आणि प्रामाणिक पक्षाची आहे. म्हणूनच लोक आमच्याशी लवकर जोडले जातात. आम्ही कोणत्याही जातीचे किंवा धर्माचे राजकारण करत नाही. लोकांना हेच आवडते. पक्ष यावर काम करेल.

पक्ष नेत्यांच्या मते, प्रामाणिकपणा ही अरविंद केजरीवाल यांची सर्वात मोठी ताकद होती. भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली तुरुंगात गेल्याने त्यांची प्रतिमा खराब झाली आहे. आता अरविंद केजरीवाल दिल्लीतून मुक्त आहेत. पुढील काही काळासाठी, त्यांची योजना अशी असेल की पंजाब आणि गुजरातसारख्या ज्या ठिकाणी आम आदमी पक्ष मजबूत होत आहे तिथे काम करावे.

पंजाब सुरक्षित ठेवत राष्ट्रीय पातळीवर पक्षाचा विस्तार करण्याची भविष्यातील योजना आहे. त्याअन्वये, केजरीवाल आता स्वतःला दिल्लीत गुंतवून ठेवणार नाहीत.

■ ■ ■

वाचक लिहितात

ब्रँडेड अज्ञानाची भेसळ

नुकताच शनिशिंगणापूरच्या विश्वस्तांनी एक ठराव केला, की शनी देवाच्या शिळेवर होणारा तेलाचा अभिषेक हा ब्रॅण्डेड तेलाचाच असावा. खुले किंवा साधे तेल चालणार नाही. कारण त्यात प्रचंड भेसळ असते. त्यामुळे शिळेची झीज होण्याचा धोका आहे. शुद्धतेची हमी बाळगणे आणि तेही देवासाठी यात चुक ते काय? पण हिंदूंच्या मंदिरांनी काही शिस्त किंवा काही अटी लावल्या की स्वयंभू पुरोगामीवाल्यांचा पोटशुळ उठला म्हणूनच समजा! आणि मग लगेच सगळीकडून टीकेचे बाण सुरू झाले.

नागपुरातील एका वृत्तपत्राने (महासागर नव्हे) संपादकीय लिहून टीका केली. माणसाला सर्व ब्रॅण्डेड लागतं त्यामुळे देवालाही ब्रँडेड नैवेद्य हवाय. भेसळयुक्त नैवेद्याने देवाच्या पोटात दुखलं तर कोणत्या दवाखान्यात न्यायचे? असा त्यांना उपहासात्मक प्रश्न पडला !तथापि अशा प्रकारची टीका ही भक्तांच्या श्रद्धेचा अपमान आहे .देवस्थानात वापरण्यात येणाऱ्या वस्तूंबाबत काही नियम असले तरी त्यामागे भक्तांचा भाव आणि शुद्धतेची जाणीव असते. आपण आपल्या दैनंदिन जीवनात दर्जेदार वस्तू वापरतो, मग देवासाठी शुद्धतेचा विचार करणे चुकीचे कसे? धर्म हा काही कर्मकांडापुरता मर्यादित नाही, तर तो श्रद्धा, संस्कृती आणि अध्यात्मिक भावनांचा संगम आहे. समाजाला धर्म आणि संस्कृती शिकवण्याची जबाबदारी माध्यमांची आहे. त्यांनीच जर असा उलटा सूर आळवला तर समाजाची अधोगती व्हायला सुरुवात होते. देव स्वतःहून काहीच मागत नाही. तो फक्त भावाचा भुकेला आहे आणि त्या भक्ती- भावानुसारच ट्रस्टींनी तो ठराव केला. कारण अशा भेसळीमुळे शनि देवाच्या शिळेची झीज होऊ शकते. उद्याच्या परिणामांची काळजी घेणे यात वाईट ते काय? तुळजापूरच्या भवानी मातेची झीज होऊ नये म्हणून सरकार तिथे काळजी घेतच आहे ना! मग इथेच का सर्वांनी जिभेच्या आणि लेखणीच्या तलवारी चालवल्या? देवाच्या भक्तीचा आदर राखणे हेच खरे धार्मिक संस्कृतीचे लक्षण आहे.

■ **सौ. माधवी पत्की, नागपूर.**

(कालच्या अंकावरून पुढे)

उपलब्ध आकडेवारीपासून भारतीयांसह लोक निर्धारित मानकस्तरांहून दोन ते तीन पट अधिक मीठ सेवन करीत आहेत. त्यामुळे जागतिक आरोग्य संघटनेने आता कमी मीठ खाण्याच्या सल्ला दिला आहे. त्यामुळे लोकांनी आता मीठाचे सेवन कमी करायला हवे किंवा मीठाच्या जागी पर्याय म्हणून (एलएसएसएस) मीठाचा वापर करण्याचा प्रयत्न केला पाहीजे असे जागतिक आरोग्य संघटनेने म्हटले आहे.

एलएसएसएस मीठ म्हणजे काय असते असा तुम्हाला प्रश्न पडला असेल तर या मीठात सोडियम क्लोराईडच्या काही टक्के प्रमाण कोणा अन्य खनिज, सर्वात जास्त म्हणजे पोटेशियम क्लोराईड सोबत बदललेले असते.

कमी सोडियमच्या मीठात अधिक प्रमाणात पोटॅशियम असते, हे मीठ प्रोढांसाठी चांगले असले तरी लहान मुले आणि गर्भवती महिलांना याचा वापर करण्याचा सल्ला दिला जात नाही. जागतिक आरोग्य संघटनेने इशारा दिला आहे की पोटेशियमचे जास्त प्रमाण ज्यांची किडनी खराब आहे त्यांच्यासाठी वाईट आहे. कारण त्यांच्या किडनी खनिजांना शरीराच्या बाहेर काढण्यास सक्षम नसते. त्यामुळे हायपरकेलेमिया हा आजार होऊ शकतो. त्यामुळे हृदयाच्या कामावर परिणाम होऊ शकतो आणि जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळेच किडनी कमजोर असणारे आणि पोटॅशियम उत्सर्जनाला प्रभावित करणाऱ्या स्थितीसाठी हे कमी सोडियमचे वापरणे योग्य नाही असे जागतिक आरोग्य संघटनेने म्हटले आहे.

एलएसएसएस मीठाच्या वापराने जेवणात सोडियमचे प्रमाण कमी करण्यास मदत होते. सोडियम आपण खात असलेल्या मीठामधील प्रमुख घटक आहे. जो पेशी आणि मासपेशीच्या कार्यासाठी आवश्यक असतो. मात्र त्याचे प्रमाण वाढले तर उच्च रक्तदाब, हृदयविकाराचा धक्का आणि स्ट्रोकचा खतरा वाढू शकतो.

कमी सोडियमवाल्या मीठाच्या पर्यायांवर स्विच करणे अनेक लोकांना लाभदायक होऊ शकते. कारण या मीठामुळे सोडियमचे सेवनाचे प्रमाण कमी होते. आणि रक्तदाब कमी होतो. ज्यामुळे हृदयासंबंधीचा आजारांचा धोका कमी होतो. मात्र, काही डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार मीठांचे एकूणच सेवन कमी करणेच योग्य उपाय आहे.

सामान्य मीठात सुमारे ४० टक्के हिस्सा सोडियम असतो. उदाहरणार्थ १ ग्राम मीठात ४०० मिलीग्रॅम सोडियम असते. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते एका सर्वसाधारण माणसाने प्रतिदिन ५ ग्रॅमहून अधिक मीठ (म्हणजे सुमारे २००० मिलीग्रॅम सोडियम) खाणे अयोग्य आहे. हे प्रमाण जवळपास एका चमचा एवढे असते.

सोडियम आपल्या शरीरासाठी एक आवश्यक खनिज आहे. हे पेशी आणि स्नायूंचे काम योग्य प्रकारे करण्यासाठी मदत करते. रक्तदाबाला नियंत्रित करते, शरीरात सोडियमचे प्रमाण वाढण्याने रक्तदाब वाढू शकतो. ■ ■

अशोकायन

प्रा. अशोक सारडा मेहकर
(९४२१३९४३३९)

। गण गण गणात बोते ।

पेटविता आगटी
उठल्या मधमाशा
जिवाच्या आकांताने
लोक पळाले चहू दिशा ..

मका सेवना निमित्ते
शिष्यांना दृष्टांत दिला
बघा सुखद प्रसंगी सर्व नाती
कठीण समयी कोण येती?

मृगजलासम संसार आहे
सत्य जाणूनी सावध व्हावे
प्रभूशी आपले जोडा नाते
नौका लावी तोच पैल तिराते ..!

तरुण रुग्णामध्ये आढळून आला पोटातील आतड्यांना होणारा गँगरीन-सुपीरियर मेसेन्टेरिक व्हेन थ्रोम्बोसिस-एसएमव्हीमुळे हा आजार झाल्याचे निदान

नागपूर, २० फेब्रुवारी : पोटातील मुख्य रक्तवाहिनी असलेल्या सुपीरियर मेसेन्टेरिक व्हेनमध्ये गाठी निर्माण झाल्यामुळे तरुण पुरुष रुग्णामध्ये आतड्यांना होणारी इस्केमिया अर्थात रक्तवाहिनीतील अडथळ्यामुळे आतड्यांना गँगरीन झाल्याचे प्रकरण आढळून आले आहे. डॉ. अंकुर मिश्रा, कन्सल्टंट-जनरल आणि लॅपरोस्कोपिक सर्जन, वोक्हार्ट हॉस्पिटल, नागपूर यांनी या विषयी माहिती दिली.सुपीरियर मेसेन्टेरिक व्हेन थ्रोम्बोसिस हा एक दुर्मिळ पण जीवघेणा आजार आहे. या आजारात सुपीरियर किंवा इन्फिरियर मेसेन्टेरिक व्हेन किंवा त्याच्या शाखांमध्ये गाठी किंवा अडथळा (थ्रोम्बोसिस) निर्माण होतो. त्यामुळे अचानक तीव्र पोटदुखीचा त्रास होऊ शकतो. काही वेळेस हा आजार पोटाच्या स्कॅनमध्ये सहजगत्या समोर येतो.

हा विकार ५,००० ते १५,००० रुग्णांमध्ये एका रुग्णात आणि आपत्कालीन शस्त्रक्रियेच्या १,००० प्रकरणांमध्ये एका प्रकरणात दिसतो. गेल्या ४० वर्षांत सिटी स्कॅन आणि डायग्नोस्टिक लॅपरोस्कोपी यांसारख्या आधुनिक निदान पद्धतींमुळे या आजाराचे निदान जास्त प्रमाणात होऊ लागले आहे. हा आजार कोणत्याही वयोगटात दिसू शकतो, पण तो प्रामुख्याने पुरुषांमध्ये अधिक प्रमाणात दिसतो आणि विशेषतः ५०-६० वर्षांच्या लोकांमध्ये जास्त आढळतो.

या आजाराची कारणे

या आजाराचे काही ठोस कारण असू शकते, जसे की -पोटाच्या आसपासच्या अवयवांचा कर्करोग, जळजळ, यकृत सिरोसिस किंवा पोर्टल व्हेन थ्रोम्बोसिस. मात्र काही वेळेस ठोस कारण आढळत नाही. त्यामुळे योग्य उपचार ठरवणे कठीण होते. हा आजार अचानक किंवा उपसर्गजन्य स्वरूपात उद्भवताना दिसतो आणि तीव्र मेसेन्टेरिक आर्टेरियल इस्केमियासारखी लक्षणे दर्शवू शकतो. बहुतेक वेळा लक्षणे गंभीर नसतात, त्यामुळे निदान उशिरा होते. ऱ्ही व इतर संशोधकांच्या अभ्यासानुसार ७५ टक्के रुग्णांना ४८ तासांहून अधिक काळ लक्षणे जाणवत होती, पण निदान उशिरा झाले. त्यामुळे थ्रोम्बस (गाठी निर्माण होणे) ची स्थिती उदभवली आणि आतड्यांवरील परिणाम विभिन्न प्रकारे दिसू लागले.

बंधन बँकेने महाराष्ट्रात सुरू केल्या २ नवीन शाखा आणि ३ राज्यांमध्ये एकूण ९ शाखा

नागपूर, २० फेब्रुवारी : बंधन बँकेने आज तीन राज्यांमध्ये ९ नवीन शाखा सुरू केल्याची घोषणा केली. महाराष्ट्रात २, उत्तर प्रदेशात ६ आणि पश्चिम बंगालमधील कोलकाता येथे १ नवीन शाखा कार्यान्वित करण्यात आली. बंधन बँकेचे एमडी आणि सीईओ पार्थ प्रतिम सेनगुप्ता यांनी कार्यकारी संचालक राजिंदर कुमार बब्बर आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र, उत्तर प्रदेश व कोलकाता येथील नवीन शाखांचे उद्घाटन केले.

महाराष्ट्रातील नवीन शाखा गोंदिया शाखा (गुरुनानक वॉर्ड, जुना बस स्थानक रोड, गोंदिया) आणि गोरेगाव पूर्व शाखा (विश्वेश्वरनगर, गोरेगाव पूर्व, मुंबई) येथे स्थित आहेत.

या प्रसंगी बोलताना बंधन बँकेचे एमडी आणि सीईओ, पार्थ प्रतिम सेनगुप्ता म्हणाले, तीन राज्यांमध्ये नऊ नवीन शाखा सुरू करताना आम्हाला आनंद होत आहे, विशेषतः महाराष्ट्रातील दोन शाखांचा समावेश हा आमच्यासाठी महत्त्वाचा टप्पा आहे. या शाखा विस्तारामुळे आम्ही आमच्या ग्राहकांना अधिक प्रभावी सेवा प्रदान करू शकू. विस्तारित वितरण नेटवर्कद्वारे अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचण्याच्या आमच्या प्रयत्नांचा हा एक भाग आहे. आम्ही सातत्याने वाढीवर लक्ष केंद्रित करत आहोत आणि आमच्या ग्राहकांच्या बदलत्या गरजांसाठी योग्य बँकिंग सोल्युशन्स प्रदान करण्यासाठी वचनबद्ध आहोत. बंधन बँक सध्या देशातील ३६ पैकी ३५ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये कार्यरत आहे.

ओआरएसएल निर्माते केनव्यूतर्फे डायरिया से डर नहीं मोहीमेची सुरुवात

नागपूर, २० फेब्रुवारी : ओआरएसएलचे निर्माते आणि ग्राहक आरोग्य कंपनी असलेल्या केनव्यूने पॉप्युलेशन सर्व्हिसेस इंटरनॅशनल, इंडिया अर्थात पीएसआय इंडियासोबत भागीदारी करून डायरिया से डर नहीं ही महत्त्वपूर्ण सार्वजनिक आरोग्य मोहीम सुरू केली आहे. केनव्यूने अलीकडेच रेडी-टू-ड्रिंक ओआरएस पेय तयार केले असून, त्याला जागतिक आरोग्य संघटना म्हणजेच डब्ल्यूएचओ कडून मान्यता प्राप्त झाली आहे.

पुढील २-३ वर्षांत सुमारे ५० लाख मुलांपर्यंत पोहोचण्याच्या उद्देशासह हा उपक्रम उत्तर प्रदेश आणि बिहारमधील १० जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. याअंतर्गत डायरियामुळे होणाऱ्या बालमृत्यूंचे प्रमाण कमी करण्यावर आणि आरोग्य सुधारण्यावर भर देण्यात येईल.

या उपक्रमाबाबत बोलताना केनव्यूचे भारतातील व्यवस्थापकीय संचालक मनीष आनंदानी म्हणाले, ओआरएसएल हा आमचा प्रतिष्ठित इलेक्ट्रोलाइट ब्रँड आहे, जो पाणी, इलेक्ट्रोलाइट्स आणि ऊर्जेचा वैज्ञानिक संयोगच आहे. डब्ल्यूएचओ-मान्यताप्राप्त रेडी-टू-ड्रिंक ओआरएस फॉर्म्युलाच्या अलीकडील लाँचसह, डायरियाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी आम्ही आपली भूमिका बजावण्यास वचनबद्ध आहोत. सरकारी प्रयत्नांना पूरक ठरवण्याच्या उद्देशाने, डायरियाचे प्रमाण जास्त असणाऱ्या जिल्ह्यांमध्ये सुमारे ५० लाख मुलांपर्यंत पोहोचण्यासाठी डायरिया से डर नहीं उपक्रम सुरू करताना आम्हाला अभिमान वाटतो.

यावेळी पीएसआय इंडियाचे कार्यकारी संचालक मुकेश कुमार शर्मा यांनी डायरियाशी लढा देण्याच्या प्रयत्नांवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, डायरिया प्रतिबंधासाठी केंद्र आणि राज्य सरकारने घेतलेला पुढाकार योग्य आहे. चांगल्या स्वच्छता सवयींबाबत जागरूकता वाढवणे, पोषक आहाराचा प्रसार करणे आणि ओआरएसचा प्रचार करणे हे निश्चितच प्रशंसनीय आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान, भारत सरकार आणि राज्य सरकारांचा विश्वासू भागीदार म्हणून पीएसआय इंडिया प्राथमिक आरोग्य केंद्रांचे महत्व वाढवण्यासाठी आणि डायरियामुळे होणारे मृत्यू रोखण्यासाठी कटिबद्ध आहे. भारताच्या सार्वत्रिक आरोग्य साधण्याच्या दिशेने सुरू असलेल्या प्रवासात आम्ही उत्तर प्रदेश आणि बिहार सरकार तसेच केनव्यू यांचे आभार मानतो, ज्यांच्या सहकार्याने या दोन्ही राज्यांतील १० महत्त्वाच्या जिल्ह्यांमध्ये डायरिया प्रतिबंधक आणि उपचारात्मक उपाय राबवले जात आहेत.

रियलमी ने रियलमी पी३ प्रो ५जी आणि रियलमी पी३ एक्स ५जी स्मार्टफोनचे केले अनावरण

नागपूर, २४ फेब्रुवारी : भारतीय तरुणांमध्ये सर्वात लोकप्रिय स्मार्टफोन ब्रँड असलेल्या रियलमीने खासकरून केवळ भारतासाठी डिझाईन केलेली रियलमी पी ३ सिरिज ५जी सादर करत आहे. ही सिरिज रियलमी पी ३ प्रो ५जी आणि रियलमी पी ३ एक्स ५जी च्या नेतृत्वाखाली भारतीय ग्राहकांसाठी तयार केलेले अत्याधुनिक इनोव्हेशन्स प्रदान करण्याच्या ब्रँडच्या तत्वज्ञानाचा स्वीकार आहे. हे स्मार्टफोन्स कामगिरी, टिकाऊपणा व स्टाइलवर लक्ष केंद्रित करून मध्यम श्रेणीच्या सेगमेंटमध्ये नवीन बेंचमार्क स्थापित करतात आणि वापरकर्त्यांसाठी सेगमेंट-फर्स्ट इनोव्हेशन्स उपलब्ध करवण्याच्या रियलमीच्या वचनबद्धतेला बळकटी देतात.

या लाँचबद्दल बोलताना रिअलमीचे प्रवक्ते म्हणाले, आम्हाला रियलमी पी ३ प्रो ५जी आणि रियलमी पी ३ एक्स ५जी लाँच करताना खूप आनंद होत आहे. हे दोन डिव्हाईसेस इनोव्हेशन आणि वापरकर्ता-केंद्रित डिझाइनसाठीची आमची वचनबद्धता दर्शवतात. रियलमी पी ३ एक्स ५जी हा त्याच्या चमकदार रंग बदलणाऱ्या फायबर आणि स्नॅपड्रॅगन ७एस जेन ३ चिपसेटसह अद्वितीय आणि पॉवरफुल अनुभव प्रदान करतो. दुसरीकडे, रियलमी पी ३ एक्स ५जी हा त्याच्या भक्कम बॅटरी आणि उच्च-स्तरीय वॉटरप्रूफ कामगिरीसह सर्वात कठीण परिस्थितींना तोंड देण्यासाठी तयार केला आहे. हे दोन्ही डिव्हाईस अपवादात्मक कामगिरी, आश्चर्यकारक व्हिज्युअअल्स आणि टिकाऊपणा प्रदान करण्यासाठी डिझाइन केलेली आहेत, ज्यामुळे ती आमच्या वापरकर्त्यांसाठी एक परिपूर्ण निवड ठरतात.

आम्ही रियलमी पी ३ सिरिज ५जी फ्लिपकार्टवर उपलब्ध करण्यास आणि त्याद्वारे आमच्या ग्राहकांना नवीनतम इनोव्हेशन आणि परफॉर्मेंस प्रदान करण्यास उत्सुक आहेत. रिअलमीच्या सोबतीने आम्ही डिझाइन आणि तंत्रज्ञानाच्या सीमा विस्तारणे काम ठेवत आहोत. रियलमी पी ३ सिरिज ५ जी ही तिच्या पॉवरफुल फीचर्स आणि नाविन्यपूर्ण डिझाइनमुळे वेगळी दिसते. हे लाँच वापरकर्त्यांना उत्तम किमतीत अत्याधुनिक स्मार्टफोन्स प्रदान करण्याच्या आमच्या वचनबद्धतेची पुष्टी करते, जेणेकरून त्यांना आमच्या प्लॅटफॉर्मद्वारे सर्वोत्तम तंत्रज्ञानाचा वापर करता येईल असे फ्लिपकार्टचे प्रवक्ते म्हणाले.

क्यू अँड आय नागपूरमध्ये दाखल

नागपूर, २० फेब्रुवारी : क्यू अँड आय (इंडिया टुडे ग्रुपच्या प्रवर्तकांकडून) ने आज नागपुरात क्यू अँड आय टुडेचे आयोजन केले. शिक्षणाच्या भविष्यावर लक्ष केंद्रित करणारा हा एक प्रमुख शैक्षणिक उपक्रम आहे. या कार्यक्रमात शहरातील ५० हून अधिक शाळांनी सहभाग घेतला, ज्यामुळे शैक्षणिक नेते आणि दूरदर्शी यांच्यात सहकार्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध झाले.

या कार्यक्रमात, विद्यार्थ्यांचे भविष्य घडवण्याच्या उद्देशाने संस्थांना सुसज्ज करण्यासाठी शिक्षण क्षेत्रात नावीन्यपूर्णता आणि सहकार्यावर भर देण्यात आला. तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण, शिक्षकांची वाढती भूमिका आणि विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये यासह महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली. उपस्थितांनी पॅनेल चर्चेत भाग घेऊन त्यांचे नेटवर्क वाढवले आणि क्षेत्रातील तज्ञांसोबत मौल्यवान ज्ञानाची देवाणघेवाण केली.

विविध शाळांचे संचालक, मुख्याध्यापक आणि निर्णय घेणाऱ्यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले. स्वागत भाषणानंतर क्यू अँड आय यावर चर्चा झाली. यानंतर वैयक्तिक शिक्षणाचे भविष्य: तंत्रज्ञान वर्ग कसे बदलत आहे या विषयावर एक संवादात्मक आणि मनोरंजक पॅनेल चर्चा झाली.

कार्यक्रमाच्या शेवटी, पुरस्कार वितरण समारंभात, शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल मुख्याध्यापक आणि संचालकांना सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाबद्दल बोलताना, थॉमसन डिजिटल आणि क्यू अँड आयचे कार्यकारी संचालक आणि सीईओ श्री. विनय सिंग म्हणाले, क्यू अँड आय टुडे शिक्षण क्षेत्रातील दिग्गजांना ज्ञानाची देवाणघेवाण आणि सहयोग करण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करते. शिक्षणाचे भविष्य घडवण्याची आणि भविष्यातील गरजांशी जुळवून घेण्याची या सर्वांची वचनबद्धता खूप प्रेरणादायी आहे.

क्यू अँड आय टुडे आयोजित करण्यात आलेल्या इतर शहरांमध्ये लखनौ, आग्रा, इंदूर, जयपूर, जम्मू, बरेली, वाराणसी, कर्नाल, डेहराडून, फरीदाबाद, चंदीगड, चेन्नई, सिलीगुडी, भोपाळ, पुणे, अहमदाबाद, नोएडा, प्रयागराज, कानपूर, गुवाहाटी, हल्द्वानी, हैदराबाद इत्यादी शहरांसह भारतातील विविध राज्ये आणि प्रांतांमधील अनेक शहरे समाविष्ट आहेत.

भारतातील सर्वात मोठे मंदिर अधिवेशन 'आयटीसीएक्स २०२५' मध्ये १५०० हून अधिक मंदिरे, राजकीय नेते आणि धर्मगुरू एकत्र

तिरुपती, २० फेब्रुवारी : आध्यात्मिक नगरी तिरुपती येथे आयोजित आंतरराष्ट्रीय मंदिर परिषद व प्रदर्शन आयटीसीएक्स २०२५ चा भव्य समारोप सोहळा नुकताच पार पडला असून हे संमेलन भारतातील सर्वात मोठे आणि प्रभावशाली मंदिर व्यवस्थापन परिषद ठरले. या ऐतिहासिक संमेलनात १,५०० हून अधिक मंदिरे, मान्यवर राजकीय नेते आणि हिंदू, शीख, बौद्ध आणि जैन धर्मांच्या पूजनीय धर्मगुरूंचा सहभाग पाहायला मिळाला.

आयटीसीएक्स आणि टेंपल कनेक्टचे संस्थापक गिरीश कुलकर्णी आणि आयटीसीएक्सचे अध्यक्ष तसेच महाराष्ट्र विधान परिषदेचे मुख्य प्रतोद प्रसाद लाड यांच्या संकल्पनेतून साकारल्या गेलेल्या या महोत्सवाने मंदिर प्रतिनिधींना मंदिरे हिंदू समाजाची शक्ती केंद्रे म्हणून पुन्हा स्थापित होऊ शकतात यावर विचार करण्यास भाग पाडले.

भारताची मंदिर अर्थव्यवस्था ४-५ लाख कोटींवर पोहोचली आहे, जी कोणत्याही मोठ्या जागतिक उद्योगाशी तुलना करण्यासारखी आहे. या पार्श्वभूमीवर झालेल्या चर्चांमध्ये मंदिरांचे व्यवस्थापन व्यावसायिक संस्थांप्रमाणे चालविण्याची गरज अधोरेखित करण्यात आली जेणेकरून सामान्य जनतेच्या देणग्या वैद्यकीय मदत, शिक्षण, आरोग्य सेवा आणि लंगरद्वारे मोठ्या प्रमाणावर अन्नवाटप या उपक्रमांमधून थेट समाजाच्या कल्याणासाठी वापरल्या जातील. आपल्या दुसऱ्या संमेलनातच आयटीसीएक्सने मंदिर व्यवस्थापनाच्या पुनर्रचनेतील एक महत्त्वाचा प्रेरणास्रोत म्हणून आपली भूमिका मजबूत केली आहे.

या संमेलनाच्या पहिल्या दिवशी देवेंद्र फडणवीस (महाराष्ट्र), एन चंद्राबाबू नायडू (आंध्र प्रदेश) आणि प्रमोद सावंत (गोवा) हे तीन मुख्यमंत्री पहिल्यांदाच एकाच मंचावर एकत्र आले, यासह केंद्रीय मंत्री आणि भारताचे नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांचीही उपस्थिती लाभली.

या भव्य कार्यक्रमाने वेगवेगळ्या पिढ्या आणि प्रदेशातील विचारवंत, आध्यात्मिक दिग्गज आणि बदल घडविण्याची इच्छाशक्ती असणाऱ्या व्यक्ती यांना त्यांच्या स्वतःच्या मंदिर परिसंस्थेमध्ये अचूक सामाजिक-आर्थिक सुधारणा करण्याच्या वचनबद्धतेदसाठी एकत्र आणले.

महाराष्ट्रातील मंदिर परिसंस्थांचे तज्ज्ञ आणि सध्या ऑस्ट्रेलियामध्ये कार्यरत असलेले श्री किरण शिंदे, तसेच योगी आदित्यनाथ यांचे अधिकृत चरित्रकार श्री शंतनु गुप्ता यांनी मंदिर व्यवस्थापन आणि सांस्कृतिक पुनरुज्जीवनावर महत्त्वपूर्ण विचार मांडले. सी. आर. मुकुंदा आणि लेखिका अमी गणात्रा यांनी ऐतिहासिक कथानकांचे वर्तमानाशी असलेले महत्त्व अधोरेखित करत या चर्चसत्राला अधिक समृद्धी केले.

होंडा मोटरसायकल आणि स्कूटर इंडियाने अमरावती येथे रस्ता सुरक्षा जनजागृती अभियानाचे आयोजन केले

अमरावती, २० फेब्रुवारी : होंडा मोटरसायकल आणि स्कूटर इंडिया (HMSI) ने रस्ता सुरक्षिततेबाबत जागरूकता वाढवण्यासाठी अमरावती, महाराष्ट्र येथे विशेष अभियान राबवले. या उपक्रमाद्वारे जिल्हा परिषद शाळा, गव्हर्नमेंट विदर्भ इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड ह्युमॅनिटीज आणि राजेश्वरी विद्या मंदिरमधील २५०० हून अधिक विद्यार्थी आणि शिक्षकांना जबाबदार रस्ता वर्तनाचे महत्त्व पटवून देण्यात आले, जेणेकरून त्यांना सुरक्षिततेबाबत मूलभूत ज्ञान मिळू शकेल.

तरुणांमध्ये लवकर रस्ता सुरक्षा शिक्षण देण्याचे महत्त्व ओळखून, HMSI ने या अभियानाचे नियोजन केवळ जनजागृतीपर्यंत मर्यादित न ठेवता, दीर्घकालीन सुरक्षिततेच्या सवयी अंगीकारण्यास प्रोत्साहन देण्यासाठी केले. विद्यार्थ्यांना लहानपणापासून सुरक्षित वाहन चालवण्याच्या सवयी लावल्याने ते जबाबदार रस्त्यावरील नागरिक बनतात आणि त्यांच्या कुटुंबासह समाजावरही सकारात्मक प्रभाव पडतो. शाळा, महाविद्यालये आणि सरकारी व बिगर-सरकारी संस्थांशी नियमित संपर्क साधून HMSI पुढील पिढीमध्ये रस्ता सुरक्षिततेची सवय रुजवत आहे, ज्यामुळे भविष्यात सर्वांसाठी सुरक्षित रस्ता प्रणाली घडेल.

अमरावतीत आयोजित या अभियानात विविध उपक्रमांचा समावेश होता, ज्यामुळे रस्ता सुरक्षा शिक्षण अधिक प्रभावी आणि रोचक बनले. सहभागी विद्यार्थ्यांनी सुरक्षित वाहन चालवण्याचे धडे, धोका ओळखण्याचे प्रशिक्षण, रस्ता सुरक्षा प्रश्नमंजुषा, खेळ, हेल्मेट जागरूकता आणि रायडिंग ट्रेनर सत्र यामध्ये भाग घेतला. या उपक्रमांचा उद्देश केवळ रस्ता सुरक्षिततेचे महत्त्व पटवून देणे नव्हे, तर विद्यार्थ्यांवर दीर्घकालीन प्रभाव पाडणे हा होता, जेणेकरून ते त्यांच्या दैनंदिन जीवनातही या शिकवणीचा उपयोग करू शकतील.

HMSI ने जिल्हा परिषद शाळा, गव्हर्नमेंट विदर्भ इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड ह्युमॅनिटीज आणि राजेश्वरी विद्या मंदिराचे आभार मानले, ज्यांच्या सहकार्यामुळे हे अभियान यशस्वी झाले. २५०० हून अधिक विद्यार्थी आणि शिक्षकांपर्यंत पोहोचण्याचे मुख्य कारण या संस्थांची सक्रिय भागीदारी आहे. या सहकार्यामुळे जबाबदार रस्ता वर्तन वाढवण्याच्या सामूहिक उद्दिष्टाला चालना मिळाली आहे.

HMSI च्या सातत्यपूर्ण रस्ता सुरक्षा उपक्रमांमुळे आतापर्यंत महाराष्ट्रातील जवळपास ३ लाख मुलांपासून प्रौढांपर्यंत लोकांना जबाबदार रस्ता वर्तनाचे प्रशिक्षण मिळाले आहे. महाराष्ट्रातील हे अभियान HMSI च्या दीर्घकालीन उद्दिष्टाचा एक महत्त्वाचा टप्पा आहे, ज्यामध्ये सुरक्षित ड्रायव्हिंग आणि रायडिंग सवयी प्रोत्साहित करण्यावर भर देण्यात आला आहे.

हिरानंदानी-क्रिसाला डेव्हलपर्स यांच्या संयुक्त विकासातून हिंजवडी पुणे येथे १०५ एकरचे इंटिग्रेटेड टाउनशिपचे अनावरण

मुंबई/पुणे, २० फेब्रुवारी : निरंजन हिरानंदानी समूहाने पुणे रिअल इस्टेट मार्केटमध्ये पदार्पण करत क्रिसाला डेव्हलपर्ससोबत १०५ एकरच्या संयुक्त विकास करारावर स्वाक्षरी केली आहे. हा प्रकल्प उत्तर हिंजवडी येथे असून, तो इंटिग्रेटेड टाउनशिप धोरणांतर्गत विकसित केला जाणार आहे. यात निवासी, व्यावसायिक आणि रिटेल डेव्हलपमेंटचा समावेश असेल.

हिरानंदानी समूहाचे अध्यक्ष डॉ. निरंजन हिरानंदानी म्हणाले, मुंबई आणि पुणे यांच्यातील महत्त्वाकांक्षी पायाभूत सुविधा प्रकल्प मुंबई - पुणेच्या कनेक्टिव्हिटीला चालना देत आहेत, ज्यामुळे MMRआणि पुणे रिअल इस्टेट मार्केट गतिमान झाले आहे. ही कनेक्टिव्हिटी स्थलांतरित होत असलेल्या व्यावसायिकांसाठी उच्च दर्जाचे राहणीमान उपलब्ध करून देत आहे. येथील आयटी हब्स, उत्कृष्ट दळणवळण सुविधा आणि कुशल व्यावसायिकांमुळे पुण्यात रिअल इस्टेट क्षेत्रात मजबूत वाढ होत आहे. या दोन प्रमुख व्यापारी शहरांमधील अखंड जोडणीमुळे रिअल इस्टेट विकासासाठी अभूतपूर्व संधी उपलब्ध झाल्या आहेत.

क्रिसाला डेव्हलपर्सचे व्यवस्थापकीय संचालक श्री आकाश अग्रवाल यांनी आनंद व्यक्त करताना सांगितले, मेगा पायाभूत सुविधा प्रकल्प या संकल्पनेवर आधारित ही टाउनशिप राहणीमान, समुदाय आरोग्य आणि पर्यावरणाविषयी जाणीव यावर भर देईल. हे टाउनशिप पहिल्यांदा घर खरेदी करणाऱ्या ग्राहकांपासून दुसऱ्या घराच्या शोधात असलेल्या खरेदीदारांपर्यंत, गुंतवणूकदार आणि एनआरआय ग्राहकांपर्यंत सर्वांसाठी समावेशक असेल. हा प्रकल्प शाश्वततेबाबत असलेल्या कटिबद्धतेमुळे वेगळा ठरणार आहे. आमच्या नामांकित ऊर्जा व संसाधन संस्थांसोबतच्या सहकार्यामुळे येथील हवेचा गुणवत्ता निर्देशांक ४० च्या आसपास राखण्याचा आमचा प्रयत्न असेल, जेणेकरून रहिवाशांना निरोगी जीवन मिळेल.

व्ही बनाओ, व्हिक्स लगाओ, व्हिक्स व्हेपोरब वापरण्याची योग्य पध्दत

नागपूर २० फेब्रुवारी : एक पालक म्हणून मुलांच्या आरोग्याचे व्यवस्थापन करणे ही एक कठीण गोष्ट आहे. बदलत्या हवामाना मुळे आणि हवेचा घसरता दर्जा यांमुळे मुलांच्या आरोग्यावर परिणाम होतो, जसे लर्जी, इन्फेक्शन्स आणि अन्य आजार होत असतात. जर यावर अंकुश ठेवला नाही तर काही काळानंतर ही लक्षणे बळावतात आणि झोपेच्या चक्राचा समतोल गेल्याने बरे होण्याच्या प्रक्रियेला बाधा निर्माण होते.

मूल ज्यावेळी आजारी पडते त्यावेळी पालक नक्कीच चिंतेत पडतात, विशेष करुन अशा वेळी ज्यावेळी मुलांची झोप ही सर्दी आणि खोकल्यामुळे पूर्ण होत नाही, त्यामुळे रोजचे काम न झाल्याने शारीरीक आरोग्यावर त्याचा परिणाम होतो. २०१० मध्ये पेनिसिल्वेनिया तील पेन्न स्टेट कॉलेज ऑफ मेडिसिन च्या डॉ. इयान पॉल यांच्या मते ज्यावेळी मुलांना सर्दी आणि खोकल्याचा त्रास होतो त्यावेळी ९० टक्क्यांहून अधिक मुलांना झोप लागण्यास त्रास होतो.

पीन्डजी हायजिन न्ड हेल्थकेअर लिमिटेड, इंडिया च्या पर्सनल हेल्थकेअरच्या कॅटेगरी लीडर मैत्रेयी जगन्नाथन यांच्या मते आम्ही नेहमीच आमच्या ग्राहकांच्या गरजा ऐकून घेऊन आमच्या उत्पादनांसह आमच्या संभाषणात त्या बदलांचा समावेश करत असतो. आम्हाला हे माहिती आहे की पालक हे व्हिक्स व्हेपोरबचा वापर विविध प्रकारे आणि डोस नुसार करत असतात. म्हणूनच आमच्या रिसर्च टिमच्या सहाय्याने आम्ही व्ही बनाओ, व्हिक्स लगाओ तंत्राची सुरुवात केली असून यामुळे ग्राहकांना कळू शकेल की किती प्रमाणात व्हिक्स व्हेपोरब लावण्याची गरज असते, आणि त्यामुळे सर्दी आणि खोकल्याच्या लक्षणांपासून बचाव होऊन योग्य झोप लागू शकेल.

व्ही बनाओ, व्हिक्स लगाओ टेक्निक विषयी अधिक माहिती देतांना प्रॉक्टर न्ड गॅंबल इंडिया च्या मेडिकल न्ड टेक्निकल अफेअर्स च्या डॉ. ज्योत्स्ना अरोरा यांनी सांगितले सर्दी आणि खोकल्यातून लवकर बरे होण्यासाठी मुलांना छान झोप लागणे आवश्यक असते. शांत झोपेमुळे मुलांना लवकर बरे होण्यास मदत होते.

बजाज अलियान्झ लाइफने केली 'गॅरंटीड पेन्शन गोल २' ची सुरुवात

नागपूर, २० फेब्रुवारी : भारतातील आघाडीच्या खासगी जीवन विमा कंपन्यांपैकी एक, बजाज अलियान्झ लाइफ इन्शुरन्सने बजाज अलायन्झ लाइफ गॅरंटीड पेन्शन गोल २ लाँच करण्याची घोषणा केली, एक नॉन-लिंक्ड, नॉन-पार्टीसिपेटिंग, तात्काळ आणि डिफर्ड वार्षिक योजना ग्राहकांना त्यांचे सेवानिवृत्तीनंतरचे नियोजन यशस्वीरित्या करण्यात मदत करण्यासाठी डिझाइन केली आहे. ३० वर्षांपर्यंत पुढे ढकलण्याची परवानगी देणाऱ्या या क्षेत्रातील पहिलीच असलेली ही नावीन्यपूर्ण पेन्शन योजना ३५ वर्षांपेक्षा कमी वयाच्या व्यक्तींना त्यांचे आर्थिक भविष्य सुरक्षित करण्यास सक्षम करते. एखाद्याला लवकर सेवानिवृत्ती घ्यायची असल्यास त्यासाठी लवचिकता प्रदान करते.

बजाज अलियान्झ लाइफच्या अलीकडील अभ्यासातून असे दिसून आले आहे की, ७७% भारतीय जीवन विम्याला सुरक्षित आणि तणावमुक्त सेवानिवृत्तीसाठी त्यांच्या पसंतीचे आर्थिक साधन मानतात. यामुळे नियोजनबद्ध सेवानिवृत्ती नियोजनाकडे वाढता कल दर्शवतो. तसेच आजचे तरुण व्यावसायिक लवकर सेवानिवृत्तीचे नियोजन करण्याची गरज ओळखतात.

लॉन्च प्रसंगी, बजाज अलियान्झ लाइफचे एमडी आणि सीईओ श्री. तरुण चुघ म्हणाले, सुधारित आरोग्यसेवेमुळे, भारतातील आयुर्मान वाढत आहे आणि आज बरेच लोक त्यांच्या ८० आणि ९० व्या वर्षी देखील चांगले जगत आहेत. याचा अर्थ असा की एखादी व्यक्ती नियमित उत्पन्नाशिवाय २५-३० वर्षे घालवू शकते, ज्यामुळे निवृत्तीचे नियोजन नेहमीपेक्षा अधिक गंभीर बनते. जागतिक स्तरावर, सेवानिवृत्त लोक सामाजिकदृष्ट्या सुरक्षिते उत्पन्नाच्या दुसऱ्या स्रोतावर अवलंबून असतात, परंतु भारतीयांना हा लाभ मिळत नाही.

चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

क्रमांक :- चंशमनपा/यांत्रिकी विभाग/२०२५/५३७६ दिनांक : २०/०२/२०२५

ई-निविदा सुचना (फेर निविदा प्रथम वेळ)

चंद्रपूर शहर महानगरपालिकेचे यांत्रिकी विभाग येथे टोइंग वाहन, हायड्रा व केन आवश्यकतेनुसार भाडे तत्वावर पुरवठा करण्याबाबतचे काम अटी व शर्ती, निविदा फार्म, शुध्दीपत्रक, कामाच्या अटी शर्ती व ईतर आवश्यक माहिती महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २०/०२/२०२५ पासुन पाहण्यास उपलब्ध आहे.

ई-निविदा प्रसिध्दीचा तपशील

कामाचे नाव :-	चंद्रपूर शहर महानगरपालिकेचे यांत्रिकी विभाग येथे टोइंग वाहन, हायड्रा व क्रेन आवश्यकतेनुसार भाडे तत्वावर पुरवठा करण्याबाबतचे काम
ऑनलाईन निविदा विक्री व स्वीकृती दिनांक	दिनांक २०/०२/२०२५ ते २८/०२/२०२५ ला दु ०३.०० वाजेपर्यंत
ऑनलाईन निविदा उघडणी दिनांक	दिनांक ०३/०३/२०२५ ला दु १२.०० वाजता शक्य झाल्यास

स्वा/-
उपायुक्त
चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

झी टीव्ही कलाकारांनी सांगितल्या त्यांच्या मातृभाषेच्या भावस्पर्शी कथा!

मुंबई, २० फेब्रुवारी : भाषा ही केवळ संवादाचे साधन नाही - ती आपल्या ओळखीचा आत्मा आहे, आपल्या संस्कृतीची रक्षक आहे आणि आपल्या भावनांचे खरे प्रतिबिंब आहे. आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन आपल्याला आपल्या मातृभाषेशी असलेल्या दृढ नात्याची आठवण करून देतो - ती भाषा ज्यामध्ये आपण सर्वांत नैसर्गिकरित्या विचार करतो, अनुभव करतो आणि स्वतःला व्यक्त करतो.

आपल्या मातृभाषेच्या माध्यमातून पुढच्या पिढीकडे कथा पास केल्या जातात, परंपरा जतन केल्या जातात आणि भावनांना त्यांचे विशुद्ध स्वरूप मिळते. भाषिक विविधता साजरी करणे म्हणजे केवळ वेगवेगळ्या भाषा आहेत हे ओळखणे नव्हे; तर ती स्वतः बोलून मिळणारे समाधान, आत्मविश्वास आणि आपलेपणाची भावना स्वीकारणे हे आहे. या खास निमित्ताने जमाई नं.१ मधील अभिषेक मलिक, भाग्य लक्ष्मी मधील ऐश्वर्या खरे, जागृति - एक नई सुबह मधील आर्य बब्बर, बस इतना सा ख्वाब मधील राजश्री ठाकूर, कैसे मुझे तुम मिल गये मधील हेमांगी कवी आणि वसुधा मधील सचिन पारीख यांनी त्यांच्या मातृभाषेवरचे गाढ प्रेम आणि त्यांची ओळख घडवण्यात या मातृभाषेच्या भूमिकेबद्दल सांगत आहेत.

झी टीव्हीवरील 'जमाई नं. १' मध्

तुतारीचे सूर,श्री शिवछत्रपतींच्या जयजयकाराने निनादले आसमंत

'जय शिवाजी जय भारत' पदयात्रेत अकोलेकरांचा उत्स्फूर्त सहभाग

▪अकोला,दि.२० (प्रतिनिधी):

तुतारीचे आसमंत निनादणारे सूर, ढोल, तालबद्ध लेझीम, मशाल, शिवचरित्रातील रोमहर्षक प्रसंग दर्शविणारे देखावे, घोडे, छत्र चामरे, बालशिवाजीचे रूप घेऊन, तसेच मराठ मोळ्या वेशभूषेत सहभागी झालेले चिमुकले अशा उत्साहपूर्ण वातावरणात शहरात आज 'जय शिवाजी जय भारत' पदयात्रा काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त वसंत देसाई क्रीडांगणापासून जिल्हाधिकारी कार्यालयात काढण्यात आलेल्या या पदयात्रेत शेकडो अकोलेकर उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पदयात्रेचा शुभारंभ करण्यात आला. तत्पूर्वी बाल शिवाजी शाळेच्या विद्यार्थ्यांनी पोवाडा व शिवगीत सादर केले. त्यानंतर महाराष्ट्र गीत सादर झाले. तुतारीच्या निनादात मशाल पेटवून छत्रपती शिवरायांचा जयजयकार करत पदयात्रेचा आरंभ झाला. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी, महापालिका आयुक्त सुनील लहाने, निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेश परंडेकर, उपविभागीय अधिकारी डॉ. शरद जावळे, जि. प. अति. सीईओ विनय ठमके, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी गिरीश पुसदकर, राजश्री कोलखेडे, शिक्षणाधिकारी सुचेता पाटेकर, रतनसिंग पवार, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. जगदीश बुकतारे, जिल्हा क्रीडा अधिकारी सतीश भट आदी यावेळी उपस्थित होते.'भारतगीते गाऊ, घरोघरी शिवराय पाहू' असे फलक हाती धरून शेळद येथील अनुसूचित जाती विद्यार्थिनींची निवासी शाळा, बाल शिवाजी विद्यालय, श्री शिवाजी विद्यालय, श्री शिवाजी अभियांत्रिकी महाविद्यालय अशा अनेक शाळांचे विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते, शेकडो नागरिक पदयात्रेत सहभागी झाले होते. महाराष्ट्र माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेला 'रायरेश्वरावर शपथ' हा देखावा लक्षवेधी ठरला. ठिकठिकाणी श्री शिवछत्रपतींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून यात्रेचे स्वागत करण्यात आले. देसाई क्रीडांगणापासून कापड बाजार, सिटी कोतवाली, शासकीय उद्यान ते जिल्हाधिकारी कार्यालय असा पदयात्रेचा मार्ग होता. जिल्हाधिकारी कार्यालय येथे वृक्षारोपण करून यात्रेचा समारोप करण्यात आला.

शिवाजी नगरात शिवकालीन देख्याव्यासह शिव जयंतीचा जल्लोष

▪अकोला,दि.२० (प्रतिनिधी):

गत तेरा वर्षांपासून सातत्याने अनेक देखावे साकारून अनेक उपक्रमांच्या समवेत शिवजयंती साजरी करणाऱ्या शिवाजी नगर शिवजयंती समितीच्या वतीने स्वराज्य संस्थापक शिवाजी महाराज यांची ३९५ वी पावन जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

समितीचे अध्यक्ष अजयभाऊ गरड यांच्या अध्यक्षतेत संपन्न झालेल्या या उत्सवात जुने शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नितिन लेव्हरकर,माजी नगरसेवक अनिलभाऊ गरड, नितिनभाऊ ताकवाले,माजी नगरसेवक सतीश ढगे,शिवजयंती समितीचे उपाध्यक्ष योगेश चपडे,हरिष बुंदेले,सचिव ललितसेठ भगत,सहसचिव शुभम गरड, निखिल नाळे,कोषाध्यक्ष तुषार नागलकार, सहकोषाध्यक्ष प्रशांत मनसुटे,सागर जुनगडे आदी उपस्थित होते.छत्रपती शिवाजी महाराज यांना सामूहिक वंदनाने या उत्सवाचा प्रारंभ करण्यात आला.यावेळी शिवकालीन

शिवरायांची मूर्ती,विहंगम देखावा व मंडप साकार करण्यात आला होता. हा देखावा बघण्यासाठी परिसरातील महिला,पुरुष नागरिकांनी या ठिकाणी एकच गर्दी केली होती. वाद्यवृंद कलाकारांच्या संगीत चमूने शिवरायांच्या जीवनावर पोवाडे व भक्ती गीते सादर करून जल्लोष निर्माण केला. यावेळी समितीचे अध्यक्ष अजय गरड यांनी समितीच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. मान्यवरांनीही या उपक्रमाचे कौतुक करीत शिवजयंती वर उपस्थितांना आपल्या शुभेच्छा बहाल केल्यात. दरम्यान या शिवजयंती उत्सवाची शिवकालीन शिवपालकी व ढोलताश्याच्या गजरात शिवकालीन साहित्य,अश्व,छत्र चामर समवेत भव्य मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक जय हिंद चौक मार्गे, सिटी कोतवाली ,मोठे राम मंदिर जवळून येत परत शिवाजी नगरात या मिरवणूकचे समापन करण्यात आले.यात आकर्षक रथात शिवाजी महाराजांची झाकी सजविण्यात आली होती.ही झाकी बघण्या साठी यावेळी अनेक महिला पुरुषांनी आपली उपस्थिती दर्शविली.

पतंजली योग समिती व दिव्यांग सोशल फाउंडेशन तर्फे

छत्रपती शिवाजी महाराज यांना मानवंदना

▪अकोला,दि.२० (प्रतिनिधी):

स्थानिक टिळक पार्क योग वर्ग , पतंजली योग समिती अकोला , टिळक पार्क ज्येष्ठ नागरिक संघ व दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला च्या संयुक्त विद्यमाने दि.१९ फेबुवारी २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. टिळक पार्क येथे कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमात शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित पोवाडे, पाळणा व विविध गीत सादर करण्यात आली. दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला चे संस्थापक अध्यक्ष डॉ. विशाल कोरडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनाचा आदर्श आम्हा सर्वांना निरंतर प्रेरणा देत असल्याचे सांगितले.भारताचे उज्वल भविष्य घडवण्यासाठी योग साधना व बलोपासना आवश्यक आहे. योगशिक्षक श्री.सुहास काटे यांच्या नि:शुल्क योग वर्गाला अकोलेकरांनी भरभरून प्रतिसाद द्यावा. दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला च्या माध्यम ाने दिव्यांग बांधवांना व्हीलचेअर, व्हाईट केन, ब्रेल बुक्स व शिष्यवृत्तीचे वाटप करून दिव्यांग सक्षमीकरण केले जात असल्याचे डॉ . कोरडे यांनी सांगितले. योगशिक्षक श्री.सुहास काटे यांनीही शिवाजी महाराज यांच्या चरित्रावर उत्तम पोवाडा गाऊन उपस्थितांना मार्गदर्शन केले .

फेसकॉम चे विनायक पांडे यांनी श्री शिवाजी महाराजांच्या जीवनावर प्रकाश टाकला . श्रीमती शकुन ताई परांजपे व संजय लाड यांनी पोवाड्याचे प्रस्तुतीकरण केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ.सुनिता कावळे तर आभार प्रदर्शन श्री. अशोक राऊत यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अस्मिता मिश्रा , अनामिका देशपांडे , तन्वी दळवे,विनायक पांडे, हरीश माखेजा, हरीश पारवणी , नवल टावरी, श्रीकांत चाळीसगावकर, प्रदीप बांधवकर,श्री फुलझेले,मीना ताई गणगणे, रुपल दोशी, क्षितिजा वाडी व शिरल काटे यांनी सहकार्य केले.

अकोला महानगरपालिकेत छत्रपती शिवाजी महाराज जयंती थाटात संपन्न

▪अकोला,दि.२० (प्रतिनिधी):

आज दि. १९ फेबुवारी २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त अकोला महानगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृह येथे आयोजित कार्यक्रमामध्ये मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करून माल्यार्पण करण्यात आले.

तसेच या कार्यक्रमांतर्गत पी.एम.श्री मनपा वरीष्ठ प्राथमिक सेमी इंग्रजी मुलांची शाळा क्रं. ७, रामदास पेठ, मनपा शाळा क्रं.४, टेंपल गार्डन शाळांच्या विद्यार्थ्यांव्दारे सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पाळणा, पोवाडे आणि नृत्य सादर करण्यात आले. तसेच कार्यक्रमाच्या

शेवटच्या टप्प्यात मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.लहाने व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बिस्कीट आणि प्रोत्साहनपर रोख बक्षीस देण्यात आले.

यावेळी मनपा उपायुक्त गीता ठाकरे, धनश्री पवार, सहा.आयुक्त विजय पारतवार, महानगरपालिका सचिव अमोल डोईफोडे, शिक्षणाधिकारी डॉ.शाहीन सुल्ताना यांचेसह मनपा अधिकारी/कर्मचारी, मनपा शाळांचे मुख्याद्यापक, शिक्षक/शिक्षिका, विद्यार्थी आणि पालक वर्गाची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

हिवरखेड येथे छत्रपती शिवरायांची निघाली भव्य मिवरणूक

▪हिवरखेड,दि.२० (प्रतिनिधी):

शहर येथे सालाबाद प्रमाने गोपाल देविदास घूंगड व विलास घूंगड यांचे वतीने तारखेप्रमाने हिंदुस्थानचे प्रथम राजे रयतेबरोबर मायभूमीची रक्षा करणारे आदर्श राजे हिंदूस्थानातील सर्वाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करत शहरातुन सालाबादप्रमाने सजविलेल्या ट्रक्टरवर कू हिंदवी देशमुख कु तनवी नेरकर या जिजाऊ माता बनलेल्या बालिका सहित शिवप्रतीमेची मिरवनूक बारगण पुरा येथील श्रीराम सेनेच्या व्यायाम शाळेच्या पटुनी लेझीम लाठी काठी चे चौकाचौकात प्रात्यक्षीके दाखवत अर्श्वासह नाचत शहरात ऊत्साह निर्मान केला शांततेत काढन्यात आली यावेळी सूरवातीला श्री शकर सस्थांन देवळीवेस च्या प्रांगनात हिवरखेडचे कर्त्यव्यदक्ष ठानेदार गजाननजी राठोड, रमेशभाऊ दुंतोंडे पोलीस पाटील प्रकाश गावंडे अनिल कराळे,रवी मानकर, दूय्यम ठानेदार श्रीराम जाधव, गोपाल बिलबीले, बिट अमलदार महादेव नेवारे, रवीराणा घूंगड शिक्षीका निलीमा घूंगड महीला हे कॉ रेखाताई रघुवंशी, पुरुषोत्तम पाटील गावंडे बाळासाहेब नेरकर, आनंद बोहरा,ज्ञानदेव भटकर, गोवर्धन गावंडे आकाश गजभार प्रफुल पवार, योगी दुंतोडे शालीग्राम मोरोकार रामेर्श्वर हागे रवी गावंडे ईत्यांदीनी छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रतीमा पुजन केले तसेच मिरवनूक मार्गावर असलेल्या भवानी माता मंदीर जवळ असलेल्या शिवाजी महाराजाच्या मूर्तीचे पुजन करन्यात आले व तेथे महाराजाची महाआरती करन्यात आली तसेच चंडीका चौक संत तुकाराम चौक शिवाजी चौक येथे सूद्धा ग्रामस्थाकडुन शिवरायाचे पुजन करन्यात आले शिव प्रेमी नागरिकाकडुन मिरवनूक मार्गावर सडासारवण रांगोळी काढून शिवरथाचे स्वागत तसेच चहापान ची व्यवस्था करण्यात आली होती.

पातूरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव उत्साहात साजरा

▪पातुर,दि.२० (प्रतिनिधी):

येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने शिवाजीनगर, खडकेश्वर येथे महाराजांच्या प्रतिमेचे पूजन मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाला भाजपा महिला मोर्चाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यींनी मोठ्या संख्येने हजेरी लावली.कार्यक्रमात भाजपा महिला मोर्चाच्या सौ. वैशाली निकम, सौ. शीला आवटे, सौ. माधुरी ढोणे, सौ. मंजुषा लोथे, रेखा गोतरकर, वैशाली पेंढारकर, सौ. प्रतिभा म ोकळकर, सौ. कांचन वर्मा, संघवी ताई, शेवतकार ताई, गंगाताई चुनडे, शारदा सिताबराव, अर्चना सिताबराव, रूपाली इनामदार, सुशीला भाजीपाले, सुशीला डोंगे, वर्षा माकोडे, संगीता ढोणे, शारदा इंगळे, सुनीता बोळे, लिलाबाई भगत, विशाखा जावळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित असलेल्या शालेय विद्यार्थ्यांनी आपल्या उत्स्फूर्त भाषणांतून, शिवरायांच्या शौर्यगाथेचे वर्णन केले. त्यांच्या गाण्यांनी आणि घोषणांनी संपूर्ण वातावरण शिवमय झाले. विद्यार्थ्यांनी 'जय भवानी, जय शिवाजी' अशा गगनभेदी घोषणांनी शिवाजी महाराजांचा पराक्रम आणि त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांना उजाळा दिला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्यावर आधारित गीतं सादर केली, तसेच त्यांच्या पराक्रमावर भाषण देत उपस्थितांचे मन जिंकले.

इतिहासाच्या आठवणींनी

बोडखा येथे शिवजयंती उत्सवाचा जल्लोष

▪पातुर,दि.२० (प्रतिनिधी):

तालुक्यातील बोडखा गावात १९ फेबुवारी २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या शिवजयंती उत्सवाचे आयोजन भीम सम्राट मित्र मंडळ ओळखा यांच्या वतीने बौद्ध विहार येथे करण्यात आले होते.कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेची पूजा करून झाली. तसेच महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करून उपस्थितांनी छत्रपतींच्या जयघोषाने परिसर दणाणून टाकला.या सोहळ्याला ज्येष्ठ पत्रकार आणि साहित्यिक देवानंद गहिले तसेच अकोल्याचे सुप्रसिद्ध व्याख्याते प्राध्यापक देवानंद गावंडे आणि हर्षल गवई यांनी मार्गदर्शन केले.

निधन वार्ता

सरस्वतीदेवी कोठारी

अकोला : स्थानीय नवजीवन टॅरेस,जठारपेठ येथील रहिवासी, कोठारी कन्ट्रक्शन कंपनीचे संचालक व एसीसीईचे केंद्रीय पदाधिकारी पंकज कोठारी यांच्या मातोश्री सौ सरस्वतीदेवी रमेशचन्द्र कोठारी यांचे गुरुवार दि २० फेबुवारी रोजी निधन झाले.त्या ७८ वर्षाच्या होत्या. त्यांना पंकज व परेश हे दोन पुत्र व १ मुलगी,नातवंडे असा परिवार आहे.

तेल्हारा शहरात दख्खनी मराठा समाजाच्या वतीने

छत्रपती शिवाजी महाराजांची ३९५ वी जयंती उत्साहात साजरी!

▪तेल्हारा,दि.२० (प्रतिनिधी):

दि.१९ फेबु. २०२५ श्र तेल्हारा शहरात बुधवार दिनांक १९ फेबुवारी २०२५ रोजी हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वि जयंती विविध कार्यक्रम राबवून उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज शहाजीराजे भोसले यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून दिनांक १९ फेबुवारी रोजी तेल्हारा शहरात दख्खनी मराठा समाजाच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ''रक्त सांडून जीवन संपवण्यापेक्षा , रक्त दान करून जीवदान द्या'' या सुविचाराला प्रेरित होऊन आयोजित कार्यक्रमातील रक्तदान शिबिरात अनेक दखनी मराठा समाजातील नागरिकांनी रक्तदान करून आपला सहभाग नोंदविला ही अतिशय कौतुकास्पद बाब आहे. या कार्यक्रमांमध्ये रांगोळी स्पर्धा , वकृत्व स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा अशा स्वरूपाच्या अनेक स्पर्धा राबवून विजेता स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण केले. या कार्यक्रमाचे आयोजन माहेश्वरी भवन तेल्हारा येथे करण्यात आले होते . सायंकाळी ०५:०० वाजता शहरातून छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा स्थापित पालखी यात्रा काढण्यात आली.

तळेगाव बाजार येथे शिवजयंती उत्साहात साजरी

▪तेल्हारा,दि.२० (प्रतिनिधी):

तालुक्यातील तळेगाव बाजार येथे शिवाजी चौकात शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली वंचित बहुजन आघाडी चे तालुकाध्यक्ष अशोक दारोकार यांचे शुभहस्ते शिवाजी महाराज फोटो चे पुजन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राजिकभाई शे मुजफर विलास हिवराळे देवेंद्र भड याचि उपस्थित होते. यावेळी शिवाजी महाराज यांचे फोटो चे पुजन मान्यवर यांनि केले यावेळी वैभव खारोडे मयुर खारोडे संदिप मानखैर शे जम्मुभाई दिपक खारोडे गोपाल बंड अनिकेत मगर प्रणव खारोडे धिरज खारोडे सचिन खारोडे सौरभ पाटील सोपान डिक्कर स्वराज खारोडे निखिल मानखैर स्वयम खारोडे वेदांत खारोडे केशव खारोडे संचित खारोडे अमर उमाळे भुषण खारोडे पवन खारोडे याचिं उपस्थिती होती या वेळी यावेळी पन्नास युवकांनी गुटख्याची होळी केली व गुटखा न खाण्याचा निर्णय घेतला. कार्यक्रमांचे आयोजन सदानंद खारोडे यांनी केले होते.

RNINO-48973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तन्मुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्क्वेअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तन्मुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम होले फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

अस्मिता

गरमागरम पोडी इडली

रसगंधा

इडली हा झटपट होणारा पदार्थ. आज घराघरात इडली बनते. सर्वसाधारणपणे इडली चटणी किंवा इडली सांबार खाल्लं जातं. पण एखाद्या दिवशी बदल म्हणून पोडी इडली बनवू शकता. हा सकाळच्या गडबडीत पटकन होणारा पदार्थ आहे.

साहित्य : छोट्या आकाराच्या दहा इडल्या, दोन चमचे शेंगदाणे, दोन मोठे चमचे चणाडाळ, एक मोठा चमचा उडिद डाळ, दोन ते तीन सुक्या लाल मिर्च्या, दोन छोटे चमचे

तीळ, दोन छोटे चमचे किसलेलं सुकं खोबरं, अर्धा चमचा जीरं, कढीपत्त्याची सहा-सात पानं, चवीनुसार मीठ आणि तूप

कृती : एका कढईत दाणे, लाल मिरची, चणा डाळ, उडीद डाळ, तीळ, सुकं खोबरं, जीरं आणि कढीपत्त्याची पानं घालून मंद आचेवर भाजून घ्या. त्यानंतर गॅस बंद करा. हे पदार्थ थंड झाल्यावर मिक्सरमधून बारीक वाटून घ्या. वाटताना चवीनुसार मीठ घाला. तुमचा पोडी मसाला तयार आहे. आता कढईत थोडं तूप गरम करा. यात इडल्या घालून परतून घ्या. आता या इडलीवर पोडी मसाला भुरभुरा. चमच्याने नीट हलवून घ्या. पोडी इडली तयार आहे.

✦✦✦

घालमेल कशी थांबवू?

काय करू?

तीन वर्षांपूर्वी माझं लग्न झालं. माझा नवरा महिन्यातले २५ दिवस कामासाठी बाहेर असतो. यामुळे मला खूप एकटं वाटतं. आमच्यातला संवाद खूपच कमी झाला आहे. तो बाहेर गेल्यावर रोज फक्त १०-१५ मिनिटं बोलणं होतं. यामुळे माझी चिडचिड होते. पण त्याच्यावर कामाचा खूप ताण असल्यामुळे तक्रारींची भर पडू नये, असं वाटतं. मी काय करू?

– वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्याचं संतुलन साधण्याची कला प्रत्येकाला जमायला हवी. पण अनेकदा असं संतुलन साधणं कठीण होतं आणि एकच बाजू वरचढ ठरते. पण नात्याला आकार देण्यासाठी एकमेकांसोबत चांगला वेळ घालवणंही गरजेचं आहे. तू पतीला समजून घेऊन परिस्थितीला योग्य पद्धतीने सामोरं जात आहेस. पण तुझी घालमेल पतीला सांगणंही गरजेचं आहे. तुझ्या भावना त्याच्यापर्यंत पोहोचल्याच नाही तर तो स्वत:मध्ये सुधारणा कशी करणार? प्रत्यक्ष बोलायला वेळ नसेल तर तू त्याला मेसेज कर, मेल पाठव. तो परतल्यावर लंच किंवा डिनरच्या निमित्ताने एखाद्या निवांत ठिकाणी जाऊन मोकळ्या गप्पा मारण्याचा बेतही ठरवू शकतेस. बघ, कोणता मार्ग प्रशस्त वाटतो ते...



✦✦✦

पगारवाढ हवी आहे?

स्कील डेव्हलपमेंट

नोकरी म्हटली की पगारवाढ आलीच. कर्मचाऱ्यांना त्यांच्या कौशल्यांनुसार, क्षमतेनुसार बढती दिली जाते. ठराविक काळानंतर पगारवाढही होते. पण २०१५ च्या एका सर्वेक्षणानुसार ५७ टक्के नोकरदार महिला पगारवाढीसाठी विचारणाच करत नाहीत. पगारवाढ मिळवण्यासाठी नेमकं काय करायला हवं याविषयी...

* कंपनीच्या प्रगतीत तुम्ही दिलेल्या योगदानाचा विचार करा. कामाचा दर्जा आणि प्रमाण यांचा ताळमेळ बसवताना अचूकता महत्त्वाची आहे हे लक्षात घ्या.
* स्वत:मधली कौशल्यं ओळखा. त्यांची यादी करा. तांत्रिकच नाही तर कामाशी संबंधित इतर कौशल्यंही महत्त्वाची ठरतात. तुमची समर्पक वृत्ती, वेळेत कामं संपवणं, कामाप्रतीची निष्ठा या गोष्टीही महत्त्वाच्या आहेत हे लक्षात ठेवा. आपलं पद, हाताखाली काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दिलेलं प्रशिक्षण या बाबींचा विचार करा. पगारवाढीबाबत वाटाघाटी करताना आत्मविश्वास दिसू द्या.
* एक कर्मचारी म्हणून स्वत:चं मूल्य जाणून घ्या. पगारवाढीबाबत वरिष्ठांशी चर्चा करण्याआधी बाजारपेठेचा अभ्यास करा. तुमच्या पदावर असणाऱ्यांना किती पगार मिळतो हे जाणून घ्या. त्यानुसार वरिष्ठांशी बोला. आपल्याला किती पगारवाढ हवी याचा निश्चित आकडा आपल्याकडे असायला हवा. तसं नसेल तर आपल्याला वरिष्ठांनी दिलेली पगारवाढ मान्य करावी लागेल.
* वरिष्ठांशी वाटाघाटी करण्याआधी पूर्ण तयारी करा. अन्यथा, तुम्ही गोंधळून जाल.
* तुम्ही पगारवाढीसाठी वाटाघाटी करत आहात हे लक्षात ठेवा. वरिष्ठ आकडा कमी करण्याचा प्रयत्न करणार. कोणीही पहिल्याच प्रयत्नात भरपूर पगारवाढ देणार नाही. त्यामुळे सुरूवात मोठ्या आकड्याने करा. वाटाघाटींदरम्यान हा आकडा खाली येणार आहे हे लक्षात ठेवा.

आर्थिक सक्षमीकरणाच्या दिशेने..

पत्रकार असणाऱ्या सोनल रोचानी यांना समाजासाठी काही तरी करायचं होतं. वंचित, दुर्बल घटकांना त्यांचे हक्क मिळवून द्यायचे होते. कामाच्या निमित्ताने फिरताना त्यांना समाजातल्या विविध घटकांमधली आर्थिक दरी दिसत होती. पण कामाची सुरूवात काही केल्या होत नव्हती. पण एका घटनेने त्यांचं आयुष्यच बदलून टाकलं आणि आदिवासी समाजातल्या महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले.

सोनल रोचानी यांना फक्त पत्रकारितेच्या क्षेत्रापुरतं मर्यादित रहायचं नव्हतं. पत्रकारितेच्या पलीकडे जाऊन समाजातल्या वंचित, दुर्बल घटकांना मदत करण्याची त्यांची इच्छा होती. सोनल सूरतमध्ये पत्रकार म्हणून कार्यरत होत्या. त्यांना कामानिमित्ताने बरंच हिंडावं लागायचं. या दरम्यान त्यांनी समाजातला विरोधाभास अनुभवला. पण हळहळ व्यक्त करण्याशिवाय त्या दुसरं काही करू शकत नव्हत्या. पण २००५ मधल्या एका घटनेने त्या खूप हादरल्या. या घटनेने त्यांच्या आयुष्याला कलाटणी दिली. त्या बातम्या मिळवण्यासाठी जिल्हा रुग्णालयात जायच्या. असंच एके दिवशी रुग्णालयात आलेल्या एका महिलेने त्यांच्याकडे मदत मागितली. सासरच्यांनी त्या गरोदर महिलेच्या अंगावर रॉकेल ओतलं होतं. पोटातल्या बाळाचं लिंग कळल्यामुळे ते तिला पेटवून देण्याच्या तयारीत होते. सोनल आणि इतरांनी या महिलेला मदत केली. पण महिला सक्षमीकरणासाठी आपण आणखी काही तरी करायला हवं, याची जाणीव त्यांना झाली. ग्रामीण भागातल्या महिलांच्या परिस्थितीबाबत त्यांनी संशोधन केलं. मर्यादित स्रोतांमुळे या महिला मागे पडत असल्याचं त्यांच्या लक्षात आलं.

मानिनी

सोनल यांच्या कार्याचं बीज तिथेच रोवलं गेलं. मग जवळपास पाच वर्षांच्या प्रयत्नांनंतर नोकरी सोडून समाजकार्याकडे वळण्याचं धाडस सोनल यांनी दाखवलं. त्यांनी आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणाच्या कामाला वाहून घ्यायचं ठरवलं. काही काळ जागतिक बँकेसोबत काम केलं. विविध सामाजिक कार्यांसाठी देण्यात येणाऱ्या निधीच्या वाटपाचा अभ्यास केला. जागरूकतेच्या अभावामुळे ग्रामीण भागातल्या लोकांना सरकारी योजनांचे लाभ मिळत नसल्याची बाब त्यांच्या लक्षात आली. ग्रामीण भागातल्या महिला आणि मुलांसाठी असणाऱ्या सरकारी योजनांचे लाभ त्यांना मिळवून देण्यासाठी सोनल यांनी २०११ मध्ये शक्ती फाउंडेशन या सेवाभावी संस्थेची स्थापना केली.

सामाजिक परिस्थिती जाणून घेण्यासाठी त्या संपूर्ण गुजरात राज्यात फिरल्या. त्यानंतर त्यांनी सुरत आणि तापी परिसरातल्या हलपाती आणि कोटद्वारा या आदिवासी समाजांसाठी काम करायचं ठरवलं. या समाजांमधले पुरुष दारूच्या आहारी गेले होते. त्यामुळे त्यांचं आयुष्य खूप कमी झालं होतं तर वनसंपदा कमी झाल्यामुळे कोटद्वारा समाजाचा बांबूपासून हस्तकलेच्या वस्तू घडवण्याचा पारंपरिक व्यवसाय धोक्यात आला होता. त्यामुळे या दोन्ही समाजांची स्थिती अत्यंत हलाखीची होती. सोनल आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी बरेच प्रयत्न केले. शिक्षण, आरोग्य, स्वच्छता अशा विविध क्षेत्रांमध्ये काम केलं. आज तब्बल आठ वर्षांनंतर शक्ती फाउंडेशनने ५५ गावांमधल्या जवळपास पाच हजार आदिवासी महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम केलं आहे. स्वत:चे व्यवसाय सुरू करण्यासाठी त्यांना संस्थेतर्फे प्रशिक्षण आणि मदत देण्यात आली आहे. आता त्याची गोड फळं चाखायला मिळत आहेत. आता संस्थेला आपलं कार्य राज्यभर पोहोचवायचं आहे. सोनल यांनी अनेक महिलांचं आयुष्य पूर्णपणे बदलून टाकलं आहे.

✦✦✦

फ्रीजमध्ये काय ठेऊ नये?

हेल्थ टॉक

बाजारातून आणलेल्या फळं, भाज्या आपण थेट फ्रीजमध्ये ठेवतो. यासोबतच घरातले उरलेसुरले पदार्थही फ्रीजमध्येच जातात. मात्र काही पदार्थ फ्रीजमध्ये ठेवल्याने त्यांची गुणवत्ता, चव बिघडते. शिवाय असे पदार्थ आरोग्यासाठीही घातक ठरू शकतात. कोणते पदार्थ फ्रीजमध्ये ठेवणं अयोग्य ठरतं? जाणून घेऊ.

* टोमॅटो फ्रीजमध्ये ठेऊ नयेत. त्यात पाणी कमी असल्यामुळे थंड वातावरणात ते लवकर खराब होतात. फ्रीजमधल्या टोमॅटोंचा रंगही बदलतो. अशा टोमॅटोंचं सेवन घातक ठरू शकतं.
* पाव, ब्रेड असे पदार्थ फ्रीजमध्ये ठेऊ नयेत. फ्रीजमध्ये ठेवल्यानंतर ब्रेड कोरडा पडतो. त्याची चव बदलते.
* फ्रीजमधल्या थंड वातावरणामुळे बटाट्यातल्या स्टार्चचं रुपांतर साखरेत होतं. यामुळे पोटाच्या समस्या निर्माण होतात.
* फ्रीजमधल्या मधात खडे तयार होतात. तसंच हे मध गोठून जातं. त्यामुळे मधाची बाटली सर्वसामान्य तापमानातच ठेवावी.
* थंडगार कलिंगड खूप छान लागतं. पण फ्रीजमध्ये ठेवल्यानंतर कलिंगडातले पोषक घटक नष्ट होतात.
* कॉफी फ्रीजमध्ये ठेऊ नये. यामुळे कॉफीचा ताजेपणा नष्ट होतो. कॉफी फ्रीजमधले विविध प्रकारचे गंध शोषून घेते. याचा आरोग्यावर परिणाम होतो.
* सोया सॉस, टोमॅटो केचप असे पदार्थ फ्रीजमध्ये ठेवण्याची गरज नसते.
* लिंबू, संत्र्यासारखी आंबट फळंही फ्रीजमध्ये खराब होतात. त्यांच्या सालांवर डाग पडतात आणि रसही आटतो.

✦✦✦

रोज खा भात

डाएट मंत्रा

भारतामध्ये विविध खाद्यसंस्कृती अस्तित्वात असल्या तरी भात हा त्यातील समान धागा आहे. भारताच्या बहुतेक सर्व भागांमध्ये तांदळापासून बनवलेल्या विविध पाककृती आहाराचा बहुतांश भाग व्यापतात. एकंदरच भात हे भारतीयांचं आवडीचं अन्न आहे असं म्हणायला हवं. एकीकडे भातामुळे वजन वाढतं, जाडी वाढते, रक्तातील शर्करा वाढते असे समज भीती वाढवत राहतात. पण हे गैरसमजच असल्याचं तज्ज्ञ सांगतात. तांदळाच्या विविध जातींमध्ये व्हिटॅमिन्स आणि मिनरल्सचा उत्तम स्रोत असतो. तांदळामध्ये व्हिटॅमिन डी, कॅल्शियम, फायबर, थायमीन, लोह आदी आवश्यक घटकांची उत्तम मात्रा असते. म्हणूनच हे लाभ मिळवण्यासाठी दररोजच्या आहारात भात असावा.

पोट खराब असल्यास, जुलाब, उलट्या होत असल्यास तांदूळ आणि मुगाची डाळ एकत्र करुन तयार केलेली खिचडी खावी. ही खिचडी पचायला हलकी असते. त्याचप्रमाणे तांदळातील पौष्टिक घटकांमुळे पचनक्रिया सुरळीत होण्यास मदत होते.

* व्हाईट राईसऐवजी ब्राऊन राईसला प्राधान्य द्यावं. हा तांदूळ मधूमेहींसाठी विशेष उपकारक ठरतो. मात्र अस्थमा असणाऱ्यांनी हा तांदूळ वापरू नये. कारण या तांदळाची प्रकृती थंड आहे. या तांदळाचा भात खाल्ल्यास दम्याचा त्रास वाढू शकतो.
* दररोज भात खाल्ल्याने शरीराची कार्बोहाईड्रेटची गरज भागते. या घटकामुळे मेंदूचे कार्य सुरळीत रहाते. भातामुळे शरीराची कार्यक्षमताही टिकून राहाते.
* उच्च रक्तदाबाचा त्रास असणाऱ्या महिलांनी रोजच्या आहारात एक वाटी भात ठेवायलाच हवा. तांदळामध्ये सोडियमची मात्रा नसते. त्यामुळे हृदयविकाराचा धोका दूर रहातो.
* तांदळामध्ये नाममात्र स्वरूपात कोलेस्टेरॉल असतं. तुम्ही कोलेस्टेरॉल फ्री राईसही वापरू शकता. यामुळे जाडी वाढण्याचा धोका संपतो.
* ब्राऊन राईसमध्ये शरीरात विरघळणाऱ्या फायबरची पर्याप्त मात्रा असते. ही बाब कॅन्सरचा धोका दूर ठेवण्यास पूरक ठरते.
* भाताची पेजही लाभकारक आहे. इतकंच नव्हे तर, तांदूळ शिजवलेल्या पाण्याने चेहरा धुतल्यास त्वचारोग दूर होतात. त्याप्रमाणे सुरकुत्यांपासून मुक्ती मिळते.
* दररोजच्या आहारात भात असेल तर अल्झायमरचा धोका टळतो असं तज्ज्ञ सांगतात.

✦✦✦

जपा केसांचे आरोग्य

थंडीत केसांची विशेष काळजी घ्यावी लागते. थंड वातावरण केस कोरडे होणं, त्वचा खाजणं, कोंड्याची समस्या वाढणं आदी त्रास संभवतो. म्हणूनच या दिवसात आहारात काही महत्त्वपूर्ण घटकांचा समावेश करुन केसांचं आरोग्य अबाधित राखण्याचा प्रयत्न करायला हवा.

थंडीत केसांच्या समस्या वाढतात हा अनेकींचा अनुभव असेल. म्हणूनच या दिवसांत केसांकडे विशेष लक्ष द्यायला हवं. केसगळती पर्यायाने सौंदर्याच्या हानी रोखायची असल्यास काही टिप्स लक्षात घ्यायला हव्या.

* केसांना प्रथिनं अत्यावश्यक असतात. ती पुरेशा प्रमाणात मिळाली नाहीत तर लोहाची कमतरता निर्माण होऊन केस गळू लागतात. म्हणून आहारात कडधान्ये, डाळी, मसूर, सोयाबीन, वाटाणे यांसारखे पदार्थ असावेत.
* दही, दूध, चीज यांचं पुरेसं प्रमाण असेल तर योग्य प्रमाणात कॅल्शियम आणि ड जीवनसत्त्व मिळून केसांची मुळं पक्की होतात.
* फळं आणि भाज्या, हिरव्या पालेभाज्या, पिवळ्या आणि नारिंगी रंगांची फळं यांमधून अ तसेच क जीवनसत्त्वं मिळून टाळूला तेलनिर्मिती करण्यास मदत होते.
* मीठ आणि साखर अति प्रमाणात खाल्लं जात असेल तर डोक्यावरची त्वचा लाल होऊन खाज सुटते. कोंडा वाढतो. म्हणून हे पदार्थ टाळले पाहिजेत.
* रोज थोडे काजू खाल्ल्याने जस्त मिळतं आणि त्यामुळे केस तेजस्वी दिसतात.
* गाजर, रताळी, अक्रोड, बदाम यांचा आहारातील समावेशही केसांच्या वाढीला उपयुक्त ठरतो.

✦✦✦

चलती रंगीबेरंगी मस्काराची

ब्युटी टॉक

डोळ्यांचं सौंदर्य खुलवण्यासाठी काजळ, लायनर, आयशॅडो, मस्कारा यांचा वापर होतो. बोल्ड लूकसाठी रंगीबेरंगी मस्कारा ट्राय करता येतो. डोळ्यांच्या रंगानुसार त्याची निवड करा.

* काळ्यापेक्षा काही वेगळं ट्राय करायचं असेल तर ब्राउन मस्कारा लावा. ब्राउन मस्कारा तुम्हाला नॅचरल लूक देतो. हा मस्कारा पार्टी किंवा समारंभाला जाताना लावता येईल. ऑफिसमध्येही तुम्ही तो ट्राय करू शकता. ब्राउन रंगाचे डोळे असतील तर हा मस्कारा ट्राय करा.
* हिरवट रंगाचे डोळे असणाऱ्यांनी निळ्या रंगाचा मस्कारा लावायला हरकत नाही. निळ्या रंगातल्या विविध शेड्स ट्राय करता येतील. निळा रंग रात्रीपेक्षा सकाळी उठून दिसतो. हटके लूकसाठी गोल्डन मस्कारा ट्राय करा.
* डार्क ब्राउन रंगाच्या डोळ्यांसाठी मस्काराच्या हिरव्या शेड ट्राय करा.
* डोळ्यांचा आकार मोठा भासवायचा असेल तर पर्पल मस्कारा लावा. सावळ्या वर्णाच्या महिलांवर पर्पल तर गोऱ्या वर्णाच्या महिलांवर व्हायोलेट शेड उठून दिसेल.

✦✦✦

टाचांना भेगा आहेत?

स्मार्ट टिप्स

टाचांना भेगा पडणं ही अनेकींची समस्या असते. मात्र वेळीच लक्ष दिलं नाही तर ही समस्या गंभीर रुप धारण करते. टाचांच्या भेगांमुळे स्किन इंफेक्शनचा धोका संभवतो. मधुमेहींना हा धोका अधिक गांभीर्यानं जाणवतो. म्हणूनच यावर वेळीच उपाय करायला हवा. घरच्या घरी देखील टाचेच्या भेगांवर परिणामकारक उपाय होऊ शकतो. यासाठी बेकिंग सोडा आणि दूध हे मिश्रण वापरावं. दूध हे नैसर्गिक मॉइश्चरायझर आहे. दुधामुळे त्वचा मऊ मुलायम बनते. दुधाऐवजी मिल्क पावडरचाही वापर करता येतो. दोन कप दुधामध्ये एक चमचा बेकिंग पावडर मिसळावी आणि यात पाय बुडवून ठेवावेत. यामुळे पायाच्या भेगा कमी होतीलच त्याचप्रमाणे टॅनिंगही निघून जाईल.

दरवळत रहा...

लक्षात असावे

डिओचा सुगंध दिवसभर टिकवून ठेवायचा असेल तर काही टिप्स फॉलो कराव्या लागतील. ओल्या अंगावर डिओ फवारल्याने त्याचा सुगंध फार काळ टिकत नाही. त्यामुळे आंघोळीनंतर लगेच डिओ फवारू नका. अंग कोरडं करून मगच वापरा. ड्रशेक बीफोर युजफ या सूचनेचं पालन करा. यामुळे डिओतले सर्व घटक एकजीव होऊन चांगल्या प्रकारे काम करतात आणि शरीराची जळजळ होत नाही. बाटली शरीरापासून १५ सेंटीमीटर लांब ठेऊन डिओ फवारा. डिओ कपड्यांवर फवारू नका.

अशी चमकवा काळी भांडी

किचन टिप्स

सततच्या वापरामुळे कढई आणि भांडी काळी पडतात. पदार्थ करपल्यामुळेही भांड्यांचा तळ काळपट दिसू लागतो. या काळ्या भांड्यांचा वापर नकोसा वाटतो. मात्र काही उपायांद्वारे तुम्ही भांड्यांचा काळपटपणा सहज दूर करू शकता. काळपट कढईत एक चमचा बेकिंग सोडा घालून त्यात दोन चमचे लिंबाचा रस आणि दोन कप पाणी घाला. स्टीलच्या स्क्रबरने कढई घासून स्वच्छ करा. काळपटपणा निघून जाईल. टोमॅटोच्या रसानेही काळपट भांडी स्वच्छ होतील. काळ्या पडलेल्या भांड्यांमध्ये टोमॅटोचा रस आणि पाणी घालून उकळून घ्या. यानंतर स्क्रबरने घासून स्वच्छ करा.

बांगलादेशच्या विमानाचे नागपुरात इमर्जन्सी लॅण्डिंग

ढाका-दुबई विमानात ४०० प्रवासी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :** बांगलादेशच्या विमानाला तांत्रिक बिघाडामुळे नागपुरात आणीबाणी अवतरण करावे लागले. बुधवारी मध्यरात्री १२ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर हे विमान उतरले.

ढाका ते दुबई या मार्गावर जाणाऱ्या या विमानात ४०० प्रवासी होते. सध्या हे विमान टर्मिनल इमारतीजवळ उभे करण्यात आले आहे. बांगलादेश एअरलाईन्सचा एक कर्मचारी प्रवाशांची काळजी घेत आहे.

नागपूर विमानतळावर यापूर्वीही अशा आणीबाणी अवतरणाच्या घटना घडल्या आहेत. १० नोव्हेंबर २०२४ रोजी बॉम्बची धमकी मिळाल्याने नागपूर-कोलकाता इंडिगो विमानाला रायपूरला उतरावे लागले होते.

२० जून २०२४ रोजी यूएस-बांगला एअरलाइन्सच्या बीएस-३४३ विमानाला इंजिन बिघाडामुळे नागपुरात उतरावे लागले होते. त्यावेळी प्रवाशांना विमानतळावर ९ तास थांबावे लागले होते. १७ जानेवारी २०२४ मध्ये एका प्रवाशाची प्रकृती बिघडल्याने शारजाह-चितगाव मार्गावरील एअर अरेबिया विमानाला नागपुरात अवतरण करावे लागले होते.

देशाला ८ ते १० हजार पायलटची गरज

■ **महासागर प्रतिनिधी**
चंद्रपूर, दि. २० :

भारत सरकारने २०० नवीन विमानांचे ऑर्डर दिली आहे. त्यामुळे भविष्यात ८ ते १० हजार वैमानिकांची गरज पडणार आहे. त्यासाठी आतापासूनच प्रशिक्षित वैमानिक घडविणे आवश्यक असले तरी प्रत्यक्षात प्रशिक्षणासाठी लागणारे विमान तुलनेने कमी असल्याने येत्या काळात प्रशिक्षण विमानांची संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची माहिती ॲरो फ्लाईंग क्लबचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय नागरी उड्डयण मंत्री खासदार राजीव प्रताप रूडी यांनी दिली.

चंद्रपूर येथील मोरवा येथे वैमानिक प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन करण्यासाठी ते आज चंद्रपूरला आले असता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी माजी मंत्री

आमदार सुधीर मुनगंटीवार, जिल्हाधिकारी विनय गौडा उपस्थित होते.

खा.राजीव प्रताप रूडी म्हणाले की, नागपूर येथे असलेल्या वैमानिक प्रशिक्षण केंद्रातील दोन विमाने परत घेऊन जाणार होतो मात्र चंद्रपूर येथील प्रशिक्षण केंद्रासाठी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे ती दोन प्रशिक्षण विमाने चंद्रपूरसाठी दिले आहेत मात्र चंद्रपूरसाठी आणखी प्रशिक्षण विमानांची गरज आहे असेही ते म्हणाले. भविष्यात चंद्रपूरचे वैमानिक प्रशिक्षण केंद्र भारतातील प्रमूख प्रशिक्षण केंद्रापैकी एक असेल असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

सर्वसाधारण परिवारातील युवक, युवतींना पायलट बननण्याची ईच्छा असते मात्र यासाठी लागणा?या अवाढव्य खचार्मुळे ते बनू शकत नाहीत मात्र आता देशातच वैमानिक प्रशिक्षण केंद्र सुरू झाल्यास होतकरू विद्यार्थ्यांसाठी ही संधी मिळू शकते असेही ते यावेळी म्हणाले.

चंद्रपूर येथे होऊ घातलेल्या व्यावसायीक विमानतळाबाबत बोलतांना ते म्हणाले की, चंद्रपूरला विमानतळ आवश्यक आहे, प्रस्तावित विमानतळाचे कार्य जरी थांबले असले तरी या विमानतळासाठी काय करता येईल ते करू, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

पोयारकोठी, मरकणारच्या ग्रामस्थांकडून नक्षलवाद्यांना मनाई

■ **महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. २० :** भामरागड तालुक्यातील पोयारकोठी आणि मरकणारच्या ग्रामस्थांनी ठराव घेत गावबंदी केली. यामुळे पुन्हा एकदा नक्षलवाद्यांना धक्का बसला आहे.

अतिदुर्गम आणि नक्षलग्रस्त गावांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी दादालोरा खिडकी, प्रोजेक्ट उडानच्या माध्यमातून विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून दिला. त्यामुळे पोलीस प्रशासनावर गावकऱ्यांचा विश्वास दृढ झाला आहे. यातूनच २० गावांनी नक्षल्यांना गावाबंदी केली आहे.

अल्पसंख्यांक शाळा मान्यतेबाबतच्या निर्णयाला मुख्यमंत्री फडणवीस यांची स्थगिती

■ **महासागर प्रतिनिधी**
नागपूर, दि. २० :

राज्यातील काही शाळांना चुकीच्या पद्धतीने अल्पसंख्याक दर्जा दिल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत अल्पसंख्याक विभागाच्या निर्णयाला तत्काळ स्थगिती दिली आहे. तसेच या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेशही त्यांनी मुख्य सचिवांना दिले असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील एका शाळेच्या संदर्भात मंत्री संजय राठोड यांनी भर कॅबिनेटमध्ये विषय काढला होता. विषयाचे गांभीर्य पाहून मुख्यमंत्र्यांनी अल्पसंख्याक दर्जाच्या चुकीच्या मंजुरीबाबत तक्रारी मिळताच मुख्यमंत्र्यांनी याबाबत बैठक घेतली. शाळा मान्यतेसंदर्भातील प्रक्रियेत अनियमितता असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत असून, काही संस्थांना गैरमागार्ने अल्पसंख्याक दर्जा मिळाल्याचा आरोप आहे. यामुळे अशा प्रकारच्या सर्व मंजुरींची सखोल चौकशी करण्याची गरज असल्याचे मुख्यमंत्र्यांचे मत आहे.

मुख्य सचिवांना चौकशीचे आदेश

सूत्रांच्या माहितीनुसार, मुख्यमंत्र्यांनी मुख्य सचिवांना या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करून अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. तसेच या निर्णयाचा लाभ घेतलेल्या शाळांची यादी तयार करून त्या मान्यतांचा फेरआढावा घ्यावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या आहेत. राज्यातील शैक्षणिक संस्थांना दिल्या जाणाऱ्या अल्पसंख्याक दर्जाच्या प्रक्रियेत पारदर्शकता राहावी, यासाठी पुढील निर्णय घेतले जातील, असेही सूत्रांनी स्पष्ट केले आहे.

राज्यातील काही शाळांना चुकीच्या पद्धतीने अल्पसंख्याक दर्जा दिल्याच्या तक्रारींची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अल्पसंख्याक विभागाच्या संबंधित निर्णयाला तत्काळ स्थगिती दिली आहे. मुख्यमंत्र्यांनी मुख्य सचिवांना या प्रकरणाची सखोल चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

सूत्रांच्या माहितीनुसार, काही शाळांना नियमांचे उल्लंघन करून अल्पसंख्याक दर्जा प्रदान करण्यात आला आहे. या निर्णयामुळे शाळांच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेतली असून, मुख्य सचिवांना चौकशीचे आदेश दिले आहेत. मुख्यमंत्र्यांच्या या निर्णयामुळे भविष्यात अशा प्रकारच्या अनियमितता टाळण्यासाठी कठोर पावले उचलली जातील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

विदर्भात आज ऑपरेशन टायगर?

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :** लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले होते. महायुतीला मोठा धक्का बसला अनेक दिग्गज उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला.

मात्र, त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने जोरदार पुनरागमन केले. राज्यात महाविकास आघाडीचा मोठा पराभव झाला. महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले. महायुतीमधील प्रमुख तीन पक्ष भाजप, राष्ट्रवादी अजित पवार गट आणि शिवसेना मिळून तब्बल २३२ जागा जिंकल्या. दुसरीकडे महाविकास आघाडीला असा तसा फक्त ५० जागांचाच आकडा गाठता आला.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीनंतर महाविकास आघाडीमधील अनेक नेते भाजप आणि शिवसेनेत प्रवेश करत असल्याचे चित्र आहे. याचा सर्वात जास्त फटका हा शिवसेना

शिवसेना ठाकरे गटाला खिंडार पडणार....

ठाकरे गटाला बसत असल्याचे दिसून येत आहे. विधानसभा निवडणुकीनंतर पक्षाला लागलेली गळती अजूनही थांबण्याचे नाव घेत नाही. शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना धक्क्यावर धक्के बसत आहेत.

शिवसेना ठाकरे गटातून मोठी बातमी समोर आली आहे. शिवसेनेचे माजी जिल्हा प्रमुख राजू हरणे ते त्यांच्या शेकडो कार्यकर्त्यांसह शुक्रवारी शिवसेना मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कन्हान येथील सभेदरम्यान प्रवेश करणार आहेत.

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून ठाकरे गटाच्या अनेक नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना आपल्या पक्षाकडे आकर्षित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. शिंदेंच्या शिवसेनेच्या या उपक्रमाला ऑपरेशन टायगर हे नाव देण्यात आले आहे.

शिवसेनेचे ऑपरेशन टायगर हळूहळू यशस्वी होताना दिसत आहे. कारण ठाकरे गटाच्या अनेक नगरसेवकांचाही शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश होताना दिसत आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्यासाठी हा मोठा धक्का आहे. या घडामोडींची गंभीर दखल आता उद्धव ठाकरे यांच्याकडूनही घेण्यात आली आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी पक्षाचे डॅमेज कंट्रोल करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. उद्धव ठाकरे यांच्याकडून सातत्याने पक्षाच्या नेत्यांसोबत महत्त्वाच्या बैठका घेतल्या जात आहे. परंतु, त्यानंतर नागपूर ग्रामीणचे माजी जिल्हा प्रमुख राजू हरणे ते त्यांच्या शेकडो कार्यकर्त्यांसह शुक्रवारी शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणार आहेत.

टॉयलेट पेपरसारखा कार्यकर्त्यांचा वापर

■ **महासागर प्रतिनिधी**
यवतमाळ, दि. २० :

शिवसेना उबाठाच्या प्रवक्तेपदावरून शेतकरी नेते, आंदोलक किशोर तिवारी यांना बुधवारी रात्री पक्षाने अचानक काढून टाकले. ही गच्छंती होण्यामागे एका खासगी दूरचित्रवाहिनीच्या कार्यक्रमात किशोर तिवारी यांनी पक्षातील संघटनात्मक त्रुटींवर बोट ठेवल्याचे कारण असल्याची चर्चा आहे.

या गच्छंतीनंतर किशोर तिवारी यांनी आज गुरूवारी दुपारी एक चित्रफित प्रसारित करून खदखद व्यक्त केली. राजकीय पक्ष आंदोलक कार्यकर्त्यांचा टॉयलेट पेपरप्रमाणे वापर करतात, असे सांगत किशोर तिवारी यांनी कुटुंबीय, शिवसेना उबाठा पक्षातील अन्य काही नेत्यांचा खरपूस समाचार घेतला आहे.

: सिनेरंग :
१६ मे रोजी घडणार 'बंजारा'ची सफर

पैसे कमावण्यासाठी गाव सोडून शहरातच जावं लागतं हे अगदी चुकीचं आहे! हा महत्त्वाचा विचार समाजापुढे मांडणारा गाव बोलावतो हा चित्रपट ७ मार्च रोजी प्रदर्शित होतोय. या चित्रपटाचे टिजर रिलीज करण्यात आले. भूषण प्रधान, गौरी नलावडे, माधव अभ्यंकर यांच्या प्रमुख भूमिका असलेला हा चित्रपट शेतकरी राजा आणि त्याची पुढची पिढी गाव-खेड्यांकडे कोणत्या दृष्टीने बघते यावर भाष्य करणारा हा चित्रपट असेल. शेतीवर आणि गावावर निस्सीम मैत्री आणि आत्मशोधाचा सुंदर संदेश देणाऱ्या 'बंजारा' या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर करण्यात आली असून येत्या १६ मे रोजी हा चित्रपट सिक्कीमची सफर घडवतानाच मैत्रीचीही अनोखी सफर घडवणार आहे.

वी. एस. प्रॉडक्शन्स आणि मोरया प्रॉडक्शन्स सादर करत असणाऱ्या या चित्रपटाची कथा, पटकथा, लेखन आणि दिग्दर्शन स्नेह पोंक्षे याने केले असून या चित्रपटात शरद पोंक्षे, भरत जाधव, सुनील बर्वे, स्नेह पोंक्षे, सक्षम कुलकर्णी आणि आदित्य धनराज यांच्या प्रमुख भूमिका आहेत. तर रोहिणी विजयसिंह पटवर्धन आणि शरद पोंक्षे या चित्रपटाचे निर्माते आहेत.

नुकत्याच प्रदर्शित झालेल्या पोस्टरमध्ये स्नेह, सक्षम आणि आदित्य हे तीन मित्र प्रवासाला निघालेले दिसत आहेत. त्यांच्या चेहऱ्यावर प्रवासाबद्दची उत्सुकता, आत्मविश्वास झळकत आहे. पोस्टरमधून 'बंजारा' हा केवळ साहसी प्रवास नसून तो भावनिक आणि मानसिक पातळीवर बदल घडवणारा, स्वतःचे स्वप्न जगण्याची प्रेरणा देणारा प्रवास असल्याचे अधोरेखित होतेय. या तीन मित्रांचा हा प्रवास त्यांच्या मैत्रीला एक अनोखी दिशा देणारा असणार आहे. त्यामुळे प्रेक्षकांसाठीही 'बंजारा' हा एक अद्भुत अनुभव ठरणार आहे.

■ ■ ■

गाव बोलावतो चित्रपटाचे टिजर रिलीज

प्रेम करणारे वडिल, पैसे कमावण्याच्या हेतुने गावातून बाहेर पडलेला मुलगा आणि त्यानंतर गावाला आपली गरज आहे या जाणीवेने पुन्हा गावात आलेला तोच मुलगा आणि गावातील इतर मंडळी यांच्या गोष्टींवर बेतलेला हा चित्रपट असेल. गावाच्या भल्यासाठी, विकासासाठी गावातीलच नागरिकांनी एकत्र येऊन गाव सुधारायला हवं असा संदेश या चित्रपटाच्या टिजर मधून मिळतोय.

गावातील तरूणाई नोकरी-उद्योगांसाठी शहरात जाते, त्यामुळे गावं ओसाड पडताना दिसू लागली आहेत. गावात कोणत्याही प्रकारचे विकासकाम करताना त्यात विघ्न आणणारेही अनेक असतात, पण तरूण पिढीने मनावर घेतल्यास ते सर्व प्रकारचे बदल घडवून आणू शकतात, यावर भाष्य करणारा हा चित्रपट आहे.शेती, जोडधंदा, गावकरी मंडळी, गावचं राजकराण, प्रेम, समर्पण, त्याग, भावभावना या सगळ्याचं समीकरण असलेल्या चित्रपटात भूषण प्रधान, माधव अभ्यंकर, गौरी नलावडे यांच्यासोबतच श्रीकांत यादव, राजेश भोसले , अरविंद परब, किरण शरद यांच्या प्रमुख भूमिका आहेत. हा चित्रपटात ग्रामीण प्रश्नांवर आणि समस्यांवर भाष्य करण्यात आलंय त्यामुळे सर्वांनाच या चित्रपटाची प्रतिक्षा आहे. संस्कार वाहिनी प्रोडक्शन आणि फिल्मिटेरियन मीडिया वर्क्स निर्मित या चित्रपटाचे दिग्दर्शक विनोद माणिकराव हे आहेत.

■ ■ ■

रेखा पुन्हा येणार...

स्टार प्लस वाहिनीवरील 'गुम है किसीके प्यार में' ही बहुचर्चित मालिका सस्पेन्स, रोमान्स आणि नाट्यमय वळणांचा नवा अध्याय उलगडण्यासाठी सज्ज आहे. या मालिकेतील आगामी भागांत त्यामधील पात्रांची तीव्रता अधिक वाढवून प्रेक्षक छोट्या पडद्यावर खिळून राहतील, अशी योजना आकार घेत आहे.

सौंदर्य आणि प्रगल्भ प्रतिभेचा अखेरचा शब्द असलेल्या अभिनेत्री रेखाने 'गुम है किसीके प्यार में' या मालिकेत खास उपस्थित राहून मालिकेत नव्याने पदार्पण करणाऱ्या कलाकारांची तिने ओळख करून दिली. हा क्षण साऱ्यांकरताच खास ठरला.

कित्येक पिढ्यांना आपल्या सौंदर्याने घायाळ करणाऱ्या दिग्गज अभिनेत्री रेखाच्या धीरगंभीर आवाजातील हा प्रोमो आहे. या प्रोमोची सुरुवात एका वेधक दृश्याने होते, ज्यात सनम जोहर, जो एक रॉकस्टार आहे, त्याचे रंगमंचावर सादरीकरण सुरू असते, तर तेजस्विनी (वैभवी हंकारे) त्याच्याकडे प्रेमभरल्या नजरेने बघत असते. मात्र, हा प्रोमो जसजसा पुढे सरकतो, तशी रेखाच्या आवाजात प्रेक्षकांना एकतर्फी प्रेमाच्या प्रवासाची गाथा ऐकायला मिळते. रेखाच्या स्वरातील कथन कातर, भावनिक होत जाते. रेखाचे गुम है किसीके प्यार में आणि ह्यस्टार प्लस वाहिनीवर या निमित्ताने झालेले आगमन या मालिकेची भव्यता वाढवते. ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

मुख्यमंत्र्यांनी कृषिमंत्र्यांचा राजीनामा घ्यायलाच हवा

■ **महासागर प्रतिनिधी**
नागपूर, दि. २० :

विजय वडेट्टीवार यांची मागणी

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना कोर्टाने २ वर्षाची शिक्षा सुनावली आहे. आता तरी मुख्यमंत्र्यांनी राजीनामा घ्यावा, अशी मागणी काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

महायुती सरकारमधील उद्योगी आणि तेजस्वी लोकांमुळे दररोज सरकारची लाज निघत असल्याची टीका त्यांनी केली. मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री आरोपी मंत्र्यांना स्वतः क्लिनचीट देऊन त्यांची पाठराखण करत असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला.

न्यायालयाने कोकाटे यांना शिक्षा सुनावल्यावरून आता विरोधकांकडून महायुती सरकारवर निशाणा साधला जात आहे . माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा घेण्याची मागणी होत आहे.

वडेट्टीवार यांनी सोशल मीडिया एक्सवर पोस्ट करत सरकारवर हल्ला चढवला आहे. इतके उद्योगी आणि तेजस्वी लोक महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात आहेत की दररोज सरकारची लाज निघत आहे, असा घणाघात वडेट्टीवार यांनी केला.

दररोज आरोप होत आहे, कोर्टाकडून शिक्षेचे आदेश निघत आहे. मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री आरोपी मंत्र्यांना स्वतः क्लिनचीट देऊन त्यांची पाठराखण करत आहे, असा आरोपही विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनीही माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

वनरक्षक एसीबीच्या जाळयात

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :** लाकडाचा पंचनामा आणि हॅमर मार्क करण्यासाठी १ हजार रुपयांची लाच घेणाऱ्या वनरक्षकाला लाच लुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी)च्या पथकाने रंगेहात अटक केली. त्याने तक्रारकर्त्यांकडून आधीही लाच घेतली होती. गुरूवारी पुन्हा लाच घेताना त्याला एसीबीने सापळा रचून पकडले. रमेश राम सोनुले (४३) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

आरोपी सोनुले हा वन क्षेत्र सहायक कार्यालय लकडगंज येथे वनरक्षक पदावर कार्यरत आहे. तक्रारदार हे कामठी येथील रहिवासी आहेत. वनविभागाची कायदेशिररित्या परवानगी घेत सागवान आणले व लकडगंजमधील धनलक्ष्मी सॉ मील येथे १५ नग लाकडापैकी ५ नग लाकडाच्या पाट्या तयार केल्या. त्या पाट्या त्यांना घरी नेण्यासाठी त्यांनी वन क्षेत्र सहायक कार्यालय, लकडगंज येथे परवानगीसाठी अर्ज केला. त्यानुसार सोनुले हा तपासणीसाठी आरामशीनवर आला. त्याने लाकडांचा पंचनामा आणि ५०० रुपये घेतले. त्यानंतर त्यांनी १४ आणि १७ फेब्रुवारीला पुन्हा उर्वरित लाकूड घरी नेण्यासाठी परवानगी मागितली. कर्मचारी सोनुले याने तक्रारकर्त्याला एक हजार रुपये मागितले. एसीबीने त्याला पकडण्यासाठी सापळा रचला आणि त्याच्या कार्यालयातच पैसे घेताना सोनुलेला अटक केली. त्याच्या घराची झडतीही सुरू केली आहे. शुक्रवारी त्याला न्यायालयात हजर केले जाईल.

गजानन महाराज प्रकटदिन उत्साहात

■ **महासागर प्रतिनिधी**
नागपूर, दि. २० :

नागपुरात गजानन महाराजांचा प्रकटदिन भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. शहर आणि उपनगरांमधील मंदिरांमध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

सहकार नगरातील संत गजानन महाराज सार्वजनिक देवस्थानात दिवसभर भजन, कीर्तन आणि प्रवचनांचे कार्यक्रम झाले. मंदिर आणि परिसरात नेत्रदीपक रोषणाई करण्यात आली. संपूर्ण पालखी मार्ग रांगोळ्यांनी सजवण्यात आला. दुपारी पालखी मिरवणुकीने परिसराची परिक्रमा केली. मंदिराचा गाभारा फुलांनी सजवण्यात आला होता.

सकाळपासूनच भाविकांनी मंदिरात दर्शनासाठी गर्दी केली. महाराजांची पालखी मिरवणूक आणि महाआरतीसह विविध धार्मिक कार्यक्रम झाले. कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने झाली. मंदिराचे अध्यक्ष पुंडलिकराव धाडसे, सचिव अनंत कुलकर्णी, कोषाध्यक्ष सुरेश अय्यर आणि सहसचिव यशवंत कन्हेर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वी झाला.

नक्षीदार, रंगीबेरंगी माठ वेधताहेत लक्ष

■ **महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. २० :** ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या आणि रंगीबेरंगी माठ शहरात दाखल झाले आहेत. माठात देखील बदल करून त्यास तोटी, झाकण हे वेगळे बनवून ग्राहकांना आकर्षित करतील असेही माठ उपलब्ध आहेत.

१५० रुपयांपासून ते ७०० ते ९०० रुपयांपर्यंतचे माठ ग्राहकांना खरेदी करता येणार आहेत. . शहरातील नवाथे नगर, साई नगर, अमरावती ते बडनेरा रस्ता, वडाळी, शेगाव नवसारी रस्ता या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर माठ विक्रीची दुकाने लागली आहे. गरिबांचा फ्रीज म्हणून ओळखले जाणारे मातीचे माठ अमरावतीसह जिल्ह्यातील तालुका व गाव पातळीवर विक्रीसाठी आले आहेत.

शहरातील गजानन महाराज मंदिरासमोर वेगवेगळी डिझाइन्स असलेली आकर्षक माठ विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत. चपराशीपुरा ते जुना बायपास, एमआयडीसी या ठिकाणी लाल मातीतले माठ, काळे माठ, पांढरे माठ, नळ असणारे माठ, मोठे रांजण असे अनेक वेगवेगळ्या पद्धतीचे माठ विक्रीला आहे. त्याशिवाय गुजरात, पूर्णा नगर , मध्य प्रदेश, राजस्थान यासह शहरात माठ विक्रीला येत आहे. माठातील पाण्याची चव न्यारी उन्हाळ्यात थंड पाण्याची मागणी असते.

पण फ्रिजमधल्या पाण्यात ती चव नाही. ती मातीच्या माठातील पाण्याला आहे. त्यामुळे घरी फ्रीज असूनही नागरिकांकडून माठाची खरेदी ही होतेच. गेल्या काही दिवसांपासून दाखल झालेल्या मातीच्या माठाला अधिकची मागणी आहे. ...तर माठाचे भाव वाढतील फेब्रुवारीच्या अंतिम टप्यात उन्हाची तीव्रता ही आणखी वाढणार आहे. त्यामुळे कमी किमतीत उपलब्ध माठाला अधिकचे महत्व आले आहे.